**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २५६/१०**

**श्री. दिपक रामचंद्र शेळके -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. ७, श्रध्दा संकुल- ०१,**
**जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक ----उत्तरवादी**
**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,**
**नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,**
**नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/०२/२००९**
**सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी श्री. दिपक रामचंद्र शेळके यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/०२/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २/१०/२००८ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) कायदा व त्यातील तरतुदी, मानवी हक्क व मुलभूत हक्क

यासंबंधीचे शासन निर्णय इत्यादिचे उल्लंघन केलेले असून त्याबाबतची माहिती मागितली. ती दिली गेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ४/११/२००८ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस मागितलेल्या मुद्दयावर माहिती पुरविण्यासाठी आवश्यक असलेले शुल्क रु. २००/- भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. तसेच कांही मुद्दयांवर माहिती पुरविण्यात आली. अपीलार्थींचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २/१२/२००८ रोजी सुनावणी घेतली. त्यावेळी अपीलार्थी उपस्थित होते. अपीलार्थींनी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेऊन मुद्देनिहाय माहिती देण्यांत आली. तरीही अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी केलेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी विद्यापीठात उपलब्ध असलेली माहिती विहित वेळेत पुरविण्यात आली असे सांगितले. तर मुद्दा क्र. ५ व ९ ची माहिती देत असल्याचे सांगितले.

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ५ व ९ ची माहिती ७ दिवसांत देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २५८/१०

श्री. दिपक रामचंद्र शेळके -----अपीलार्थी
प्लॉट नं ७, श्रध्दा संकुल- १, जुना गंगापूर नाका,
गंगापूर रोड, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक ----उत्तरवादी
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
दिंडोरी रोड, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
दिंडोरी रोड, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २४/०३/२००९
सुनावणीचा दिनांक १९/०५/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. दिपक रामचंद्र शेळके यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४/०२/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १९/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१/०८/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली.

१. कार्यालयीन बिंदूनामावळी

२. कार्यालयीन पदोन्नती समिती

३. नवीन निर्माण केलेली पदे

४.  शासन निर्णय/ परिपत्रक यांच्या प्रती

५.  जेष्ठतासूची व इतर करण्यांत आलेल्या तरतुदी इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी विद्यापीठांत उपलब्ध असलेली माहिती विहित वेळेत दिली आहे. परंतु अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी माहितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ५/११/०८ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यानुसार अपील अर्जातील मुद्दयांवर साधक बाधक चर्चा झाली. त्यावेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली गेली असल्याने अपील निकाली काढले. परंतु अपीलार्थी या माहितीने समाधान नव्हते म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेदरम्यान अपीलार्थीस बिंदूनामावलीसंबंधी , पद भरती, जेष्ठतासूचीच्या प्रती व इत्यादिची माहिती मुद्देनिहाय देण्यांत आलेली आढळून आली. फक्त कार्यालयीन पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले होते ते देणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात येते. परंतु सेवाजेष्ठता यादया निश्चित करण्याप्रकरणी जे सभासद सहभागी होते त्यांची नांवे ही अधिनियमाच्या कलम ८(१)(छ) नुसार जाहीर करणे किंवा देता येत नाही हे अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे.

जन माहिती अधिक्‍ारी यांनी अपीलार्थीस मुद्देनिहाय माहिती दिलेली आहे. तरी आता त्यांनी कार्यालयीन पदोन्नती समितीचे इतिवृत्त देणे बाकी आहे ते अपीलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावे.

विद्यापीठाने किंवा त्यांच्या अधिका-यांनी केलेली कृति वा आदेश योग्य की अयोग हे ठरविणे आयोगाच्या कक्षेच्या बाहेर आहे हे अपीलार्थींनी ध्यानात घ्यावे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१६९/०२

श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ ------ अपीलकर्ता
७३६, अन्सारी रोड, मालेगांव,
जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
जिल्हा पुनवर्सन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय,
बीड

जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, पुनर्वसन शाखा,
बीड.

- *वि वे च न* -

अपीलकार श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०३.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) श्री. मिर्झाबेग २) श्री.पठाण मुनीरखान ३) मजहरअली अहमद मियॉ ४) मुखीद अन्सारी या सर्वांना प्रकल्पग्रस्त असल्याचा दाखला देण्यांत आला त्यांनी दाखल केलेल्या प्रस्ताव/कागदपत्रांची, प्रमाणित प्रती मागितलेल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १०.०६.२००९ च्या पत्रान्वये प्रमाणित प्रती अभिलेख कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्याकडून आवश्यक ती फी भरुन प्राप्त करुन घ्याव्यात असे कळविले.

सदर बाब चुकीची असल्याचे सांगून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले परंतु त्यावर सुनावणी घेण्यात आली नाही त्यामुळे व्यथीत होऊन अपीलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस हव्या असलेल्या चारही प्रकल्पगस्तांची तपशीलवार माहिती सुनावणीच्या दिवशीच देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे माहिती देण्याचे निर्देश देण्यांत आले. आहे असे दिसून आले.

अपीलार्थी यांचे म्हणणे असे होते की जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्यास उशीर केला व योग्य प्रकारे सहकार्य केले नाही. मुदतीत माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: २.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२१२/०२

श्री. प्रशांत वसंतराव देशमुख, ------ अपीलकर्ता
१, गायत्री रो हाऊसेस महाजन नगर,
अमुल डेअरी समोर, इंद्रप्रस्त कॉलनी, अंबड,
नाशिक ता.जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी
नाशिक एज्युकेशन सोसायटी, व्दारा पेठे विद्यालय,
रविवार कारंजा,नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, नाशिक एज्युकेशन सोसायटीचे रंगूबाई जुन्नेर हायस्कुल,
कोठे गल्ली, नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री. प्रशांत वसंतराव देशमुख,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेल्या आपल्या शाळेत मे १९८८ ते मे २००८ या कालावधीत मानधनावर किंवा कायम स्वरुपी काम केलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे हजेरी मस्टर त्यांची नियुक्ती पत्रे,पगार पत्रके व

ऑडीट रिपोर्ट व सेवा पुस्तक प्रत्यक्ष बघण्यासाठी निरीक्षणासाठी मिळावे त्यातील आवश्यक त्या सत्यप्रतीही मिळाव्यात.

जन माहिती अधिकारी यांनी मुद्या क्र.१ ची माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने ती त्या पक्षास विचारुन देता येईल बाकी ३ ते ५ मुद्यांवरील माहिती अपीलार्थीस दि. १८.०७.००९ च्या पत्राव्दारे देण्यात आली परंतु त्याने समाधान न झाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही किंवा आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे त्यांनी आयागाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीने असे लेखी निवेदन दिले की, त्यांना हवी असलेली माहिती दि. १५ मे २०१० रोजी मिळालेली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही ही बाब गंभीर आहे. यापुढे प्रत्येक अपीलाच्या बाबतीत सुनावणी घेऊन प्रत्येक अपीलावर अपील प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आंत निकाल द्यावा अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१९६/०२

श्री. संजय शंकर सगळे (पाटील) ------ अपीलकर्ता
२, कैलासपूजन हौसिंग सोसायटी, जेल रोड,
नाशिक रोड, (चंद्रेश्वर नगर) नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ------- उत्तरवादी
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नाशिक तालुका, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १/०७/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. संजय शंकर सगळे (पाटील) यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १/०७/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८/१२/२००८ रोजी अर्ज करुन (१) शासनाचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये अपीलार्थी यांनी दावा क्र. १००३/०७ नुसार जाब देणार यांचेविरुध्द वसूली दाखला मिळणेबाबतचे कागदपत्र. (२)

अपीलार्थींनी जाब देणार यांना दिलेल्या कर्जासंबंधी व पूर्तता संबंधीची कागदपत्रे इत्यादी ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २५/१२/२००८ च्या पत्राद्वारे दाव्यासंबंधीची कागदपत्रे कार्यालयीन अभिलेखांत उपलब्ध असून आवश्यक ती फी भरुन ती प्रत्यक्ष येऊन उपलब्ध करुन घ्यावीत. मुद्दा क्र. २ ते ६ मध्ये मागितलेली कागदपत्रे झुलेलाल सहकारी पतसंस्था नाशिक रोड या संस्थेशी संबंधित असल्याने ती संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावीत तशा त्यांना सूचना दिलेल्या असल्याचे अपीलार्थीस कळविले. परंतु अपीलार्थींनी वारंवार कळवूनही माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. २८/४/२००९ रोजी सुनावणी झाली. त्यावेळी अपीलार्थीस मुद्दा क्र. १ ची माहिती दिली आहे. तरीही काही माहिती देणे असेल ती पूर्णपणे देण्यात यावी. तसेच मुद्दा क्र. २ ते ६ ची माहिती त्या पतसंस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे सांगण्यात आले. परंतु अपीलार्थींनी माहिती मिळाली नाही म्हणून व्यथित होऊन द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली संबंधित मुद्दयांवरील माहिती दिली आहे. इतर मुद्दयासंबंधी अध्यक्ष झुलेलाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नाशिक यांना उपनिबंधक यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळवूनही त्यांनी अपीलार्थीस दाद लागू दिली नाही.

पतसंस्था या " जन प्राधिकरणे " नसल्याचा आदेश मा. हायकोर्टाने याअगोदर दिलेला आहे. त्यामुळे त्या संस्थांनी माहिती अपीलार्थीस सहकारी कायद्यानुसार द्यायची आहे. याबाबतीत जर उपनिबंधकांनी कळवूनहि संस्था माहिती देत नसेल तर त्यांनी संबंधितांविरुध्द उचित कारवाई करणे श्रेयस्कर ठरेल.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१८५/०२

श्री. रमेश कडू खैरनार ------ अपीलकर्ता
मु.पो. वायगांव, ता. बागलाण
जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी ------- उत्तरवादी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कळवण, ता. कळवण, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कळवण, ता. कळवण, जि. नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २०/०३/२००८
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. रमेश कडू खैरनार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०/०३/०८ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४/११/२००७ रोजी अर्ज करुन श्रीमती. हेमलता अभिमल पगार यांचे अनुदानित आश्रमशाळा येथील त्यांचे वेतनभत्ते, वेतनवाढी इतर देय भत्ते न दिल्याबद्दल त्यांचेकडे संस्थेकडून झालेला आजपावेतोचा पत्रव्यवहाराची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागितलेल्या माहितीच्या प्रती देण्यासाठी रु. ११४/- व टपाल खर्च रु. ७५/- असे एकूण १८९/- भरणा करण्यास दि. २१/१/२००८ च्या पत्रान्वये कळविले व दिनांक २१/५/२००८ च्या पत्राद्वारे मागितलेली माहिती दिली.

माहिती उशीरा व अपूर्ण दिल्याबद्दल प्रथम अपील दाखल केले. त्यावर कोणतीही सुनावणी घेतली गेली नाही. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी अपीलार्थी अनुपस्थित होते. तर प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान अपीलार्थीस हवी असलेली माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्ष अपीलार्थी गैरहजर राहिल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही.

अपीलार्थी यांचे म्हणणे असे होते की, प्रथम अपिलीय प्राधिक्ारी व जन माहिती अधिकारी यांच्यात समन्वय नसल्याने माहिती देण्यास उशीर केला व योग्यप्रकारे सहकार्य केले नाही. अपीलार्थीस विहित मुदत उलटून गेल्यावर माहिती देण्यासाठी त्यांच्याकडून फी घेणे चुकीचे आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती अधिकाराचे नियम तपासून पहावेत व त्याचे अवलोकन करावे.

जन माहिती अधिकारी यांनी यापुढे मुदतीत माहिती देण्याबाबत समज देण्यात येत आहे. त्यांनी घेतलेली फी अपीलार्थीस परत करावी.

प्रथम अपिलीय अधिका-यांनीहि मुदतीत अपीलाचा निर्णय द्यावा याची समज देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ३.०६.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१७७/०२

श्री. सचिन बाळासाहेब दप्तरे ------ अपीलकर्ता
फ्लॅट नं. ४, परमानंद हौसिंग सोसायटी,
कृष्ण नगर, पंचवटी, नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उद्यान निरीक्षक ------- उत्तरवादी
महानगरपालिका नाशिक.

जन माहिती अधिकारी
उद्यान विभाग, महानगरपालिका, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ११/११/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. सचिन बाळासाहेब दप्तरे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/११/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३/०८/२००९ रोजी अर्ज करुन महानगरपालिका उद्यान विभागाच्या ताब्यात असलेल्या कृष्ण नगर उद्यानात असलेली ट्रेन कोणत्या ठेकेदाराला देण्यात आली होती त्या ठेकेदाराचे संपूर्ण नांव व ठेकेदार असलेल्या लायसन्सची झेरॉक्स प्रत, (२) करारनामा प्रत, (३) ठेकेदारामुळे खजिन्यात किती रक्कम भरण्यात आली इत्यादी माहितीची विचारणा केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २१/८/२००९ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र १ व ३ ची माहिती दिली. मुद्दा क्र. ३ मधील करारनाम्याची प्रत व लायसन्स प्रत संबंधिची मिनी ट्रेनची मूळ

नस्ती उपलब्ध नाही. ती उपलब्ध झाल्यावर माहिती देण्यांत येईल असे कळविले. परंतु पूर्ण माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जातील प्रश्न तपासून व तथ्य शोधून माहिती १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस देण्याचे आदेश दिले. परंतु मूळ नस्ती न मिळाल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मुद्दा क्र. २ वरील माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते. त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी मिनी ट्रेन ठेकेदार व उद्यान विभाग यांच्यामध्ये करार झाला त्यावेळी संबंधित असलेले तत्कालीन उद्यान निरीक्षक श्री. आर. अे. गायकवाड यांचेकडून मूळ नस्ती उपलब्ध झालेनंतर प्रत देण्यात येईल असे आयोगाच्या नजरेस आणले. त्यावेळी आयोगाने असे निर्देशित केले की, तत्कालीन उद्यान निरीक्षक श्री. गायकवाड यांना कार्यालयांत बोलावून त्यांनी शोध मोहिम सुरु करावी. जर नस्ती उपलब्ध होत नसेल तर त्यांच्यावर योग्यती प्रशासकीय कारवाई करावी. परंतु सदरहू माहिती अपीलार्थीस विनामूल्य पुरविणे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना बंधनकारक आहे ही बाब नजरेआड आणू नये. नस्ती शोध मोहिम प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी स्वतःच्या देखरेखीखाली पार पाडावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१८७/०२

श्री. विष्णू त्रिंबक खाडे ------ अपीलकर्ता
रा. पहिणे, पो. सामुंडी,
ता. त्रंबकेश्वर, नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे पश्चिम विभाग,
नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उप विभाग ईगतपुरी,
जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २७/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. विष्णू त्र्यंबक खाडे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७/१०/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/६/२००९ रोजी अर्ज करुन सन १९८५ पासून धारगांव नागोसली ,ओंडली न.पा.पु. योजनेवर वॉलमन म्हणून काम करीत होते. शासन नियमानुसार जुन्या स्केलप्रमाणे रु. ८०.६० पैसे मिळाले आहेत परंतु शासनाने सुधारित केलेल्या नवीन दराप्रमाणे पूर्वी वाढीव रकमा फक्त दिल्या आहेत. परंतु आता पुढील कालावधीचा फरक मिळावा तो कधी मिळेल याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ७/८/२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अपीलार्थीस न देता ती कार्यकारी अभियंता (प्रथम अपिलीय प्राधिकारी) यांना दिली त्यामुळे अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलावर दि. २७/८/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपीलार्थीनी दि. १/७/१९९८ पूर्वीची कालावधी फरकाची रक्कमेची मागणी केली होती. सदर वाढलेल्या रोजंदारी बाबतचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून उपलब्ध करुन त्यानुसार फरकाची रक्कम देण्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अनुज्ञेय असलेल्या फरकाची देय रक्कमेसंबंधी तात्काळ कार्यवाही न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. पगार फरकाची देय रक्कम वेळेत न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस टोळवाटोळवीची उत्तरे दिली. रोजंदारीचे सुधारित दर उपलब्ध नाही असे सांगून अपीलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यांत आले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही जन माहिती अधिकारी यांच्यावर कामचुकारपणाचा ताशेरा ओढला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ९/१०/२००९ रोजीच्या पत्राद्वारे अनुज्ञेय असलेल्या रक्कमेची माहिती दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणण्यांत आले.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती वेळेत देणे आवश्यक होते. अपीलार्थीस माहिती पेक्षा त्यांची फरकाची रक्कम मिळण्यात जास्त समाधान आहे. तेव्हा अपिलीय अधिका-यांनी या दोन्ही गोष्टी त्यांच्या जन माहिती अधिका-यांकडून करुन घ्याव्यात.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२००/०२

श्री. दशरथ रमेश पगारे ------ अपीलकर्ता
रा. गोळशी, ता. दिंडोरी,

जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी ------- उत्तरवादी
पंचायत समिती दिंडोरी, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय गोळशी, ता. दिंडोरी,
जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक १९/११/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. दशरथ रमेश पगारे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९/११/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.
अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३/०९/२००९ रोजी अर्ज करुन सन १९९६ ते २००९ पर्यंत पाणीपुरवठा योजनेअंतर्गत झालेल्या कामाचा तपशील व खर्च याची सर्व माहिती मिळण्याबाबत अर्ज केला होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस तोंडी वा लेखी अशी कोणतीच माहिती विहित मुदतीत दिली नाही. त्यामुळे अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ६/११/२००९ रोजी सुनावणी ठेवली परंतु सुनावणी घेतली नाही व आदेशहि पारित केले नाहीत असे अपीलार्थींनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे.

अपीलार्थींनी व्यथित होऊन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यावर सुनावणी झाली परंतु सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. परंतु एकंदरीत याप्रकरणी कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्ज/अपीलावर कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. दोन्ही अधिका-यांनी कामात कुचराई केलेली दिसून येते. अपीलार्थीस कोणतीही माहिती मिळाली नाही असे आयोगास वाटते. त्यामुळे दोन्ही अधिकारी या प्रकरणी बेजबाबदारपणे वागलेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या कारवाई होणे आवश्यक वाटते. परंतु प्रत्यक्षात तपशील फॉर्म उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थीचे व उत्तरवादी यांचे म्हणणे काय आहे माहिती दिली गेली की नाही याचा बोध होत नाही. तरी पण जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही हे गृहित धरुन त्यांनी अपीलार्थीस २० दिवसांत माहिती विनामूल्य द्यावी व आयोगास तसे अवगत करावे. तसेच सदर कालावधीत माहिती न दिल्यास त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० नुसार दंडनीय कारवाई होऊ शकते ही बाबत लक्षात घ्यावी.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पदाला शोभेल असे वर्तन करावे, जेणेकरुन जनहित साधता येईल.

*-----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २१९/१०

ॲड्.सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी
एन ४१, जेए-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्कीम, नवीन सडिको, नाशिक, नाशिक-८

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार,
ता. जव्हार, जि. ठाणे.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वाडा,
ता. वाडा, जि. ठाणे.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ९/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी ॲड्.सुधाकर आर. जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १/०४/२००९ रोजी अर्ज करुन सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी आपल्या उपविभागास शासनाकडून (आमदार/खासदार) निधीसहीत एकूण मंजूर निधीची रक्कम ज्या कामासाठी खर्च झालेला आहे त्या कामाचा प्रकार व स्वरुप याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी कार्यालयांत माहिती घेण्यास आले असता तेथील लिपीकामार्फत माहिती दाखविली. परंतु ती मुद्देनिहाय नव्हती. परंतु अपीलार्थीनी निश्चित तारीख सांगून माहिती घेण्यास यावे असे सूचित करण्यात आले होते.

माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीवेळी फक्त अपीलार्थी

उपस्थित होते. तर प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी हे दोघे अधिकारी अनुपस्थित होते. एकूण याप्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती मिळालेली नाही. दोन्ही अधिका-यांनी माहिती देण्यास रस दाखविलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीनी मागितलेली माहिती जर उपलब्ध होती तर ती विहित वेळेत देणे त्यांचे कर्तव्य होते. अपीलार्थी माहिती घेण्यास येईल याची वाट पहात बसणे चुकीचे आहे. माहितीची कागदपत्रे , नकला, प्रती देण्यास जर खर्च येणार असेल तर तो अपीलार्थीस कळवून नियमाप्रमाणे मागून घ्यावा. परंतु अपीलार्थी माहिती घेण्यास येईल म्हणून वाट बघत बसणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती योग्य नाही. माहिती उपलब्ध असूनही ती देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल शिक्षा म्हणून रु. ५,०००/- ची शास्ती त्यांच्यावर लादण्यात येत आहे. ही शास्ती अपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या जुलै २०१० मध्ये होणा-या वेतनातून वसूल करण्यात यावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याबद्दलचा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. तसेच अपीलार्थीनी मागितलेली माहिती १५ दिवसांत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही या प्रकरणी पूर्णतः दुर्लक्ष केलेले दिसते. त्यांनाही कर्तव्य व जबाबदारीची जाण दिसत नाही. तरी यापुढे कर्तव्याची जाणीव ठेऊन काम करावे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १८३/१०

ॲड्.सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी
एन ४१, जेए-३-१२-१, सावतानगर,

४ थी स्कीम, नवीन सडिको, नाशिक, नाशिक-८

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी
लघु पाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ,
ठाणे, जि. ठाणे.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे स्थानिक स्तर विभाग ,
कळवा ठाणे, जि. ठाणे.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ९/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी ॲड्.सुधाकर आर. जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १/०४/२००९ रोजी अर्ज करुन

१. सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी आमदार/खासदार निधीतून कामासाठी खर्च झाला त्या कामाचे स्वरुप व प्रकार.

२. मागविलेल्या टेंडरच्या प्रती.

३. कामे मुदतीत झाली असल्यास त्याची कारणे

४. प्रत्येक मनुष्यबळावर झालेला खर्च

५. मनुष्यबळाच्या नोकरी सुरु झाल्याच्या तारखा

६. आवक जावक रजिस्टरच्या प्रती इत्यादी ९ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती संपूर्ण कार्यालयाच्या संबंधित असून विस्तृत आहे. त्यासाठी थोडा वेळ लागेल तसेच कार्यालयांच्या जागेत बदल झाल्याने सर्व अभिलेख नवीन जागेत स्थलांतरित करण्यात येत असल्याने माहिती देण्यास विलंब होईल. तरीही माहिती देण्यात येईल असे लेखी कळविले.

अपीलार्थींनी नवीन कार्यालयात २/३ वेळा खेपा घातल्या परंतु माहिती देतो म्हणून सांगितले होते. ती वेळेत न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती योग्यती फी घेऊन अपीलार्थीस परस्पर देण्यात यावी अशी सूचना दिली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस परिस्थितीची कल्पना दिली व माहिती देण्यास थोडा वेळ लागेल असे सांगितले. माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले. त्यावर झालेल्या सुनावणीच्या वेळी वादी/प्रतिवादी हजर होते.

अपीलार्थींचे म्हणणे असे होते की, मला कार्यालयात बोलावूनही माहिती दिली नाही. तर जन माहिती अधिकारी यांनी जागेत बदल झाल्यामुळे अभिलेख विखुरले गेले होते ते एकत्रित केले आहेत त्यामुळे अपीलार्थीस माहिती देण्यास ती उपलब्ध आहे त्यांनी व्यक्तिशः येऊन ती पहावी व आवश्यक त्या प्रती घेऊन जाव्यात असे आयोगाच्या सुनावणीत सांगितले.

एकंदरीत याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती विस्तृत स्वरुपाची होती त्यातच कार्यालयाच्या जागेत बदल झाला. त्यामुळे कार्यालयीन अभिलेख विखुरले गेले ते एकत्रित करुन अपीलार्थीस माहिती देणे थोडे जिकीरीचे होते. ती तयार करण्यास वेळ लागला हे परिस्थितीवरुन लक्षात येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत हे गृहीत धरुन जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखांत उपलब्ध असलेली आवश्यक ती माहिती अपीलार्थीस १५ दिवसांत विनामूल्य पुरवावी. यासाठी मात्र विलंब लावू नये.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनीही अशा प्रकरणी जबाबदारी ओळखून काम करावे असे आयोगाला अपेक्षित आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १७८/१०

श्री. धमेंद्र सुरेश धिंगाण -----अपीलार्थी
इदगा, ३८०, महात्मा फुले नगर,
मनमाड, ता. नांदगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ----उत्तरवादी

नगर परिषद त्रंबकेश्वर, ता. त्रंबकेश्वर,
जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
नगर परिषद त्रंबकेश्वर, ता. त्रंबकेश्वर,
जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २५/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. धमेंद्र सुरेश धिंगाण यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/०४/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. सफाई कामगारांना गट नं. १०३ मौजे त्रंबकेश्वर ही जागा त्रंबकेश्वर नगरपरिषद सफाई कामगारांना घराकरिता मिळण्याबाबतच्या कार्यवाहीचा तपशील.
२. त्रंबकेश्वर नगर परिषद कर्मचारी कै. विलास बाळु जावळे यांच्या जागी त्यांच्या पत्नीस कामावर घेण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या पत्राची प्रत मिळणे वगैरे माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी अपीलार्थीकडून रु. ५५/- शुल्क आकारले आहे. परंतु अपीलार्थीस माहिती दिली गेली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि. ७/७/२००९ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली त्यावेळी अपीलार्थीनी अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही तसेच रु.५५/- शुल्क आकारण्यांत आले त्याच्या तपशीलाची

मागणी केली.  त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना जादा घेतलेली रु. २६/- शुल्क आकारणी परत करावी व अपीलार्थीनी मागितलेली माहिती विनामूल्य १० दिवसांत देण्याचे आदेश दिले. परंतु अपीलार्थी यांना पूर्ण माहिती मिळाली नाही. दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे त्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी द्वितीय अपीलांत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुनही जनमाहिती अधिकारी यांनी आदेशानंतर २ महिने झाले तरी माहिती दिलेली नाही असे दिसून आले. सुनावणीच्या वेळी माहिती दिली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. मात्र ती दिली की नाही याची खात्री अपीलार्थीच्या अनुपस्थितीमुळे होऊ शकली नाही.

अपीलार्थीस रु. २६/- चा परवाना देण्याची जबाबदारी आता मुख्याधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचेवरच टाकण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ४.०६.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १८०/१०

श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ -----अपीलार्थी
७३६, अन्सार रोड, मालेगांव,
जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
गुरुदेव चैतन्य जंगली महाराज हायस्कूल कौलाणे (गा.)
ता. मालेगांव, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २१/११/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१/११/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ५/०१/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. गुरुदेव चैतन्यस्वरुप जंगली महाराज हायस्कूल कौलाणे मालेगांव शाळेला दिलेली मान्यत प्रत.
२. शिक्षक-शिक्षकेतर भरती
३. उमेदवारांचे अर्ज व मुलाखतीवेळी तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी
४. जेष्ठता यादी
५. शिक्षक हजेरी पत्रकाची प्रत
६. शैक्षणिक निकालाची प्रत

७. विद्यार्थ्यांची हजेरी पट प्रत इत्यादी अनुषंगाने १५ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेख तपासून उपलब्ध असलेली माहिती दिली. परंतु काही अभिलेख (रेकॉर्ड) चोरी गेलेले असून तसे शिक्षणाधिकारी यांना कळविले असल्याचे अपीलार्थीस सांगितले. परंतु त्याने समाधान न झाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. २/५/२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ ते १५ ची माहिती दि. १८/५/२००९ रोजी खास दुतामार्फत शिक्षणाधिकारी कार्यालयांत जमा करा असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले. परंतु मुद्दा क्र. १,२, व ५ ची पूर्ण माहिती मिळाली तर मुद्दा क्र.४,८,९,१०,१२,१३, व १४ ची माहिती अपूर्ण मिळाली तर मुद्दा क्र. ३,,६,११ व १५ ची माहिती अपीलार्थीना दिली गेली नाही त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थीच्या अनुपस्थितीच्या कारणामुळे त्यांना माहिती मिळाली की नाही हे समजू शकले नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे होते की, उपलब्ध असलेली माहिती दिली. जे रेकॉर्ड चोरीस गेले आहेत त्याची शोध मोहिम घेण्यांत येईल व जसे जसे रेकॉर्ड उपलब्ध होतील त्याप्रमाणे माहिती देण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे सांगितले. एकूण ४०७ पाने अपीलार्थीस दाखविण्यात आली. तरी अपीलार्थीचे माहिती अपूर्ण असल्याने समाधान झाले नाही. त्यामुळे त्यांनी माहिती अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती केली आहे. ती मात्र या विवक्षित परिस्थितीत अमान्य करण्यात येत आहे.

परंतु जन माहिती अधिकारी यांनी शिल्लक देय असलेल्या माहितीचे रेकॉर्ड चोरीस गेल्याचे सांगितले आहे. जर अजूनहि ते रेकॉर्ड प्राप्त झाले नसेल तर पोलीस स्टेशनला तक्रार गुदरावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १७५/१०

सौ. हौशाबाई भ्र. वाळीबा गावंडे -----अपीलार्थी
रा. सोनेवाडी भोजपूर, आदिवासी ठाकर,
गट नं. २०, ता. सिन्नर, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
भूमि अभिलेख, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमि अभिलेख सिन्नर, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २०/०४/२०१०
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी सौ. हौशाबाई भ्र.वाळीबा गावंडे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०/०४/२०१० रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होत्या.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६/११/२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. मौजे सोनेवाडी येथील गट नं. १९ चा आकारबंद अवलोकन करता भोगवटादाराचे/कब्जेदार यांचे ऐवजी देशमुख बंधुचे व वारसांच्या नावाची नोंद दिसते. अशी तफावत का १

२. गट नंबर पैकी काही क्षेत्र सौ. लक्ष्मीबाई भले यांना पूर्व परवानगी शिवाय विक्री करुन हस्तांतरित केले आहे.

३. गट नं. १९ ही जमिन तुकडे बंदीची योजना तयार करतांना कलम १८ ब अनुसार सार्वजनिक कारणासाठी नेमून दिले आहे काय यासंबंधीच्या नकला प्रती मिळण्याची विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २/३/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थींनी मागितलेली माहिती तलाठी मंडळ अधिकारी तहसिलदार सिन्नर महसूल विभाग यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने तो त्या कार्यालयाकडे वर्ग करुन महसूल विभागातून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. परंतु माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी भूमि अभिलेख विभागाकडील एकत्रिकरण विषयक आकारबंद नक्कल पुरविण्यांत आली आहे. ७/१२ वरील हक्क नोंदणी नांवाबाबत तक्रार असल्यास महाराष्ट्र जमिन महसूल संहितेप्रमाणे सक्षम अधिका-याकडे दाद मागावी असे सांगण्यांत आले.

तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, सिन्नर यांनी दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याने अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होत्या. त्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. मात्र अपीलार्थींची तक्रार ही संबंधित कायद्याखाली संबंधित प्राधिकाऱ्याकडे अपील केल्याने दूर होऊ शकते.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १९८/१०

श्री. योगेश मधुकर घोडे -----अपीलार्थी
४५९०, गणेशवाडी मंदिराजवळ,
घर नं. ४५९०, पंचवटी, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता ----उत्तरवादी
महानगरपालिका नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
महानगरपालिका नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ०५/११/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. योगेश मधुकर घोडे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५/११/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होत्या.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/०७/२००९ रोजी अर्ज करुन महानगरपालिका आयुक्त यांच्या निवासस्थानाचे विजबील व पाणीबील मनपा खजिन्यातून भरण्यात येते त्याची माहिती व पत्रावर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महानगरपालिका नाशिक यांची सही आहे तेव्हा स्वाक्षरी करणा-या अधिकाऱ्याचे नांव इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२/८/२००९ च्या पत्रान्वये मनपा आयुक्त यांना देण्यांत आलेले निवासस्थान मनपाच्या मालकीचे असल्याने सदर विजबिल/पाणी बिल मनपा खजिन्यातून भरण्यांत येते. त्याचप्रमाणे सेवा नियमावली माहिती ही आस्थापना शाखेकडे असून ती उप आयुक्त प्रशासन यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. बांधकाम विभागाचे अभिलेखावर अशी नियमावली नाही असे अपीलार्थीस लेखी कळविले. तरीही समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी ठेवली व अपीलार्थीस तसे

कळविले. परंतु अपीलार्थी आले नाहीत म्हणून परत एकदा सुनावणी ठेवण्यात आली. परंतु अपीलार्थी गैरहजर राहिल्याने सुनावणी न घेता अपील निकाली काढण्यांत आले. अपीलार्थींनी त्यानंतर आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी पुन्हा गैरहजर राहिले. विज-पाणी बीलासंबंधी माहिती देण्यात आली आहे. सेवा नियमावली बाबतची माहिती आस्थापना शाखेकडे होती तर त्या अर्जाची प्रत (या मुद्दयाबाबत) माहिती देण्यासाठी स्वतःहूनच जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या शाखेकडे पाठवावयास पाहिजे होती याची जाणीव यापुढे ठेवावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २१३/१०

श्री. संतोष नामदेव पगारे -----अपीलार्थी
एन-४१/असीडी/१/१५/६,
महाकाली चौक, सिडको नाशिक,
ता.जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
नाशिक एज्युकेशन सोसायटी
द्वारा- पेठे विद्यालय, रविवार कारंजा , नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
नाशिक एज्युकेशन सोसायटीचे
रंगुबाई जुन्नरे हायस्कूल, काठे गल्ली, नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक ३०/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. योगेश मधुकर घोडे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०/०९/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी उपस्थित, व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २०/०७/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली.

१. आपल्या शाळेत जानेवारी २००९ रोजी मानधनावर व कायम काम करीत असलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचा-याचे नांव, पगार, शिक्षण इत्यादी.

२. सन १९८८ ते २००७ या कालावधीत शाळेत भरल्या गेलेल्या शिपाई पदाचा तपशील

३. जानेवारी २००९ रोजी मस्टरवर असणा-या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची मान्यता दिली त्याची प्रत.

४. शासकीय नियमाप्रमाणे पगार दिला जातो काय १

५. पगाराबाबत शासनाचे नियम

६. सर्व कर्मचा-यांच्या नियुक्ती पत्राच्या प्रती इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १,३,व ६ हे त्रयस्थ पक्षाशी निगडीत असल्याने माहिती देता येत नाही असे सांगितले. मुद्दा क्र. २ शिपाई पदे भरण्याचा अधिकार नाशिक एज्युकेशन

सोसायटीस असल्याने त्यासाठी तेथे स्वतंत्र अर्ज करावा. मुद्दा क्र. ४ वेतनवाढ समितीच्या विना अनुदानित शाळेच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू असणा-या वेतनश्रेणीप्रमाणे पगार दिला जातो. मुद्दा क्र. ५ शासनाने खाजगी शाळाना चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबतचे नियम शाळेकडे उपलब्ध नाहीत असे दि. २४/६/२००९ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस लेखी कळविले. परंतु अर्जाला अनुसरुन माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही वा आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकाऱ्यांनी , अपीलार्थी यांनी शाळेकडे/ संस्थेकडे बरेच अर्ज केले आहेत त्याला वेळोवेळी माहिती दिलेली आहे व अद्याप हवी असलेली माहिती देण्याची तयारी दाखविली आहे.

अपीलार्थीस उर्वरित माहिती १५ दिवसांत देण्यात यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ७.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २१४/१०**

**श्री. संतोष नामदेव पगारे -----अपीलार्थी**
**एन-४१/एसीडी/१/१५/६**
**महाकाली चौक, चौथी स्कीम, सिडको,**
**नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**नाशिक एज्युकेशन सोसायटी**

द्वारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा,नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
नाशिक एज्युकेशन सोसायटीचे रंगुबाई जुन्नरे
प्रायमरी स्कूल काठे गल्ली, द्वारका, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३०/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. संतोष नामदेव पगारे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/०४/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहितीची मागणी केली.

१. शाळेतील सर्व शिपायांची जन्मतारीख, नेमणूकीची तारीख, दरमहा दिला जाणारा पगार, प्रॉव्हीडंड फंड कधीपासून दिला जातो त्याची तारीख.

२. काम करीत असलेल्या सर्व शिपायांची ऑर्डरची प्रत, सेवापुस्तक प्रत.

३. नेमणूकीपूर्वी सदर शिपाई कुठल्या विभागात कार्यरत होते.

जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ व २ ची माहिती ही त्रयस्थ पक्षासंबंधीत आहे. तर मुद्दा क्र. ३ संबंधी संस्थेच्या विविध शाळामध्ये शिपाई पद भरण्याचा अधिकार नाशिक एज्युकेशन सोसायटीला असून त्यासंबंधी स्वतंत्र अर्जाद्वारे माहिती घ्यावी असे कळविले.

माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. मुद्दा क्र. १ व २ वरील माहिती त्रयस्था पक्षाची असल्याचे सांगून नाकारली होती ती माहिती आयोगाच्या सुनावणीच्या वेळी शाळेकडे

उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिली असल्याचे सांगितले व अद्याप काही माहिती देणे आवश्यक असल्यास ती देण्यास तयार आहे असे नमूद केले.

माहिती दिलेली नाही म्हणून अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी चूक मान्य केली. अपीलार्थीस काही माहिती दिली व अद्याप काही माहिती त्यांना देणे आवश्यक आहे ती उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत.

अपीलार्थीस १५ दिवसांत उर्वरित माहिती देण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २०९/१०

श्री. अशोक दादासाहेब रुपवते -----अपीलार्थी
२ रामचंद्र कृपा सोसायटी, शिक्षण कॉलनी,
जेल रोड (पूर्व) नाशिक रोड.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (शिक्षण) ----उत्तरवादी
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. जन माहिती अधिकारी
संचालक (शिक्षण) समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २७/०७/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अशोक दादासाहेब रुपवते यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७/०७/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९/१२/२००८ रोजी अर्ज करुन सन २००७-२००८ पासून सेन्ट फ्रान्सिस हायस्कूल तिडके कॉलनी नाशिक या शासन मान्यताप्राप्त विना अनदानित खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेल्या पाल्याच्या फी च्या प्रतीपूर्तीबाबत माहिती मागितली होती.

द्वितीय अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी याच विषयावर अपीलार्थीचे आधीचे अपील क्र. मुमाआ/अपील क्र. १५६५/०९ दि. २२/१२/२००९ मध्ये आदेश पारित केले आहेत असे दिसून आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १७३/१०

श्री. शुक्लेश्वर संपतराव चव्हाण -----अपीलार्थी
८, स्वयंभू लोणकर मळा,
जय भवानी रोड, नाशिक रोड.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ----उत्तरवादी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,

नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ३१/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. शुक्लेश्वर संपतराव चव्हाण यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१/१०/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द आयोगाकडील निर्णय क्र. २००७/रामाआ/अपील/सीआर-७९२ दि. ३०/१२/२००८ अन्वये माहिती देण्यास ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लावल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) अन्वये रु. १२,०००/- एवढी शास्ती लावण्यात आली होती. त्या शास्तीची संबंधित अधिकाऱ्याकडून अद्याप पर्यंत वसूली झाली की नाही याची माहिती मागितली होती.

याबाबत द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदर वसूलीची माहिती कार्यकारी जन माहिती अधिकारी यांना दिली नसल्यामुळे त्यांची माहिती देता येत नाही म्हणून सांगितले. तर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी कळवूनहि तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

यावर झालेल्या चर्चेदरम्यान आयोगाने प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांना समज दिली की, अशा कामात हयगय करुन चालणार नाही. अशी कामे वेळेत व जबाबदारीने पार पाडणे आवश्यक आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल ऐवढे सांगून चालणार नाही. प्रत्यक्ष ठोस कृती करावी व शास्ती वसूली झाली की नाही हे आयोगास तसेच अपीलार्थीस विनाविलंब अवगत करावे. याबाबत परत तक्रार येता कामा नये याचे त्यांनी भान ठेवावे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/३६८६/अपील क्रमांक ६००/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/३६८७/अपील क्रमांक ६०१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/५३९६/अपील क्रमांक ६४७/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/-------/अपील क्रमांक ६९७/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/८८४८/अपील क्रमांक ७९०/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/८८४९/अपील क्रमांक ७९१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१३४७/अपील क्रमांक ८९१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१८७७/अपील क्रमांक ९१९/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/---/अपील क्रमांक १११६/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/--/अपील क्रमांक १११७/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/--/अपील क्रमांक ११२४/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,

सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.

२. अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.

३. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी मिरज
उपविभाग मिरज यांचे कार्यालय, मिरज.

४ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.

५ जन माहिती अधिकारी तथा सहायक करमणूक कर अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.

६ जन माहिती अधिकारी तथा उप चिटणीस
गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.

*---विवेचन---*

उपरोक्त ११ अपीलांची सुनावणी दि. ४ मे, २०१० रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी अपीलार्थींचे माहिती अर्ज, माहिती अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दिलेली उत्तरे तसेच सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी व उत्तरवादींनी सादर केलेली लेखी निवेदने याचे आयोगाने अवलोकन केले. अवलोकनाअंती असे दिसते की, सर्व प्रकरणात अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. तथापि, प्राप्त माहितीने अपीलार्थींचे समाधान झालेले नाही. कारण की त्यांच्या कथनानुसार एकतर दिलेली माहिती, माहिती अर्जातील मुद्दयांनुसार नाही किंवा दिलेली माहिती अपूर्ण आहे. याउलट जन माहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार कार्यालयात जेवढी माहिती उपलब्ध आहे ती देण्यांत आली आहे.

आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक व वेळ निश्चित करुन अपीलार्थींना कार्यालया बोलवावे व त्यांना त्यांच्या माहिती अर्जातील तपशीलानुसार सर्व संबंधित अभिलेखे उपलब्ध करुन द्यावेत. अपीलार्थींनी अभिलेख्यांची जातीने पाहणी करावी व त्यांना ज्या

अतिरिक्त कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या आहेत त्याची यादी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या यादीतील कागदपत्रांच्या छायाप्रती विनाशुल्क अपीलार्थींना उपलब्ध करुन द्याव्यात. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पूर्ण करावी.

*----आदेश---*

वरील ११ हि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/---/अपील क्रमांक ४२०/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ‑ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हापरिषद सांगली.

२. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद सांगली.

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ८/६/२००९**

**सुनावणीचा दिनांक ४/५/२०१०**

**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

**अपीलार्थीनी दि. १२/२/२००९ अन्वये दि. १२/१०/२००५ ते १२/२/२००९ या कालावधीची इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या गणवेशाबाबत माहिती मागितली. यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १६/२/२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, जिल्हयातील सर्व शाळांची माहिती संकलित करण्यासाठी किमान ६० दिवसांचा अवधी लागेल. तरी सर्व माहिती संकलित होताच विनाविलंब पुरविण्यात येईल.**

**या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. १६/३/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. ३१/३/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलित करुन ती विनामूल्य पुरविण्याचे आदेशीत केले. परंतु त्यानुसार अपीलार्थीना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.**

**द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादींचे म्हणणे ऐकून घेतले. अपीलार्थीनी त्यांना लेखी निवेदनात नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे परंतु ती विलंबाने मिळाली.**

**अपीलार्थीच्या मुळ माहिती अर्जाचे अवलोकन करता असे दिसते की, अपीलार्थीनी त्यांच्या अर्जात दिलेल्या तक्त्यात माहिती मागितली होती. तसेच संपूर्ण जिल्हयाची माहिती त्यांना अपेक्षित होती. ती संकलित करण्यासाठी साहजिकच जादाचा कालावधी लागणार होता. अपीलार्थीना जन माहिती अधिकारी यांनी दि. १५/७/२००९ रोजी माहिती पुरविलेली आहे. सत्यवार कमीज बाबत जो निर्णय घेण्यात आला त्याबाबतच्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थीस विनामूल्य पुरविण्यात याव्या. यास्तव सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतात.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/---/अपील क्रमांक ४२१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/५०६९/अपील क्रमांक ७०१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१३४३/अपील क्रमांक ८८७/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ऱ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हापरिषद सांगली.

२. जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण विभाग,

जिल्हा परिषद सांगली.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ८/६/२००९, १२/२/२००९ व ७/९/२००८

सुनावणीचा दिनांक ४/५/२०१०

अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या दि. १९/१/२००९, १३/३/२००८ व ३०/३/२००८ च्या माहिती अर्जांद्वारे शिक्षण विभागाकडून विविध मुद्दयांवर माहिती मागितली. त्यांना माहिती पुरविण्यात न आल्याने व जी माहिती त्यांना देण्यात आली ती असमाधानकारक असल्याच्या कारणास्तव त्यांनी प्रत्येक प्रकरणी प्रथम अपील केले. तद्नंतर सुध्दा त्यांचे समाधान न झाल्याचे नमूद करुन त्यांनी द्वितीय अपीले आयोगाकडे दाखल केली.

उपरोक्त तीनही अपीले एकाच विभागाशी संबंधित असल्याने सुनावणीच्या वेळी त्यांचा एकत्रित विचार करण्यात आला. त्यावेळी आयोगाने अपीलार्थी व उत्तरवादींची बाजू जाणून घेतली. त्याचप्रमाणे अपीलार्थी व उत्तरवादींनी दिलेल्या लेखी निवेदनाचे अवलोकन केले. याबाबत आयोगाच्या असे निदर्शनास आले की, उत्तरवादींनी अपीलार्थींना माहिती दिलेली आहे. तथापि, काही बाबींवर अपीलार्थींचे प्राप्त माहितीने समाधान झालेले नाही. याचा विचार करुन आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना पूर्वनियोजित वेळ ठरवून कार्यालयात बोलावून घ्यावे व त्यांना माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी द्यावी. अपीलार्थींनी सर्व कागदपत्रांचे बारकाईने निरीक्षण करावे व निरीक्षणाअंती ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती त्यांना हव्या आहेत त्याची यादी जन माहिती अधिकारी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी त्या यादीनुसार छायाप्रती विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावी.

अपीलार्थींचे म्हणणे आणखी असे आहे की, जन माहिती अधिकारी हे चलनानेच पैसे भरण्यासंबंधी आग्रह करतात. शासनाने तयार केलेल्या नियमात फी भरण्यासंबंधी जे पर्याय नमूद केले आहेत त्यापैकी कोणताहि पर्याय निवडण्याचा अधिकार अर्जदारास आहे. त्यामुळे विवक्षित

पध्दतीनेच पैसे भरावेत असा आग्रह जन माहिती अधिकारी यांना धरता येणार नाही याची जाणीव त्यांनी ठेवावी.

*----आदेश---*

तीनही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/-४२४०९/अपील क्रमांक ४२२/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१३४२/अपील क्रमांक ८८६/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/३०७६/अपील क्रमांक ९८८/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली - ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हापरिषद सांगली.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
जिल्हा परिषद सांगली.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ८/६/२००९, १२/२/२००९ व ६/४/२००८
सुनावणीचा दिनांक ४/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थींनी ती माहिती अर्जांद्वारे सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित विविध मुद्दयांवरील माहितीची मागणी केली. परंतु त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी तीनही प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केले. त्यानंतर सुध्दा त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन आयोगाकडे उपरोक्त द्वितीय अपीले दाखल केली.

उपरोक्त सर्व अपीले एकाच कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी आयोगाने अपीलार्थी व उत्तरवादींचे म्हणणे ऐकून घेतले. आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपीलार्थींचे प्राप्त माहितीने समाधान झालेले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती लपविली आहे. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना माहितीशी निगडित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. यासाठी निश्चित वेळ व दिवस अपीलार्थींच्या संमतीने ठरवावा. अपीलार्थींनी सर्व कागदपत्रांचे बारकाईने निरीक्षण करावे व जी कागदपत्रे त्यांना हवी आहेत त्याची यादी तयार करुन जन माहिती अधिकारी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी यादीतील कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थींना कोणतेही शुल्क न आकारता पुरवाव्या.

***----आदेश---***

तीनही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक ३१२/१०

श्री. भिमराव चिंतामणी सोनवणे -----अपीलार्थी
कनिष्क, प्लॉट नं ८, श्रीरंग हौ.सोसायटी,
मंगळमूर्ती नगर, जेल रोड (पश्चिम)
नाशिक रोड ४२२ १०१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शाखा अधिकारी ----उत्तरवादी
नाशिक रोड सेंटर, गो.ए.सो. केंद्रिय कार्यालय,
द्वारा- बी.वाय.के. महाविद्यालय, टी.ए.कुलकर्णी नगर,
नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
आर.एन.सी आर्टस जे.डी.बी.कॉमर्स ॲन्ड
एन.एस.सी. सायन्स कॉलेज, नाशिक रोड ४२२ १०१.

## ---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २३/०३/२०१०

सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०

अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थी श्री. भिमराव चिंतामणी सोनवणे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३/०३/२०१० रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी प्राचार्य, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १२/११/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. कु. कोमल भिमराव सोनावणे या विद्यार्थीनीचे द्वितीय वर्षाचे गुणपत्रक प्राप्त झाल्याचा दि. ७/९/०९ असा कळविला आहे. त्यासंबंधीचा पुरावा दिलेला नाही त्यासंबंधी पोष्टाने पाइथ्वलेल्या पोष्टाचे पाकीट व त्यावरील तारीख यांची माहिती.

२. जुन्या विद्यार्थ्यांच्या प्रेवश फॉर्म व इतर कागदपत्रांच्या प्रती.

३. दि. ९/७/०९ ते ३०/१०/०९ पर्यंतच्या आवक जावक नोंदवहीची प्रत इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८/१२/०९ च्या पत्राद्वारे कु. कोमल भि. सोनावणे हिचे पुनर्तपासणी निकालाचे गुणपत्रक पुणे विद्यापीठाकडून हस्त बटवडयाने दि. ७/९/२००९ रोजी प्राप्त झाले त्या पाकीटाची छायाप्रत देण्यात येत आहे. हस्त बटवडयावर व्यक्तीचे नांव ओळख नाही. कु. सोनावणे हिच्या गुणपत्रकांची प्रत देण्यात येत आहे.

परंतु अन्य विद्यार्थ्यांच्या कागदपत्राची माहिती त्यांच्या संमतीशिवाय देता येत नाही. तसेच कार्यालयीन टपाल आवक व जावक नोंदवहीच्या प्रतीही अपीलार्थीस देण्यांत आल्या. परंतु माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे म्हणून प्रथम अपील दाखल केले. यावर झालेल्या सुनावणीस

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस जी माहिती देणे आवश्यक होते ती देण्यांत आली असून विद्यार्थ्यांच्या जुन्या गुणपत्रकांच्या प्रती त्यांच्या संमतीशिवाय देता येणार नाहीत. तसेच गुणपत्रके विद्यापीठाची असल्याने त्यांच्या प्रती विद्यापीठाकडून घ्याव्यात असे लिखीत कळविले. परंतु अपीलार्थीस हवी असलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावर झालेल्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यांत आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्धतेनुसार दिली आहे. गुणपत्रके ही विद्यापीठाच्या अखत्यारितील असल्याने ती त्यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावीत. तसेच जुन्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके ही त्रयस्थ विद्यार्थ्यांची असून ती अधिनियमाच्या कलम ११(१) नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यांच्या परवानगीशिवाय देता येणार नाही हे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे असे दिसून येते. जी माहिती देता येत नाही त्याची कारणे नमूद केलेली आहेत. अशा परिस्थितीत मी खालील आदेश पारित करीत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ८.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/७६६६/अपील क्रमांक ७३६/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप नियंत्रक ----उत्तरवादी
वैधमापन शास्त्र पुणे विभाग, भिमाशंकर वसाहत,
बंगला क्र. १६, येरवडा, पुणे-- ६.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक नियंत्रक
वैधमापन शास्त्र सांगली,
लोकल बोर्ड कॉलनी, सांगली, जि. सांगली.

***---विवेचन---***

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील, सांगली यांनी दि. ३/१०/२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे सहायक वैधमापन शास्त्र, सांगली या कार्यालयाची दि. १२/१०/२००५ ते १७/४/२००८ या कालावधीतील खालील माहितीची निरीक्षणासाठी मागणी केलेली आहे.

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ची फाईल.

२. सहायक नियंत्रक ते शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंतची पदावली, त्यांची कर्तव्य, जबाबदारी इ. आदेश.

३. कार्यालयीन कामकाजाबाबतचे नियोजन त्यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या कोष्टकानुसार देण्यात यावे.

४. आस्थापनांना भेटी देणे याबाबत मापदंड मार्गदर्शक तत्वे इ. बाबतची फाईल.

५. मापदंडानुसार कार्यवाही न झाल्यास कोणती कारवाई केली जाते त्याबाबतचे आदेश.

६. दि. ५/४/०८ रोजी सहायक नियंत्रक वैधमापन शास्त्र यांचे पत्रानुसार जी माहिती दिली आहे त्याबाबतची फाईल इ. सर्व माहिती तयार ठेवून निरीक्षणासाठी वेळ व दिनांक कळवावा अशी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ९/५/२००८ रोजी निरीक्षणाचा दिनांक व वेळ विहित कालावधीत कळविलेला आहे. तसेच दि. १५/५/२००८ अन्वये माहिती दिलेली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल दि. २/७/२००८ रोजी मुद्देनिहाय आदेश पारित केलेले आहेत.

श्री. पाटील यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. ५/५/२०१० रोजी सांगली येथे सुनावणी आयोजित करण्यात आली होती त्या सुनावणीस प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

सुनावणीचे वेळी सादर केलेली कागदपत्रे तसेच अपीलासोबतची कागदपत्रे पाहता अपीलार्थीस सर्व माहिती दिली असल्याचे दिसते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ८.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/१३४१/अपील क्रमांक ८८५/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ॄ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हा परिषद सांगली.

२. जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सांगली.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १२/२/२००९
सुनावणीचा दिनांक ४/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. १५/८/२००८ च्या माहिती अर्जाद्वारे केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ व बॉम्बे नर्सिंग होम रजि.ॲक्ट १९४९ शी संबंधित एकूण ६ मुद्दयांवर माहिती मागितली. या अर्जाच्या उत्तरात त्यांना दि. २२/९/२००८ रोजी एकूण ८० पानांच्या छायांकित प्रती पुरविण्यात आल्या.

तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ८/१०/२००८ रोजी प्रथम अपील केले. यानंतर त्यांना पुन्हा दि. २२/१०/२००९ रोजी १० पृष्ठांच्या छायाप्रती पुरविण्यात आल्या. प्राप्त माहिती अपुरी असल्याचे नमूद करुन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षांचे म्हणणे आयोगाने ऐकून घेतले. यावरुन आयोगाचे असे मत झाले आहे की, अपीलार्थींना माहिती जरी दिली असली तरी ती परिपूर्ण नाही. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना त्यांच्या मूळ माहिती अर्जातील मुद्दयांशी संबंधित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. अपीलार्थींनी त्याचे सखोल वाचन करावे व आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांच्या छायाप्रतींची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी नोंदवावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना छायाप्रती विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. यासाठी जन माहिती अधिकारी व अपीलार्थींनी चर्चा करुन सोयीची वेळ व दिनांक ठरवावा. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत पूर्ण करावी.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/४७४३६/अपील क्रमांक ५७१२/०२

श्री. आर.पी. यजुर्वेदी (राव ) -----अपीलार्थी
सोसायटी फॉर अवेरनेस ऑफ सिव्हील राईटस ,
जे- २२०, अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इ.प्र) ----उत्तरवादी
पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,
राज लेगसीजवळ, पेपर मिल कंपाऊंड,
ला.ब. शास्त्री मार्ग, विक्रोळी (प) मुंबई ४०० ०८३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र)
पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,
राज लेगसीजवळ, पेपर मिल कंपाऊंड,
ला.ब. शास्त्री मार्ग, विक्रोळी (प) मुंबई ४०० ०८३.

## *---विवेचन---*

**अपीलाचा दिनांक ०८/०३/२०१०**
**सुनावणीचा दिनांक १५/५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" श्री. आर.पी. यजुर्वेदी (राव) यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेला दि. ३१/०७/२००९ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी कार्यालयात दि. १०/०८/२००९ रोजी प्राप्त झाला. त्या अर्जास अनुसरुन त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात न.भू.क्र. आणि गाव कळविण्यास कार्यालयाचे पत्र क्र.डी.वाय.सी.ई /६८३१/बीपीईएस दि. २६/०८/२००९ नुसार कळविले होते. त्यानंतर त्यांना सर्व्हेक्षण अभिलेखावरुन माहिती उपलब्ध असल्यास देण्यात येईल असेही कळविले होते.

तद्‌नंतर श्री.आर.पी. यजुर्वेदी (राव) यांना वरील पत्र न मिळाल्यामुळे त्यांनी उप.प्र.अभि (इ.प्र) पू.उप. यांचेकडे दि. ११/०९/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दि. २५/०९/२००९ ला दुपारी .३-३० वाजता पार पडली. सदर सुनावणीच्या वेळी श्री. आर.पी. यजुर्वेदी (राव) यांनी असे कळविले की, सदर अपील सादर केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांचे पत्र मिळाले. तसेच त्यांनी संबंधित न.भू.क्र. आणि गाव कळविण्याचा आग्रह करु नये, त्याचप्रमाणे सदर माहिती ही शोध घेऊन पुरविण्यात यावी असे कळविले आहे. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना जर अर्जदाराने पाहिजे असलेल्या माहितीसंदर्भात न.भू.क्र. आणि गाव कळविल्यास उपलब्ध असलेली माहिती सर्व्हेक्षण अभिलेखावरुन सदर इमारती विषयीच्या धारिणीचा शोध घेऊन उपलब्ध असल्यास आठ दिवसांत सदर माहिती अर्जदारास देण्यास सांगितले होते.

सदर अर्जदाराने त्यानंतर या कार्यालयास पाहिजे असलेल्या माहिती संदर्भात न.भॅ.क्र. आणि गाव कळविलेला नाही. त्यामुळे त्यांना सदर माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. "

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी नुसत्या वास्तुचे डिस्क्रीप्शन वरुन सि.टी.एस. नंबर शोधून काढणे हे शक्य होत नाही असे सांगितले. त्यामुळे अपीलार्थीस हवी असलेली माहिती देता आलेली नाही. याबाबत विभागाच्या वरिष्ठ पातळीवर प्लॉटचे डिटेल्स दिली असता सि.टी.एस. काढून देण्याची फॅसिलिटी मुंबई महापालिकेकडे आहे किंवा नाही याबाबत निवेदन करण्याचे निर्देश देण्यांत आले होते. त्यानुसार उप प्रमुख अभियंता यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" श्री. आर.पी. यजुर्वेदी (राव) यांनी दि. १०/८/२००९ रोजी अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात माहिती अधिकार कायद्यान्वये माहिती संदर्भात अर्ज केला होता. त्याप्रमाणे त्यांना दि. २६/८/२००९ रोजी माहिती संदर्भात सिटी सर्व्हे क्रमांक व गाव कळविण्यास सांगितले होते. त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ११/९/२००९ रोजी प्रथम अपील केले होते. त्यामध्ये त्यांना सदर माहितीबाबत सर्व्हे क्रमांक अथवा गाव कळविण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांना उत्तर देण्यात आले, परंतु त्यांनी सर्व्हे क्र. व गाव त्यांचे कार्यालयास कळविले नाही.

त्यांनी त्यानंतर द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले. त्याची सुनावणी दि. १५/५/२०१० रोजी झाली. त्यामध्ये त्यांना असे सांगण्यात आले की, या कार्यालयाचे अभिलेख हे नगर भूमापन क्रमांकावर आधारित असून या विभागाकडील प्रकरणाची नोंद/धारिणी क्रमांक हा सर्व्हेक्षण विभागातील संबंधित टिक्का शीटवर नोंदलेला असतो व त्याच संदर्भावरुन प्रकरण/ धारिणीचा क्रमांक यांचा शोध घेतला जातो. प्रत्यक्ष जागेवरील स्थिती दर्शक उल्लेखावरुन माहितीचा शोध घेऊ शकेल अशी स्वतंत्र यंत्रणा या विभागाकडे तथा महापालिकेत उपलब्ध नाही. माहिती आयुक्तांनी सर्वसाधारणपणे अर्जदारांनी विचारलेल्या जागेच्या नस्तीचा तपशील बघण्यास सुनावणीत सांगितले. त्याप्रमाणे देवनार गांव येथील सदर टिक्का शीटवरील सर्व उपलब्ध धारिणींचा कसोशीने शोध घेऊन त्याची पडताळणी केली असता अर्जदारास हवी असलेली माहिती अंदाजित या विभागाच्या धारिणी क्र.सीई/५७७१/बीपीईएस/एएम.सीई/एएम तसेच सीई/४४६१/बीपीईएस/एएम मध्ये असावी असे वाटते व तसे अर्जदारास कळविण्यात येत आहे. "

अपीलार्थीनी सदरील नस्तीची पाहणी करावी व त्यांनी आवश्यक वाटल्यास त्या नस्तीमधील कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेण्यात याव्यात असे निर्देश देण्यांत येत आहेत.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २८१/१०

श्री. अरविंद गणपत गुजराथी -----अपीलार्थी
सातपीर लेन सिन्नर (नाशिक)
सिन्नर , जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस प्रमख ----उत्तरवादी
(ग्रामीण विभाग) जिल्हा पोलीस कार्यालय,
नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक
सिन्नर पोलीस ठाणे, सिन्नर, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ७/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १९/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अरविंद गणपत गुजराथी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १९/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/०४/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. जुन्या कोर्टानजिक विनापरवाना बेकायदेशीर बांधकामाबद्दल केलेल्या अर्जाच्या प्रती.

२. जिल्हा पोलीस प्रमुख यांचे काम बंद ठेवण्याचे आदेश प्रत.

३. डॉ. शाकुंतल यांनी विनापरवाना कुपनलिका खोदून शेजारील घराचे नुकसानासंबंधी जिल्हा पोलीस प्रमुख यांचे आदेश प्रत.

४. डॉ. शाकुंतल व इतर यांचेवरील अदखलपात्र गुन्हे दाखल झाले त्या गुन्हा रजिस्टरची प्रत इत्यादी ७ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३/७/२००९ च्या पत्राद्वारे कार्यालयास उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आली. तर इतर कार्यालयाशी संबंधित माहिती अर्जदाराने त्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलार्थीस कळविले. विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावर झालेल्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. त्यावेळी असे दिसून आले की, जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित होती त्या कार्यालयास अधिनियमाच्या कलम ५(२) नुसार ५ दिवसांत संबंधित अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे आवश्यक होते व त्यावर ३० दिवसांत कार्यवाही करणे क्रमप्राप्त होते. परंतु अपीलार्थीस माहिती तब्बल ४७ दिवसांनी दिली आहे. याप्रकरणी तत्कालीन सहायक माहिती अधिकारी जबाबदार आहेत. मागितलेली माहिती योग्यप्रकारे न मिळाल्याने अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी निदर्शनास आलेली बाब --

१. अपीलार्थीस उपलब्धतेनुसार मागितलेली माहिती देण्यात आली.

२. माहिती विहित कालावधीत देण्यांत आली नाही हे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले व सहायक माहिती अधिकारी यांस जबाबदार धरले आहे. तेव्हा त्यांच्यावर विभागामार्फत योग्यती कारवाई करावी असे सूचित करण्यात येते.

त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १८९/१०

श्री. रमेश कचरु शेलार -----अपीलार्थी
रा. ओझर (मिग) ता. निफाड,
जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक ---उत्तरवादी
भूमि अभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,
नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक
भूमि अभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालय,
नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ०१/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. रमेश कचरु शेलार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१/१०/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८/०५/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. आपले पत्र क्र. एफजी/कावि १०५/नाशिक २००९ दि. ६/२/२००९ अन्वये निर्णय प्रकियेस अनुसरुन आलेली कार्यपध्दती, टिपणी, पर्यवेक्षण ,उत्तरदायित्व प्रणालीचा दस्तऐवज.

२. निर्णय प्रक्रियेतील मानके

३. श्री.शेखर यांच्या अर्जासोबत जोडलेली अ.क्र. १ ते ९ दस्तऐवज

४. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचा अहवाल इत्यादि ८ मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपीलार्थींच्या याच विषयासंबंधीच्या दि. २२/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी अपील क्र. मुमाआ/२००९/अपील क्र. १५५५/०२ मध्ये दि. २५/२/२०१० रोजी आदेश पारित केले आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: १०.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १९५/१०

श्री. संजय शंकर सगळे (पाटील) -----अपीलार्थी
फ्लॅट नं २, कैलास पुजन को.ऑप.हौ.सोसायटी.
चंदेश्वर नगर, दुर्गामाता मंदिर समोर, जेल रोड,
नाशिक रोड, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक ---उत्तरवादी
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सह निबंधक
सहकारी संस्था, नाशिक सहकार संकुल,
सारडा सर्कल जवळ, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ०१/०७/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. संजय शंकर सगळे (पाटील) यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४/११/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. झुलेलाल नागरी सह पतसंस्था मर्या. नाशिक या संस्थेतील खाते क्र. १७९८, १८५१, १८५, १८६ , ४२०, ४२१ या खात्याशी संबंधित खातेदारांचा नावानिशी तपशील.

२. सदर खातेदारांचे बँक स्टेटमेंट

३. खातेदार संस्थेचे सभासद/भागीदार आहेत काय १ असल्यास त्यांची माहिती.

४. खातेदारांना कर्ज दिले असल्यास त्याचा तपशील इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८/१२/०८ अन्वये अपीलार्थीस अभिप्रेत असलेली माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती उपलब्ध होण्यासाठी सदरचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापक झुलेलाल नागरी सह.पतसंस्था मर्या. नाशिक यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सदर मुद्दयांची माहिती त्या कार्यालयांकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले. परंतु सदर कार्यालयाने माहिती उपलब्ध करुन न दिल्याने प्रथम अपील दाखल करण्यात आले. त्यावरील सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जदारास सर्व परिस्थितीची कल्पना दिली व सदरहू माहिती पतसंस्थेकडूनच प्राप्त होऊ शकते असे सांगितले व पतसंस्थेस अपीलार्थींना हवी असलेली सर्व माहिती त्वरित पुरविण्याचे निर्देश दिले. परंतु अनेक वेळा लेखी आदेशीत करुनही सदर पतसंस्थेने आवश्यक ते कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. मुंबई हायकोर्टाच्या (नागपूर बेंच) निर्णयानुसार पतसंस्थांना जन प्राधिकरणे नाहीत त्यामुळे माहितीचा

अधिकारान्वये माहिती देणे त्यांना बंधनकारक नाही. पण महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ३२ व नियम क्र. ३० नुसार माहिती मिळू शकते. तसेच उपनिबंधकाच्या कार्यालयात या संस्थेची जी माहिती सहकारी कायद्यानुसार असावी लागते तीहि अर्जदारास देणे हे त्या अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. जर पतसंस्था उपनिबंधकाच्या निर्देशाप्रमाणे अनुज्ञेय माहिती देण्याची कारवाई करीत नसेल तर सहकार कायद्यानुसार त्यांनी त्यांचेविरुध्द कारवाई करता येईल.

---*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १९७/१०

श्री. प्रो. मोहम्मद मुस्लीम नादवी -----अपीलार्थी
एम.एच.बी. कॉलनी क्र. ४२३, मालेगांव,
जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ---उत्तरवादी
शासन मान्य अधिकृत मुख्य काझी/ नायब काझी
मालेगांव शहर, खो .क्र.३, छोटा कब्रस्थान, मालेगांव
जिल्हा नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा शासनमान्य अधिकृत
मुख्य काझी मालेगांव शहर खो.क्र.३
छोटा कब्रस्थान मालेगांव, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलांचा   दिनांक २२/१२/२००९
सुनावणीचा दिनांक  १८/०५/२०१०
अपीलार्थी  अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी   उपस्थित.

अपीलार्थी श्री. प्रो. मोहम्मद मुस्लीम नादवी    यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२/१२/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित,  अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/१२/२००९ रोजी अर्ज करुन  दि. १/१०/२००८ रोजीचे निकाहनामाच्या नकलेची छायांकित प्रतीची मागणी केली होती.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थींच्या याच विषयासंबंधीच्या दि. २२/१२/२००९ रोजी  झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी  अपील क्र. मुमाआ/२००९/अपील क्र. १६१८/०९ मध्ये दि. २५/२/२०१० रोजी  आदेश पारित केले आहेत.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: १०.०६.२०१०    राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक/ २६३/१०

श्री. निळकंठ शंकर जोशी -----अपीलार्थी
डी-२/१, राज्य कर्मचारी हौसिंग सोसायटी,
पोष्टाजवळ, अशोक नगर, सातपूर, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी ---उत्तरवादी
जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद औरंगाबाद.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २५/०६/२००९
सुनावणीचा दिनांक १९/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. निळकंठ शंकर जोशी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/०६/०९ रोजी द्वितीय अपील सादर

केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १९/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १९/१२/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. अपीलार्थींचे मुळ सेवापुस्तक कोणत्या कार्यालयात आहे

२. चटोपाध्याक वेतन आयोगाच्या अंतर्गत सुधारित दराने निवृत्ती विषयक कामाच्या रकमा प्रदानासाठी निवृत्त वेतन प्रकरणीच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती.

३. वेतन भत्त्याची फरक रक्कमेचा कालावधी इत्यादी ५ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थींच्या याच विषयासंबंधीच्या दि. २१/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी अपील क्र. मुमाआ/२००९/अपील क्र. १५०६/०९ मध्ये दि. २५/२/२०१० रोजी आदेश पारित केले आहेत.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक/ १८८/१०

श्री. प्रशांत वसंतराव देशमुख -----अपीलार्थी
१ गायत्री रो हाऊसेस, महाजन नगर,
इंद्रप्रस्त कॉलनी, अतुल डेअरी समोर,
अंबड, नाशिक ४२२ ०१०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ---उत्तरवादी
नाशिक एज्युकेशन सोसायटी,
द्वारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी
नाशिक एज्युकेशन सोसायटी,
द्वारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २९/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. प्रशांत वसंतराव देशमुख यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९/१२/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३०/६/२००९ रोजी अर्ज करुन

१. आपल्या संस्थेच्या जून १९८८ ते मे २००९ या कालावधीत कार्यकारी मंडळ व शिक्षण मंडळाचे जे ठराव झाले ते ठराव प्रत्यक्ष बघण्यासाठी उपलब्ध व्हावेत.

२. आवक/जावक रजिस्टर व टपालबुक प्रत्यक्ष बघण्यासाठी उपलब्ध व्हावे.

३. आवक/जावक रजिस्टर व टपालबुकातील नोंदी झालेल्या कागदपत्रांच्या प्रती इत्यादी ४ मुद्दयांवर माहितीची मागणी केली होती.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थींच्या याच विषयासंबंधीच्या दि. २१/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी अपील क्र. मुमाआ/२००९/अपील क्र. १५५६/०२ मध्ये दि. १६/०२/२०१० रोजी आदेश पारित केले आहेत.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः १०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/४६१३७/तक्रार क्रमांक ६८२/०१

श्री. चेतन कोठारी -----तक्रारदार
ओशियाना अपार्टमेंट,
डॉ. राजाबाली पटेल लेन, बी. देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, इ वार्ड कार्यालय,
३ रा मजला, १०, शेख हफिसुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ८
जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परि १ व २)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, इ वार्ड कार्यालय,
३ रा मजला, १०, शेख हफिसुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ८

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय , एस विभाग कार्यालय,
लाल बहादुर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोलपंपाजवळ,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.
जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय , एस विभाग कार्यालय,
लाल बहादुर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोलपंपाजवळ,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष)
बृहन्मुंबई महानगरपालिका एल वॉर्ड कार्यालय,
लक्ष्मणराव यादव मार्केट, १ ला मजला, एस.जी.बर्वे मार्ग,

कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.
जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)
बृहन्मुंबई महानगरपालिका एल वॉर्ड कार्यालय,
लक्ष्मणराव यादव मार्केट, १ ला मजला, एस.जी.बर्वे मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

***---विवेचन---***

अपील क्रमांक ५०४४, ५०४५, ५०४६,५०४७, ५०४९ मधील दि. ५/१२/२००९ रोजीच्या आदेशानुसार मुंबई महानगरपालिकेचे ५ जन माहिती अधिका-यांना असे निर्देश देण्यांत आले होते की, तक्रारदारांना जी अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बाबतीत केलेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती ती माहिती "सी" वॉर्डकडून व्यवस्थित मिळाली आहे, तर इतर विभागांनी का देऊ नये असा साहजिकच प्रश्न निर्माण होतो व अशी माहिती १० दिवसांच्या आत तक्रारदारांना देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले होते.

यातील कांही जन माहिती अधिकाऱ्यांकडून समाधानकारकरित्या माहिती न मिळाल्यामुळे तक्रारदारांनी अधिनियमाचया कलम ८(१)(ई) नुसार आयोगाकडे तक्रार केलेली होती. या तक्रारीची सुनावणी दि. १४/१/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

या दरम्यानच्या काळात "एस" विभागाच्या सहायक अभियंत्यांनी दि. १६/१२/२००९ रोजी तक्रारदारांस माहिती दिली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच फक्त ज्या जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती आली नव्हती त्यांनी माहिती संकलनात आलेल्या अडचणी विषद केल्या व ही माहिती सुध्दा तक्रारदारांस त्यानंतर दि. ४/२/२०१० रोजी देण्यांत आली.

माहिती सेनसिटीव्ह नेचरची असल्यामुळे तसेच आतापर्यंत अशा प्रकारे संकलीत करुन न ठेवली असल्यामुळे माहिती देण्यास उशिर झाला असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले. ते मान्य करण्यात आले.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५८५२/अपील क्रमांक ५५५३/०२

श्री. कृष्णा नाथा धस -----अपीलार्थी
३, भावसार चाळ, अजीज पार्क समोर,
सोमवारी बाजार रोड, मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०६४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार निरीक्षण १ ----उत्तरवादी
उच्च न्यायालय, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय, मुंबई ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १६/१२/२००९
सुनावणीची तारीख १६/३/२०१० व २९/३/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी पहिल्या दिवशी उपस्थित व जन माहिती अधिकारी २९/३/२०१० रोजी उपस्थित.

अपीलार्थीस तक्रार / यु.एल.पी. नं ३३७/८० ३० एप्रिल १९९७ रोजीच्या मराठी पेपरमध्ये न्यायधिश श्रीयुत बाज यांना निलंबित करण्यात आले त्या निलंबनाची कारणे, चौकशी अहवाल मागितला होता. अपीलार्थीस प्रथम माहिती देण्यास असमर्थता व्यक्त करण्यात आली. मात्र त्यानंतर अपीलार्थीचा दि. ४/१/१९९६ रोजीच्या अर्जाची छाननी करण्यात आली व सन्मा.मुख्य

न्यायधिश  यांच्या निर्देशाप्रमाणे सदरील केस नस्तीबध्द(फाईल) करण्यात आली.   अंतिम निर्णय फक्त कळविण्यात आला  बाकी कुठचेहि डिटेल्स देण्यात आलेले नाहीत.   म्हणून अपीलार्थीनी आयोगाकडे दि. १६/१२/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदरील अपीलार्थीनी मागितलेली कागदपत्रे ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे पुरविता येणार नाहीत.   याबाबतीत अपीलार्थीनी मागितलेली माहिती त्यांना मिळायला पाहिजे या मागणीचे समर्थन करताना सर्वोच्च न्यायालयाचे पुढील विवेचन अपीलार्थीनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

**“Secretary,Ministry and Information and Broadcasting, Government of India and others V/s. Cricket Associaton of Bengal and others” 1995(II)SCC161, Whereby in above stated judgment the Hon’ble Supreme Court has held as under:-**

**“The right in freedam of speech and expression includes the right in receive and impart information. For ensuring the free speech right of the citizen of this country, it is necessary that we citizens have the benefit of plurality fo views and a range of opinions on all public issues. A successful democracy posits an “aware” citizenry. Diversity of opinions, views, ideas and ideologies is essential to enable the citizen to arrive at informe judgment on all issues touching them.”**

अपीलार्थीनी अपील क्र. २००८/३४९४/०२  मध्ये राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई  यांनी दि. ३१/१०/२००९ रोजी अशाच एका विषयाच्या बाबतीत हायकोर्टाचे जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे निर्देश दिले होते.   ही बाब सुध्दा अपीलार्थी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणली.

माहितीचा अधिकार अधिनियमान्वये एखादा निर्णय कसा झाला याची जी माहिती रेकॉर्डला उपलब्ध असेल ती जनतेला देणे हे अभिप्रेतच आहे.   जोपर्यंत चौकशी चालू असते त्या चौकशीवर परिणामा होणारी माहिती दिली नाही तरी चालू शकते.   मात्र एकदा अंतिम निर्णय पारित झाल्यानंतर रेकॉर्डला असलेली सर्व माहिती द्यायलाच पाहिजे अशा प्रकारचे अनेक निर्णय या व इतर आयोगांनी दिलेले आहेत.   त्यामुळे वरील विवेचन लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आंत अपीलार्थीस हवी असणारी माहिती द्यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

*----आदेश----*

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ११.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
क्रमांक-मु.मा.आ/४३७७७/अपील क्रमांक ५२३७/०२

श्री. राजन अलिमचंदानी -----अपीलार्थी
४७/ब व्हिनस को.ऑप.हौ.सो.लि.
डॉ. आर.जी. थडाणी मार्ग, वरळी, मुंबई १८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था (१) मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट, मुंबई ०१

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था (१) मुंबई
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, फोर्ट, मुंबई ०१

*---विवेचन---*

श्री. राजन अलिमचंदानी यांनी दि. ११/५/२००९ रोजी व्हीनस को.ऑप.हौ.सो. मधील Deposed सदस्य श्री. रचनचंद मुरारका यांचे संदर्भात केलेल्या चौकशी अहवालाची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २५/५/२००९ रोजी माहिती अर्जाच्या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे. सदर उत्तराने समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १३/७/२००९ रोजी आदेश पारित केले असून अपील अंशतः मान्य केलेले आहे.

सदर आदेशाने देखिल समाधान झाले नाही म्हणून दि. २२ जुलै २००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. दि. २०/१/२०१० रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यास अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते.

श्री. राजन अलिमचंदानी यांनी आयोगाकडे दाखल केले द्वितीय अपील प्रथम राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचेसमोर दि. २०/१०/२००९ रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते. अपीलार्थींनी सदर अपील राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे सुनावणीस घेण्यास विरोध दर्शविल्यामुळे ते अपील दि. २०/१/२०१० रोजी माझ्यासमोर सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते.

अपीलासोबतची कागदपत्रे व सुनावणीचे वेळी झालेली चर्चा यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थींनी मागितलिली सद्यःस्थिती दर्शविणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २०/५/२००९ व २९/६/२००९ रोजीच्या पत्रांनी दिलेली आहे. त्यास प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल त्यांचे आदेशात दुजोरा दिलेला आहे.

आपणास पूर्ण माहिती मिळाली नाही असे अपीलार्थीस वाटत असेल तर त्यांनी नस्तीची तपासणी करुन त्यांना लागणाऱ्या अतिरिक्त कागदपत्रांच्या प्रती सुध्दा त्यांना देण्यात याव्यात.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ११.०६.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक/ २७७/१०**

**श्री. अशोक विठ्ठल चकोर -----अपीलार्थी**
**द्वारा- श्री स्वामी समर्थ हार्डवेअर ॲन्ड इलेक्ट्रीकल्स,**
**पाचोर गल्ली, गावठा, सिन्नर, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी ---उत्तरवादी**
**पंचायत समिती निफाड, जि. नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक**
**शिवेर, ता. निफाड, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २६/०८/२००९**
**सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. अशोक विठ्ठल चकोर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६/०८/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३/०४/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.**

१. भारत निर्माण पाणीपुरवठा योजनेस एकूण किती निधी मंजूर झाला व दरमहा खर्चाचा तपशील.

२. ग्रामपंचायतीसाठी पाणीपुरवठा बाबत दरमहा जो निधी येतो त्याचा खर्चाचा तपशील

३. ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत गावास जो मुख्य रस्ता, शाळा त्यासाठी शासनाकडून किती निधी मिळाला व खर्च किती झाला याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहितीपैकी भारत निर्माण योजनेचे अभिलेख ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नव्हते तेव्हा ती देता आली नाही. बाकी माहिती दिली असे नमूद केले आहे. परंतु माहिती अपूरी मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले परंतु ४५ दिवस ओलांडून गेले तरी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या समोरासमोरील चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपीलार्थीच्या अर्जानुसार जी माहिती कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध होती ती देण्यांत आली. परंतु शिवरे ग्रामीण पुरवठा समिती अध्यक्ष व सचिवांनी वेळीच अभिलेखे अपीलार्थीस उपलब्ध करुन न दिल्यामुळे माहिती देण्यात आली नव्हती. परंतु सदर माहिती ग्रामपंचायतीस दि. १७/५/२०१० रोजी प्राप्त झाली असून अपीलार्थीस पृष्ठ क्र. १ ते १४९ नुसार छायाप्रती सुनावणीच्या वेळी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यांत आल्या.

जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिली हे खरे असले तरी त्यांनी जाणीवपूर्वक विलंब केला नाही हे गृहीत धरुन यापुढे त्यांनी विहित कालावधीत अर्जदारास माहिती पुरविण्याची दक्षता घ्यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केल्यावर त्याची सुनावणी घेणे बंधनकारक असतांना अशाप्रकारे वागणे योग्य नाही. तरी यापुढे कामात कार्यतत्परता दाखवावी.

***<u>----आदेश---</u>***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ११.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक/ २७४/१०

श्री. दिपक भाऊराव परदेशी -----अपीलार्थी
२७२/२७३ हुडको कॉलनी, येवला,
ता. येवला, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुल सचिव ---उत्तरवादी
पुणे विद्यापीठ गणेशखिंड,
पुणे ४११ ००७.

२. जन माहिती अधिकारी
पुणे विद्यापीठ गणेशखिंड,
पुणे ४११ ००७.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक ११/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. दिपक भाऊराव परदेशी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी , प्रथम अपिलीय अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०८/०६/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. निवड समितीचा अहवाल सन २००५-०६ विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या कमिटीने मान्यता दिलेला अहवाल.

२. सेजीवली ग्रामीण शिक्षण संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे दि. ६/१०/२००५ चे पत्र.

३. शिक्षक मान्यतेचे पत्र.

४. रुजू अहवाल.

५. विद्यापीठ अनुदान आयोग यांचे मान्यतापत्राची प्रत इत्यादी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना दि. २३/६/२००९ च्या पत्रान्वये कार्यालयीन अभिलेखात माहिती शोधण्याचा खुप प्रयत्न करुनही मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकली नाही व त्यामुळे ती देता आली नाही. सदरहू माहिती संस्था/महाविद्यालय यांच्याकडून मिळू शकेल असे कळविले. माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. सुनावणीस वादी प्रतिवादी हजर होते. यावेळी अपीलार्थी यांनी युक्तीवाद केला की, सदरची कागदपत्रे कोर्ट कामासाठी हवी आहेत. सदरची कागदपत्रे महाविद्यालयाकडे मागितली होती परंतु कोर्ट केस चालू असल्याने ती त्यांना मिळणार नाहीत. त्याचप्रमाणे शैक्षणिक विभागांत तपासणी केली तर त्यांनी फाईल गायब होती. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, कागदपत्राचा शोध घेतला तरी कागदपत्रे कार्यालयात सापडली नाहीत. तरी ती त्यांनी संबंधित महाविद्यालयाकडून घ्यावी. कारण माहिती अधिकार पुणे विद्यापीठाशी संबंधित असलेल्या सर्व महाविद्यालयाना लागू आहे. माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या साधक बाधक चर्चेनंतर असे अनुमान काढण्यात आले की, कार्यालयात अभिलेखात अतिरिक्त शोध घेऊनही कागदपत्रांचा शोध लागला नाही त्यामुळे ती अपीलार्थीस देता येत नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी कथन केले. त्याचवेळी अपीलार्थींच्या असे नजरेस आणण्यात आले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा पुणे विद्यापीठाशी सलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना लागू असल्याने सदर बाबतची कागदपत्रे ही अपीलार्थी यांनी संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावीत असे सांगण्यात आले. अपीलार्थींचा अर्ज पुणे विद्यापीठाचे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी यांना पाठवावा, व त्यांनी अपीलार्थीस १५ दिवसाचे आंत माहिती द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १४.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक/ २८४/१०

श्री. जुल्फेकार अहमद एकबाल अहमद -----अपीलार्थी
जळगांव वेल्डिंग वर्क्स , आग्रा रोड,
सुपर मार्केटसमोर, मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ---उत्तरवादी
धुळे भाग धुळे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे.

२. जन माहिती अधिकारी
उपविभागीय अधिकारी धुळे भाग धुळे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २०/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. जुल्फेकार अहमद एकबाल अहमद यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०/०९/०९ रोजी

द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व अपीलार्थी अनुपस्थित, प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६/०४/२००९ रोजी अर्ज करुन इम्राजखान गुलामखान व फटेनीदा शेख जाफर जान लडवी यांना दिलेल्या जात प्रमाणपत्राच्या पुराव्यासंदर्भात दिलेल्या दाखल्याच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही त्यामुळे अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील दि. १४/८/२००९ रोजीच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते तरीही सुनावणी घेण्यांत आली त्यावेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे भाष्य केले की, जन माहिती अधिकारी यांनी दस्तऐवजाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. जात प्रमाणपत्र नोंदणी रजिस्टरमध्ये उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. मात्र सेतू केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथील सेतू संचालक यांनी आवश्यक कागदपत्र जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन न देणे हा माहिती मिळवणेसाठी प्रमुख अडथळा असल्याचे नमूद केले आहे. प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती न मिळाल्यामुळे अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, तत्कालीन सेतू संचालक यांच्याकडून मूळ प्रस्ताव व कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे अपीलार्थीस माहिती देता आली नाही त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी.

अपीलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले असले तरी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सेतू संचालका मार्फत कागदपत्रांचा पुनश्च शोध घेऊन अपीलार्थी यांना आवश्यक ती माहिती १५ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी. या अवधीत माहिती उपलब्ध झाली नाही तर जबाबदारी निश्चित करुन सेतू संचालकाविरुध्द/संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही जिल्हाधिकारी, धुळे यांनी करावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः १४.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/८८४७/अपील क्रमांक ७८९/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) ----उत्तरवादी
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक
वसंतदादा शेतकरी सह.साखर कारखाना लि.
सांगली.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ५/११/२००८
सुनावणीचा दिनांक ५/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ७/६/२००८ च्या अर्जाद्वारे साखर कारखान्यासंबंधी एकूण ५ मुद्दयांवर माहिती मागितली. माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थींनी दि. १०/७/२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी होऊन दि. १२/८/२०१० रोजी १ महिन्याच्या आत माहिती देण्याचे आदेश पारित करण्यात आले. तथापि अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली नाही. यास्तव अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी माहिती देण्याचे आयोगास कबूल केले. याचा विचार करता आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती विनामूल्य पुरविण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १४.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २६४/१०

श्री. यशवंत रघुनाथ चौधरी -----अपीलार्थी
फ्लॅट नं. ८, श्रीप्रकाश कॉम्प्लेक्स,
कुलकर्णी गार्डन समोर, शरणपूर रोड,
नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
जिल्हा परिषद लाभक्षेत्र विभाग, धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
लाभ क्षेत्र विभाग, जिल्हा परिषद धुळे.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १६/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. यशवंत रघुनाथ चौधरी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६/१२/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,

नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/०८/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. प्रत्येक वर्षाची क.अ. यांच्या विभागावार व संवर्गवार रिक्त असलेल्या व भरलेल्या जागा नावासह.

२. ज.रो.यो. तील ज्या क.अ. यांना धुळे जिल्हा परिषद समायोजन केले व ज्यांना डावलण्यांत आले त्यांची नांवी.

३. बांधकाम व लघुसिंचन विभागाने तयार केलेली क.अ. यांची ज्येष्ठतासूची इत्यादि ४ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी लघु सिंचन विभागासंबंधित असलेली माहिती मुदतीत दिली. परंतु बांधकाम विभागाशी संबंधित गुणपत्रिका संबंधिची माहिती संबंधित विभागाकडून घेण्यात यावी असे कळविले. त्याविरोधात प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उर्वरित माहिती ७ दिवसांत द्यावी असे जन माहिती अधिकाऱ्यांना निर्देश दिले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही म्हणून अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावर झालेल्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित कागदपत्रे कार्यालयातून गहाळ झाली असल्याने त्याची माहिती अपीलार्थीस देता येत नाही. तरी अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे मुद्दाम गहाळ केली आहेत असा आरोप केला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी उर्वरित माहिती अपीलार्थीस द्यावी असे नमूद केले आहे.

एकंदरीत या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी लघुसिंचन विभाग यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती काही प्रमाणांत दिली आहे. तर जन माहिती अधिकारी बांधकाम विभाग यांनी माहिती उपलब्धतेनुसार दिली असून गुणपत्रिका तपासणी तक्ता व सेवाज्येष्ठता सुची ही लघुसिंचन विभागाकडे असावी असे नमूद करतात. त्यामुळे माहिती नक्की

कोणी द्यावयाची हा प्रश्न अनुत्तीर्ण आहे. अपीलार्थींनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी लघुसिंचन विभाग यांनी द्यावी असे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्देश आहेत. तेव्हा ती माहिती जन माहिती अधिकारी लघुसिंचन विभाग यांनी अपीलार्थीस अभिलेखाचा शोध घेऊन माहिती द्यावी. तेव्हा अपीलार्थीस हवी असणारी माहिती २० दिवसांत देण्यांत यावी.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती नक्की कोणता विभाग उपलब्ध करुन देऊ शकतो हे स्वतः व्यक्तिशः पहावे व जबाबदारी निश्चित करुन पुढील कार्यवाही करावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः १५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २९७/१०**

**श्री. दिनकर धर्माजी पाटील -----अपीलार्थी**
**सर्वज्ञ बंगला, शिवाजी नगर,**
**गंगापूर, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.**
**जिल्हा नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक,**
**जिल्हा नाशिक**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/०३/२०१०**
**सुनावणीचा दिनांक १९/०५/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. दिनकर धर्माजी पाटील यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/०३/२०१० रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १९/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.**

सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ७/०८/२००९ रोजी अर्ज करुन आपले कार्यक्षेत्र कोणते, अधिकारांत आपल्याला किती खर्च करण्याचा अधिकार आहे. मागील ५ वर्षात झालेल्या खर्चाचा तपशील इत्यादी ५ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २५/२/२०१० च्या पत्रान्वये कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती कार्यालयीन वेळेत नियमानुसार पहिल्या तासासाठी निशुल्क व त्यानंतर नियमाप्रमाणे तासी दर आकारण्यांत येईल. आपणास हव्या असलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रतीसाठी होणारी रक्कम भरुन घेऊन जाऊ शक्तील असे अपीलार्थीस कळविले. प्रत्यक्षात माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केला. जरी अपीलार्थी गैरहजर असले तरी उपलब्ध माहिती अपीलार्थीदास दाखवावी व लागणाऱ्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रतींचे शुल्क भरल्यानंतर त्वरित माहिती द्यावी असे निर्देश दिले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी खर्चाचा तपशील अपीलार्थीस कळविला. तरीही अपीलार्थींनी माहिती मिळाली नाही याकारणास्तव द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी उत्तरवादी यांनी खरी वस्तुस्थिती आयोगाच्या नजरेस आणली. त्यांनी मुदतीच्या आंत सर्व पत्रव्यवहार केल्याचे व अपीलार्थीस उपलब्ध माहितीचा तपशील पुरविण्यात आल्याचे निदर्शनास आणले.

अपीलार्थी सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांना माहिती प्रत्यक्षात मिळाली की नाही हे समजू शकले नाही. परंतु प्रत्यक्षांत अपीलार्थींनी छायांकित प्रतीसाठी लागणारा खर्च अदा केलेला दिसून येत नाही. तरीही अपीलार्थीस खरोखर माहिती हवी असेल ती अवलोकनार्थ ठेवण्यात येईल व त्यातील निवडलेल्या छायाप्रती शुल्क भरुन देण्यास जन माहिती अधिकारी हे सहकार्य करण्यास तयार आहेत. अपीलार्थींनी त्याप्रमाणे कृती करावी व माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**----आदेश----**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: १५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/४३९४१/तक्रार क्रमांक ६३५/०१

श्री. असित कुमार बासू -----तक्रारदार
४६, ४ था मजला, फ्री प्रेस हाऊस,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
इंन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन
कंट्रोल ऑफ स्टॅम्प यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे - ४११ ००१.

२. जन माहिती अधिकारी
इंन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन
कंट्रोल ऑफ स्टॅम्प यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे - ४११ ००१.

*---विवेचन---*

श्रीयुत असितकुमार बासू, मुंबई यांनी दि. ९ सप्टेंबर, २००९ रोजी आयोगाकडे पत्र पाठवून तक्रार केलेली आहे त्याची नोंद आयोगाने घेतलेली आहे. त्या तक्रारीत असे नमूद करण्यात आलेले आहे की, त्यांनी दि. ११/६/२००९ रोजी जन माहिती अधिकारी इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन यांना ॲडज्यूडिकेटेड ऑफ स्टॅम्प डयूटी ॲन्ड डॉक्यूमेंट रजिस्ट्रेशन याबाबत जो अर्ज केला होता त्याबाबतीत अर्ज एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे जाण्याव्यतिरिक्त दुसरे कांही झालेले नाही व त्यांना माहितीही मिळालेली नाही.

त्यांनी सादर केलेल्या पत्रावरुन असे दिसते की, ९ सप्टेंबर, २००९ रोजी त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील अपिलीय प्राधिकारी, इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन यांचे कार्यालयात दाखल केलेले आहे त्या अपीलाची निर्गत लागलेली आहे किंवा नाही हे त्यांच्या तक्रार अर्जावरुन कळू शकत नाही. कारण तक्रारदारांचा तक्रार अर्ज हा त्यांनी त्याच दिवशी सादर केलेला आहे.

***----आदेश---***

प्रथम अपिलीय अधिकारी, इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी प्रथम अपीलावर सुनावणी देऊन १ महिन्याच्या आत निर्णय द्यावा. जर या अपीलावर याअगोदरच निर्णय दिला असेल तर त्याची प्रत आयोगास पाठविण्यात यावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः १५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२०६/०२

श्री. दिपक रामचंद्र शेळके, ------ अपीलकर्ता
प्लॉट नं. ०७, श्रध्दा संकुल-०१, जुना गंगापूर नाला,
गंगापूर रोड, नाशिक ता.जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
महसुल, दिंडोरी रोड, नाशिक

जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
महसुल, दिंडोरी रोड, नाशिक

*- वि वे च न -*

अपीलकार श्री. दिपक रामचंद्र शेळके,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.०३.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) वित्त विषयक बाबी २) आस्थापना बाबी ३) वार्षिक अहवाल परिक्षेच्याबाबी इत्यादि माहिती पुरवावी अशी विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.०४.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस माहिती पुरविण्याची तयारी दाखविली परंतु त्यासाठी स्टेशनरी शुल्क रु.१९१०/- विद्यापीठ कार्यालयात प्रदान करावे असे कळविले ते शल्क भरल्यानंतरच माहिती पुरविली असल्याचे आढळून आले परंतु माहिती त्रोटक व अपुरी पुरविण्याचा कारणास्तव प्रथम अपील दाखल करण्यात आले त्याची सुनावणी दिनांक १६.०६.२००९ रोजी झाली त्यावेळी अपीलार्थी व उत्तरवादी हजर होते त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती व्यतिरिक्त अपील अर्जात उपस्थित मुद्दयांची माहिती विद्यापीठात उपलब्ध आहे तशा स्वरुपात दिली गेली असे दिसते. त्यांनतर अपील निकाली काढण्यात आले परंतु सर्व माहिती न देणे लपवून ठेवणे अनियमीतपणा दत्यादि कारणास्तव त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. त्यावेळी विद्यापीठ कार्यालयांत उपलब्ध असलेली जवळपास ९५० पृष्ठे माहिती अपीलार्थींना पुरविण्यांत आली असे दिसून आले. न दिलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ व ७ ची माहिती देत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मुद्दा क्र. ६ व ८ च्या बाबतीत अपीलार्थींना कागदपत्रे दाखविण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेली आहेच. ती बघून अपीलार्थींनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात. अपीलार्थींनी एक अर्ज- एक विषय ही पध्दत वापरली तर जास्त बरे होईल. या परिस्थितीत मी खालील आदेश पारित करीत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,

दिनांक: १७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३२१/०२

श्री. संतोष नामदेव पगारे ------ अपीलकर्ता
एन-४१/एसीडी/१/१५/६, महाकाली चौक,
चौथी स्कीम, सिडको, नाशिक -- ४२२ ००८.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी
नाशिक एज्युकेशन सोसायटी,
द्वारा पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
नाशिक एज्युकेशन सोसायटीचे इंग्लिश मिडीयम स्कूल,
उंटवाडी, त्रिमुर्ती चौक, सिडको, नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १२/१/२००९
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. संतोष नामदेव पगारे ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित

करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२.०९.२००८ रोजी अर्ज करुन नाशिक एज्युकेशन सोसायटी संचालित इंग्लिश मिडीयम स्कूलशी संबंधित १ एप्रिल १९९७ ते मार्च २००१ या कालावधीत व्हॉवचर द्वारा झालेल्या खर्चाची किर्दबुक/रजिस्टर प्रत्यक्ष बघण्यासाठी उपलब्ध करुन देणेबाबतची माहिती मागितली होती.

द्वितीय अपीलावरील झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पाहण्यास बोलाविले होते. पण अपीलार्थी आले नाहीत. शाळेचा रेकॉर्डस असलेली माहिती केव्हाहि देण्याची तयारीहि त्यांनी दर्शविली आहे. तेव्हा अपीलार्थींनी शाळेत जाऊन ही माहिती घ्यावी. माहिती न मिळाल्यास आयोगाकडे त्याची तक्रार करता येईल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१९१/०२

ॲड्. सुधाकर रामचंद्र जाधव ------ अपीलकर्ता
एन-४१, जेअे-३-१२-१, सावतानगर,
४ थी स्कीम, नवीन सिडको, नाशिक- ०८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ------- उत्तरवादी
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग मंडळ,
पुणे - ०६

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, सांगली.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १२/१२/२००९
सुनावणीचा दिनांक १८/५/२०१०
अपीलार्थी उपस्थित,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. ॲड् सुधाकर रामचंद्र जाधव ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.०४.२००९ रोजी अर्ज करुन सन २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी आपल्या विभागास शासनाकडून (आमदार/खासदार) जो निधी मिळाला तो ज्या ज्या कामासाठी खर्च केला आहे त्या कामाचे स्वरुप, प्रकार, मोजमाप, त्यावरील खर्च याचा तपशील इत्यादि ९ मुद्दयांवर सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १९/६/२००९ नुसार अपीलार्थीस हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीबाबत एकूण रु. ३,४००/- शासकीय कोषागारांत भरणा करावी व त्याचे चलन दाखविल्यावर माहिती घेऊन जावी असे लेखी कळविले. माहितीचे शुल्क निश्चित नसतांना माहितीसाठी मोठया प्रमाणात रक्कम भरण्यास सांगितले असे नमूद करुन अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत किंवा कोणतीही माहिती अपीलार्थीस दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस फक्त अपीलार्थी हजर होते. उत्तरवादी गैरहजर होते. त्यामुळे फी बद्दल समजू शकले नाही. परंतु आयोगाने असे निदर्शनास आणून दिले की, मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून जन माहिती अधिकारी यांनी एकूण छायांकित प्रतीसाठी लागणारा खर्च दिलेला आहे. पण हे पत्र मुदतीत दिलेले नाही. म्हणून अपीलार्थींनी हव्या असलेल्या माहितीचे अभिलेख प्रत्यक्षात जाऊन तपासावेत व जी माहिती त्यांना अत्यंत आवश्यक आहे त्याच्या छायांकित प्रती त्यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी याप्रकरणी कोणतीही दखल घेतलेली नाही याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३२३/०२
मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३२४/०२

श्री. कैलास पंजाराम सरग ------ अपीलकर्ता
मु.पो. मेहुणे, ता. मालेगांव,
जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल खादगांव,
ता. नांदगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक १/०५/२००९
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. कैलास पंजाराम सरग ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०६.२००८ व दि. २१/२/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. आपल्या शाळेतील इयत्ता ८ वी अ चा वार्षिक निकाल जाहीर केला त्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक निकाल पत्रावरील वर्गशिक्षक व पर्यवेक्षक मुख्याध्यापक यांच्या सहीसह छायांकित प्रत मिळण्याची विनंती केली होती.

२. स्वत:च्या रजेच्या अर्जाची छायांकित प्रत.

३. हजेरी पत्रकाची प्रत.

४. इयत्ता ५ वी ते ७ वी या वर्गाच्या वार्षिक परीक्षा निकालपत्रावर अधिकाऱ्यांनी अवलोकन केल्याबद्दलच्या सहया याची प्रत.

यापूर्वी याच विषयावर अपील क्र. २००९/२६८८/०२ च्या द्वितीय अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य माहिती आयुक्त बृहन्मुंबई यांनी जे आदेश पारित केले आहेत त्यात अपीलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ मधील मुद्दा क्र. १,२,३, व ५ याची माहिती दिली आहे हे दिसून येते. परंतु मुद्दा क्र. ४ मधील ८ वी चे निकालपत्र आढळून येत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी परत एकदा नस्ती शोध मोहिम राबवावी , अन्यथा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवावी.

## *----आदेश---*

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: १७.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/४४९०३/अपील क्रमांक ५१२९/०२

श्री. वैभव एकनाथ नरवडे ------ अपीलकर्ता
ए- ३०१, शिवप्रेरणा सोसायटी,
वीर सावरकर नगर, साकीनाका,
मुंबई ४०० ०७२.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुल सचिव ------- उत्तरवादी
मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी
मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक २९/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १२/१/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या अपीलात जे मुद्दे मांडण्यांत आले त्यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिवेदन केलेले आहे.

१. अपील अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली परंतु आदेश अद्याप दिला नाही.

उत्तर -- सदर बाबतीत विद्यापीठाचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पत्र क्र. आरएस/९७-ए/ १२, दिनांक ४ जानेवारी, २०१० अन्वये आदेश देण्यात आले आहेत.

२. अधिसभेच्या बैठकीत व तत्पूर्वी चहापानाला हा मुद्दा मा.कुलगुरुंसमोर उपस्थित केला माहिती देतो म्हणाले अद्याप माहिती नाही.

उत्तर -- सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) नुसार माहितीच्या अधिकारात बसत नाही.

३.  प्रश्न क्र. १ मधील प्रत अधिकाऱ्यांचे शेरे झाकून दिली आहे.

उत्तर -- श्री. महाजन (सहायक कुलसचिव) यांनी परीक्षा नियंत्रकाविरुध्द केलेल्या तक्रारीच्या अर्जावर कार्यवाही करण्यासाठी परीक्षा नियंत्रकांचे स्पष्टीकरण आवश्यक असल्याने तशी कुलसचिवांची परवानगी आवश्यक असल्याने विभागाने तशी टिप्पणी केली होती. श्री. नरवडे यांनी मागितलेल्या माहितीचा त्या शेऱ्याशी संबंध नसल्यामुळे शेरा झाकून ठेवण्यात आला होता. त्यामागे माहिती न देण्याचा उद्देश नव्हता.

४.  प्रश्न क्र.३ मध्ये सदर अधिकाऱ्यांनी काय कारवाई केली याचा तपशील मागितला. त्याऐवजी आस्थापनाचा संदर्भ दिला आहे.

उत्तर--- सदर अधिकाऱ्यांनी श्री. महाजन यांच्या पत्रावर परीक्षा नियंत्रकांचे अभिप्राय मागविण्याची परवानगी दिली. परीक्षा नियंत्रकांनी सदर प्रकरणी आपले स्पष्टीकरण दि. १७ ऑगस्ट, २००९ पर्यंत दिलेले नव्हते. सदर प्रकरणी परीक्षा नियंत्रक यांचे स्पष्टीकरण मिळाले असून त्याबाबत पुढील कारवाईकरीता प्रकरण प्रशासनास सादर करण्यात आले आहे.

५.  ज्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली त्यांनी काय केले, कागदोपत्री काय केले ती कागदपत्रे देण्यात यावीत, आस्थापना विभागाने पाठविलेली दोन्ही पत्रे देण्यात यावीत.

उत्तर--- मा. कुलसचिव यांनी श्री. महाजन यांच्या पत्रावर परीक्षा नियंत्रकांचे अभिप्राय मागविण्याची परवानगी दिली. श्री. महाजन यांनी मा. कुलसचिवांकडे तक्रार केली असून त्यासंदर्भात परीक्षा नियंत्रक यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे. परीक्षा नियंत्रक यांनी दि. २७/०८/२००९ रोजी स्पष्टीकरण दिले असून पुढील कार्यवाही चालू आहे.

६.  आस्थापना ने पहिले पत्र २५ जून ०९ रोजी पाठविले परंतु दिड महिना होवूनही परिक्षा नियंत्रकांनी उत्तर दिले नाही यावरुन परीक्षा नियंत्रकांचा उद्‌दामपणा दिसून येतो. त्यांच्या या अशा वागण्यावर कुलसचिव कोणती कारवाई करणार त्याचा तपशील देण्यात यावा.

उत्तर-- परीक्षा नियंत्रक यांनी दि. २७ ऑगस्ट २००९ रोजी सदर बाबत स्पष्टीकरण दिले असून पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

७.  परीक्षा नियंत्रकांनी दिलेला अभिप्राय देण्यात यावा.

**उत्तर -- परीक्षा नियंत्रकांनी दिलेल्या अभिप्रायाची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.**

**८. प्रश्न क्र. ४ चे उत्तर मोघम आहे.**

**उत्तर --- दि. १७ सप्टेंबर, २००९ पर्यंत परीक्षा नियंत्रक यांचे स्पष्टीकरण आले नसल्यामुळे प्रश्नाचे उत्तर तसे देण्यात आलेले आहे.**

**९. माहिती कायद्याच्या कलम ७ उपकलम (१) प्रमाणे ४८ तासाच्या आत दिली नाही.**

**उत्तर --- सदर अर्ज आस्थापना विभागाकडे दि. १३ ऑगस्ट, २००९ रोजी प्राप्त झाला व त्याचे उत्तर दि. १७ ऑगस्ट, २००९ रोजी पाठविलेले आहे.**

**सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, सद्य:स्थिती दर्शविणारे जे कागदपत्र आहेत ते अपीलार्थीस देण्यांत आलेली आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक: १९.०६.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२८३/०२

श्री. रमेश कचरु शेलार ------ अपीलकर्ता
रा. ओझर (मिग)
ता. निफाड, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ------- उत्तरवादी
तहसील कार्यालय निफाड, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी
तहसील कार्यालय निफाड, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक ४/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी व जनमाहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी श्री. रमेश कचरु शेलार ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०६.०५.२००९ रोजी अर्ज करुन आपले कार्यालयाकडे दि. १७/४/२००९ रोजी सर्वश्री दौलत रतन सुभाष व रमेश कचरु शेलार यांनी दाखल

केलेल्या तातडीच्या अर्जाची कार्यालयीन टिप्पणी अभिप्राय व निर्णयाचा आदेश याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ८/५/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थींचा अर्ज कागदपत्रांसह संबंधित मंडळ अधिकारी पिंपळगांव (ब) यांचेकडे चौकशी कामी पाठविण्यात आलेला आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच माहिती देण्यात येईल असे कळविले. माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले. त्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश दिले की, अपीलार्थींच्या अर्जावर प्राप्त परिस्थितीत झालेल्या कार्यवाहीबाबत तहसिल कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस २० दिवसाचे आंत विनामूल्य पुरवावी. परंतु अभिप्राय व निर्णयाचा आदेश न मिळाल्याने अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या एकूण चर्चेदरम्यान अपीलार्थी यांनी कार्यालयीन टिप्पणी विनामूल्य मिळाली परंतु अभिप्राय व निर्णय आदेश अद्याप मिळाले नाहीत असे सांगितले. परंतु मंडळ अधिकारी पिंपळगांव (ब) यांनी असे सांगितले की, हिस्सेवारी ठरविण्याबाबत एकतर तहसिलदार निफाड यांचेकडे अर्ज करावा अथवा दिवाणी न्यायालयात जाऊन हिस्से ठरवून घ्यावेत. तेव्हा जमिन महसूल संहितेप्रमाणे अपीलार्थींनी कार्यवाही करावी. कारण त्या संहितेप्रमाणे नोंद क्र. १५६४६ मंजूर झाली आहे. उपलब्ध माहिती देण्यांत आली आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: १९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२७५/०२

श्री. प्रशांत वसंतराव देशमुख ------ अपीलकर्ता
१, गायत्री रो हाऊसेस , महाजन नगर,
इंद्रप्रस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर,
अंबड, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद सी.बी.एस., जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद सी.बी.एस. जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक २५/०८/२००९
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी , जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. प्रशांत वसंतराव देशमुख ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०४.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. आपल्या कार्यालयाकडून अनुदानित माध्यमिक शाळेतील शिपाई पदाला मान्यता देतांना प्रस्तावासोबत कोणकोणती कागदपत्रे जोडावी लागतात.

२. शिपाई पदाच्या मान्यतेसाठी संस्थेने जास्त खप असणाऱ्या वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे का हे तपासले जाते का १

३. अनुदानित शाळेतील माध्यमिक विभागातील शिपाई कर्मचाऱ्यांची नावाची यादी नेमणूक दिनांक व इतर तपशील याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ७/८/२००९ च्या पत्राद्वारे कार्यालयातील दप्तरांत उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिली परंतु ज्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका सन १९८०ञ ते १९९९ या कालावधीतील आहेत त्याची नस्ती कार्यालयात आढळत नसल्याने देता येत नाही म्हणून कळविले. त्या विरोधात अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित राहिल्याने सुनावणी झाली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. परंतु कर्मचाऱ्यांच्या सन १९८० ते १९९९ पर्यंतच्या नेमणूकीची नस्ती शोध घेऊनहि आढळून आली नाही त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असे सांगितले. अपीलार्थीस कार्यालयांत उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली आहे.

माहिती पूर्ण मिळू न शकल्यामुळे अपीलार्थीचे समाधान झालेले नाही. तरी जन माहिती अधिकारी यानीं कसोशिन शोध मोहिम राबवावी व हरवलेल्या नस्तीचा शोध घ्यावा व त्याचप्रमाणे माध्यमिक शाळा संहिता १९३ तपासून निवड नस्तीचे कागदपत्र किती कालावधीसाठी जतन करावे लागतात ते पहावे व त्या अनुषागाने अपीलार्थीनी मागितलेली उर्वरित माहिती देण्याचा प्रयत्न करावा. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या देखरेखीखाली शोध मोहिम राबवावी.

<u>*---आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: १९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०१/०२

श्री. अरुण भगवान चौधरी ------ अपीलकर्ता
मातोश्री जयबजरंग कॉलनीजवळ,
सब स्टेशन रोड, मालेगांव कॅम्प, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सर्वोदय शिक्षण संस्था संचलित प्राथमिक विद्यामंदिर,
नव वसाहत सोयगांव, ता. मालेगांव, जि.नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक २०/०३/२०१०
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अरुण भगवान चौधरी, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०३.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.१०.२००९ रोजी अर्ज करुन १.श्रीमती. जयश्री मुरलीधर वाघ (उप शिक्षिका) ,(२) श्रीमती. ज्योती अरुण चौधरी ,(३) श्रीमती. संगिता नरहर क्षिरसागर तीनही उप शिक्षकांचे पगारपत्रकांची दि. १/१०/२००० पासून ते आजअखेर पर्यंतच्या प्रती मिळण्याबाबत.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २६/११/२००९ अन्वये उपलब्ध माहिती दिली. परंतु तिन्ही शिक्षकांचे लेखा परिक्षण झालेले पगारपत्रक फाईल माहे मार्च २००० ते फेब्रूवारी २००८ पर्यंत पगारपत्रक, सेवाजेष्ठता रजिस्टर व रु. १००/- चा स्टॅम्पपेपर असलेली पिशवी हरवली आहे त्याची तक्रार पोलीस चौकीत दिली असल्याचे अपीलार्थीस कळविण्यांत आले.

योग्यती माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस प्रथम अपिलीय अधिकारी यांनी , जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकूण माहितीच्या ४५ (पाने) प्रती विनामूल्य पुरविली आहे. त्याचप्रमाणे संबंधित कागदपत्रांची बॅग हरवलेली आहे त्याच्या पोलीस तक्रारीची प्रत अपीलार्थीस पुढील ८ दिवसांत देण्यात यावी असे आदेश पारित केले. परंतु या कार्यवाहीने अपीलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थी यांनी माहिती अपूरी व दिशाभूल करणारी दिली. पोलीस ठाण्यांत चौकशी केली असता बॅग हरवल्याची नोंद त्यांच्या रजिस्टरमध्ये सापडली नाही असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, कार्यालयांत उपलब्ध असलेली सर्व माहिती दि. ३/२/२०१० व १५/२/२०१० रोजी पुरविली आहे व अपीलार्थींनी ती लेखी स्वीकारली आहे अशी पोहच आहे. त्याचप्रमाणे जे कागदपत्र हरवले आहेत /उपलब्ध नाहीत त्यांची सबळ कारणे दिली आहेत. हरविलेल्या कागदपत्रांच्या तक्रारीबाबत पोलीस स्टेशनकडे पाठपुरावा करावा, जेणेकरुन उर्वरित माहिती अपीलार्थीस देता येईल व त्यांचे समाधान होईल. तसेच पोलीस स्टेशनमध्ये जी तक्रार दिली त्याच्या पावतीची प्रतहि अपीलार्थीस द्यावी.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: १९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००७/२७५२६/तक्रार क्रमांक १७४/०१

श्री. आलोक जोशी -----तक्रारदार
एक्झिक्युटिव्ह प्रोडयूसर, सीएनबीसी- आवाज,
एम्पायर कॉम्प्लेक्स, ४१४, सेनापती बापट मार्ग,
मुंबई ४०० ०१३.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी ----उत्तरवादी
द्वारा- चिफ एक्झिक्युटिव्ह ऑफिस,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

तक्रारदार श्री. आलोक जोशी यांनी दि. ३ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या तक्रारबाबत दि. २१/६/२०१० रोजी चौकशी करण्यांत आली. त्यावेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदारांच्या तक्रारीबाबत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले.

" सहायक अभियंता-१ (झो.पु.प्रा.)/ जन माहिती अधिकारी म्हणून दि. १६/१०/२००७ रोजी के/पश्चिम प्रभागाचा कारभार स्वीकारल्यानंतर या विभागातील प्रलंबित माहितीचे अर्ज निकाली काढण्यास सुरुवात केली त्या अनुषंगाने दि. १४/१२/२००७ रोजीच्या पत्राद्वारे अर्जदारास संबंधित धारिणीचे निरीक्षण करण्याकरीता कळविण्यात आले. तद्नंतर अर्जदाराने दि. १०/६/२००८ रोजी पाठविलेल्या पत्रातील मजकूर वाचल्यावर दि. १९/६/२००८ रोजी त्यांच्या भ्रमणध्वनी क्र. ९८१९ ९२५८०४ वर संपर्क साधून त्यांना त्यांच्या वेळी व सोयीनुसार धारिणीचे निरीक्षण करण्याकरीता कळविण्यात आले व अंतिमतः त्यांनी सांगितल्याप्रमाणे संबंधित विक्री घटकातील इमारतीचे बांधकाम सुरु करण्याची परवानगी प्रत त्यांना देण्यात आली.

अर्जदाराचे दि. ३/११/२००७ च्या पत्रातील परिच्छेद क्र. ३ वरुन विकासकाने त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे तक्रार का केल्याचे फोन केल्याचे कळविले. तरी याबाबत आपणास असे सादर करु इच्छितो की, सदर विषयाबाबत जन माहिती अधिकारी म्हणून प्रथमतः अर्जदाराचे दि. १९/११/०७ चे अपिलीय अर्जान्वये सदर विषयाबाबतची प्रथम ओळख झाली. त्यामुळे याबाबत जन माहिती अधिकारी म्हणून मला काही कल्पना नाही.

सदर विषयाबाबत राज्य माहिती आयोगाचे दि. २२/९/०९ च्या यापूर्वीच्या संदर्भानुसार दि. २९/९/२०१० रोजी सचिव, राज्य माहिती आयोग यांना परिच्छेद ३ बाबतचे मौखिक स्पष्टीकरण देण्यात आले व त्यांच्या निर्देशानुसार असे प्रकार पुन्हा होऊ नये याकरिता योग्य खबरदारी घेण्यात यावी याबाबत सचिव(झो.पु.प्रा.) यांना सादर करण्यात आली. सचिव (झो.पु.प्रा.) यांनी एका सभेत याबाबतचे योग्य निदेश /सूचना सर्व कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना दिले. "

जन माहिती अधिकाऱ्यांचे उपरोक्त निवेदन मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***-----आदेश----***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: २१.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/३६८०५/तक्रार क्रमांक ८९९/०१

श्री. जगदिशचंद्र श्यामजी गोहिल -----तक्रारदार
जगतदेव चाळ, कस्तुरबा क्रॉस रोड नं.७,
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी.रोड, चेंबूर (पूर्व) मुंबई ४०० ०७१. ----उत्तरवादी

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (मुंबई उपनगर) ४ था मजला, आर.सी. रोड, चेंबूर (पूर्व) मुंबई ४०० ०७१.

---*विवेचन*---

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दि. २५/११/०८ रोजीच्या पत्राने आयोगाकडे प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियमान्वये शास्तीचा अधिकार नसल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी पारित केलेले शास्तीचे आदेश रद्द करावेत अशी विनंती व तक्रार केलेली आहे.

या तक्रारीची सुनावणी दि. २१/६/२०१० रोजी घेण्यांत आली त्यावेळेला तक्रारकर्ते अनुपस्थित, मुळ अर्जदार उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांना जरी शास्तीचा अधिकार नसला तरी वरील शास्तीचे आदेश हे राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी त्यांना असलेल्या अधिकारात कायम केलेले आहेत. त्यामुळे तक्रारदारांची तक्रार ही अमान्य करण्यात येत आहे.

----*आदेश*----

तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दि. २१/६/२०१०.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१८/०२

श्री. काळू कचरु केदारे ------ अपीलकर्ता
हरिभक्ती धाम, अ/१० शिक्षक सहजीवन हौसिंग सोसायटी,
दिपाली नगर, नाशिक- ९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
तालुका पंचायत समिती इगतपुरी, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक ०१/१२/२००८
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जेनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. काळू कचरु केदारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व उपस्थित होते, अपिलार्थी अनुपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०७.२००८ रोजी अर्ज करुन चट्टोपाध्याय समितीने दिलेली वेतनश्रेणी १/१/१०८६ पासून व मुख्याध्यापकांना दि. ३१/१२/१९९५ अखेर नेमणूक झाल्यावर एक वेतनवाढ देऊन फरक अदा करण्याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती न दिल्याच्या कारणावरुन त्यांनी कार्यालयाकडे प्रथम अपील दाखल केले. त्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस माहिती देण्याचे निर्देश दिले. प्रथम अपीलावरील उत्तराने अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. उत्तरवादी हजर होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी शिक्षक सेवानिवृत्त झाले असल्याचे व मागितलेली माहिती दि. १/१/८६ पासूनची असल्याने ३२ सेवा पुस्तकापैकी ८ सेवापुस्तकांचीच वेतनपडताळणी करण्यात आली. इतर सेवापुस्तकांची पडताळणी करुन घेण्याबद्दल कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी वेतननिश्चित करुन लेखा अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन घ्यावी लागेल असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी सदर कामास वेळ लागणार असल्याने १ महिन्याची मुदतवाढ मागितली आहे.

त्यामुळे जसजशी सेवापुस्तके पडताळणी पूर्ण होईल त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करावी लागेल. तेव्हा प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी याची स्वत: जबाबदारी घेऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे काम लवकरांत लवकर करुन घेऊन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: २१.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१५/०२

श्री. कैलास पुंजाराम सरग ------ अपीलकर्ता
रा. मेहुणे, ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ------- उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
गो.य. पाटील माध्य व उच्च माध्य. विद्यालय,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक १७/१०/२००८
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. कैलास पुंजाराम सरग यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी , जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३०.०६.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली.

१. इयत्ता ११ वी आर्टस या शैक्षणिक वर्ष १९९३-९४ चा १ मे १९९४ रोजी निकाल जाहीर झाला तो निकाल ज्या वार्षिक निकालपत्रावरुन जाहीर झाला त्या वार्षिक निकालपत्राची

छायांकित प्रत प्रमाणित करुन मिळावी.

२. दि. २७/८/२००८ च्या पत्राची छायांकित प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १/८/२००८ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती १० वर्षापूर्वीची आहे. त्यासाठी मागील रेकॉर्ड उपलब्ध होणे आवश्यक आहे. जे उपलब्ध झाले की माहिती देण्यांत येईल. त्याचप्रमाणे आपण मागितलेल्या आपल्याच पत्राची प्रत आपणाकडेच असल्याने ती देण्याचा प्रश्न येत नाही. परंतु माहितीच्या प्रतीसाठी होणारा खर्च रु. २५/- त्वरित पाठवावा. माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर दि. ८/९/२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. परंतु प्रत्यक्षांत सुनावणी घेण्यात आली नाही. त्यामुळे अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थीस स्वःखर्चाने हस्तपोच माहिती देणार आहे. माहिती देण्यास तयार असल्याने काही कालावधी मिळावा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी का घेतली नाही याचा समाधानकारक खुलासा त्यांनी केला नाही. जबाबदार अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे वागणे योग्य नाही. अपीलावर सुनावणी घेणे त्यांना बंधनकारक आहे हे लक्षात ठेवावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ५ दिवसांत माहिती देत असल्याचे सांगितले व अपीलार्थींनीही त्यास सहमती दर्शविली.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः २१.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/२०८/तक्रार क्रमांक ८१०/०१
क्रमांक-मु.मा.आ/२०१०/४२३/तक्रार क्रमांक८११ /०१
क्रमांक-मु.मा.आ/२०१०/१०३४/तक्रार क्रमांक ८१२ /०१

सौ. विशाखा विनायक इंगळे -----तक्रारदार
बी-६, अलंकार को.ऑप.हौ. सोसायटी,
नवीन टिळक नगर, चेंबूर (प) मुंबई ४०० ०८९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
३ रा मजला, एफ/दक्षिण विभाग, डॉ. आंबेडकर मार्ग,
परेल, मुंबई ४०० ०१२.

२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण खाते,
लखमजी नप्पू रोड, हिंदू कॉलनी, दादर (पूर्व)
मुंबई ४०० ०१४.

***---विवेचन---***

वरील तिन्ही तक्रारींच्या विषयासंदर्भातील अपील क्र. ५२५७/०२ हे दि. २८/१/२०१० रोजी आयोगाने ऐकले व अपीलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश त्याचदिवशी देण्यांत आले.

अपीलार्थीस त्याप्रमाणे माहिती देण्यांत आलेली नाही अशी तीन तक्रारी तक्रारदारांनी आयोगाकडे केलेल्या आहेत त्याची सुनावणी दि. २१/६/२०१० रोजी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" मु.मा.आ/२००९/४५१४२/अपील क्र.५२५७/०२ दि. २८/१/२०१० वरील अपीलानुसार दि. २०/२/२०१० रोजी माहिती तयार होती. त्याचदिवशी श्रीमती. विशाखा इंगळे या शिक्षणाधिकारी यांच्या दादर हिंदू कॉलनी कार्यालयात प्रशासकीय अधिकारी (का) यांची भेट घेतली असता प्रशासकीय अधिकारी(का)यांनी सुनावणीच्या आदेशानुसार बदलीच्या आदेशाची ७१५ पृष्ठे एवढी

माहिती घेऊन जाणेबाबत त्यांना सांगितले. तेव्हा श्रीमती. विशाखा इंगळे या थोडया वेळाने माहिती घेऊन जाते त्या परत कार्यालयात आल्या नाहीत. त्यामुळे त्यांना या कार्यालयाच्या क्र. EOC/अेडी/ २२८/२४/३/२०१० रोजी टपालाने पत्र पाठविण्यात आले. आज दि. २१/६/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यांना द्यावयाची माहिती कार्यालयात सोबत आणली आहे.

आज दि. २१/८/१० रोजी मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे सुनावणी झाली. सोबत श्रीमती. विशाखा इंगळे (प्र.शि.) यांना माहितीची कागदपत्रे देण्यासाठी आणली होती. वरिष्ठ स्वीय सहायकासमोर ती देऊ केली परंतु श्रीमती. इंगळे यांनी ती स्वीकारली नाही. प्रशासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय व आर्थिक नुकसान श्रीमती. इंगळे करत आहेत. "

तक्रारदारांस आयोगाच्या निर्देशाप्रमाणे द्यावयाची माहिती तयार आहे त्याचा त्यांनी स्वीकार करावा असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

तिन्ही तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: २२.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/४५०५२/तक्रार क्रमांक ८७६/०१

श्री. चेतन कोठारी -----तक्रारदार
५२, ओशियानी अपार्टमेंट, डॉ. राजाबाली पटेल लेन,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप ----उत्तरवादी
शिधावाटप विभाग, ई विभाग, चंचल स्मृती बिल्डींग,
१ ला मजला, जी.डी. आंबेडकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१.

२. जन माहिती अधिकारी
शिधावाटप विभाग, नं ३१- ई, पीडब्ल्यू डी कंपाऊंड,
किंग सर्कल, रफी अहमद किडवाई रोड, माटुंगा १९

*---विवेचन---*

तक्रारीचा दिनांक २/११/२००९
सुनावणीचा दिनांक २१/६/२०१०
तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदारांच्या तक्रारीतील मुद्दयांबद्दल प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विस्तृत निवेदन दिलेले आहे ते पुढीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| २५/०८/२००९ | अपीलकर्ता श्री.चेतन कोठारी यांनी माहितीचा अधिकार, अधिनियम २००५,अंतर्गत माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, शि.का क ३१-ई यांच्याकडे अर्ज केला. |
| ०५/०९/२००९ | माहिती अधिकारी यांनी पत्र क्र.३१ई/ममाअ/०९/जा१८२२ दि.५/९/२००९ नुसार माहिती दिलेली आहे. |

अपिलीय अधिकाऱ्यांकडील कार्यवाहीचा तपशील.

| | |
|---|---|
| १९/०९/२००९ | प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. |
| १९/१०/२००९ | अपीलाची सुनावणी सकाळी ११-०० वा ठेवली. |

श्री.कोठारी यांचे दि. २५/८/०९ चे अर्जास दि. ०५/०९/२००९ रोजी माहिती दिलेली आहे.

श्री. कोठारी यांनी विहित मुदतीमध्ये माहिती मिळालेली असतानाही दि.१९/०९/०९ रोजी अपील दाखल केलेले आहे.

श्री.कोठारी यांचे अपील अर्ज विहित नमुन्यात नाही. विहित नमुन्यामधील प्रतिज्ञापत्र सोबत जोडलेले नाही. सबब अपील नाकारणे शक्य असतानाही कार्यालयोन स्वीकारलेले आहे.

मी उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी )या पदी रॉयल इन्शुरन्स इमारत चर्चगेट येथे कार्यरत आहे. दि. १४/१०/२००९ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ या कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार मी स्वीकारलेला आहे.

दिनांक १९/१०/२००९ रोजी मला प्रधान कार्यालयामध्ये तातडीचे कामासाठी थांबणे आवश्यक होते. सदर बैठकीनंतर दुपारी १२-०० वाजता मी अपीलाचे सुनावणीसाठी कार्यालयामध्ये हजर होतो.

श्री. कोठारी यांना मी दूरध्वनीवरुन शक्य असल्यास थांबण्याची विनंती केलेली आहे. परंतु त्यांनी कार्यालयात थांबण्यास नकार देऊन माहिती त्यांचे घरी पाठविण्यास सांगितले.

माहिती अधिकारी शिधावाटप अधिकारी ३१-ई यांनी योग्य माहिती दिलेली असतांनाही, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत पुन्हा सदर इमारतीमध्ये भेट देऊन, इमारतीचे पहारेकरी यांचेकडे विचारणा करुन अर्जदारास दि.४/११/२००९ रोजी कुरीयर ने माहिती दिलेली आहे.

वडाळा येथील शिधावाटप कार्यालयामध्ये मंजूर कर्मचारी वर्गापैकी केवळ ५०% कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच शिधावाटप यंत्रणेमधील क्षेत्रीय कर्मचारी दुपारी १२-०० वाजेपर्यंत त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत असतात. त्यामुळे कार्यालय रिकामे असल्याचा समज श्री.कोठारी यांचा झालेला आहे.

श्री.सावंत , अपिलीय अधिकारी यांचा कार्यभार मी दि. १४/१०/०९ रोजी (मा.नं) स्वीकारलेला आहे. अपिलीय अधिकारी यांचे नावाचा फलक तयार करण्यास दिलेला असल्याने, त्यापूर्वीचे अपिलीय अधिक्‌ारी यांचे नावाचा फलक बदलण्यात आलेला नव्हता. सदर बाब अर्जदाराचे निदर्शनास आणलेली आहे.

कार्यालयामध्ये तक्रार नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.

**तक्रारदारांनी प्रथम कांही माहिती व नंतर पूर्ण माहिती मिळाल्याचे सुनावणीच्या वेळेला सांगितले. निवेदनातील मुद्दे लक्षात घेता व तक्रारदारांच्या तक्रारीचे झालेले निराकरण लक्षात घेता पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश----***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांकः २२.०६.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/४४३४४/तक्रार क्रमांक५९३/०१

श्री. चेतन कोठारी -----तक्रारदार
५२, ओशियानी अपार्टमेंट, डॉ. राजाबाली पटेल लेन,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव ----उत्तरवादी
गृह विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
गृह विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई ३२.

*---विवेचन---*

तक्रारीचा दिनांक १/१०/२००९
सुनावणीचा दिनांक २१/६/२०१०
तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला तक्रारदारांच्या तक्रारीमध्ये जो विषय आहे त्यासंदर्भात आयोगाकडील जे अपील क्र. ५६५४/०२ अपील चालविण्यात आले होते त्यात दि. ११ मे, २०१० रोजी जे आदेश पारित केले होते त्यासंदर्भात आयोगाच्या निर्देशाप्रमाणे गृह विभागाने पोलीस आयुक्तांना आर.टी.आय २००९/१७५३/प्र.क्र.६५४/पोल ४ दि. ३ जून २०१० क्रमांकाचे जे पत्र लिहिलेले आहे ते जन माहिती अधिकारी यांनी सादर केले ते पुढीलप्रमाणे -

" श्री. चेतन कोठारी यांनी दि. ३/१०/२००९ च्या अर्जान्वये दि. २६/१/२००८ रोजी घडलेल्या घटनेसंदर्भात कोस्टल सिक्युरिटीसाठी घेतलेल्या स्पीड बोटी, त्यांचे मेंटेनन्स, पर्सोनेल वगैरे बाबतीत माहिती मागितलेली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार शासनपत्र क्रमांक आरटीआय १००९/१७५३/प्र.क्र.६५४/पोल-४ दि. २१/१/२०१० अन्वये शासनाकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आली. तथापि, राज्य गुप्तवार्ता विभागाने अर्जदारास त्यांचेकडे असलेली माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अर्जदाराने दि. २१/२/२०१० ला द्वितीय अपील केले. सदर अपीलावर दि. ११/५/२०१० रोजी सुनावणी होऊन आयोगाने

खालीलप्रमाणे आदेश दिलेत.

कोस्टल सिक्युरिटी सारख्या संवेदनक्षम विषयाच्या बाबतीत २६/११/२००८ रोजी घडलेल्या घटनेच्या संदर्भात आश्वस्थ करणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच यासंदर्भात ज्या गोष्टी गोपनीय राहणे आवश्यक आहे त्या गोपनीय ठेवणे हेही तेवढेच आवश्यक आहे. त्यामुळे याबाबतीत कोस्टल सिक्युरिटी या विषयावर कलम ४ खाली प्रशासनाने स्वतःहूनच द्यावयाची माहिती ही पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी माहिती तयार करावी व ती जनतेसाठी उपलब्ध करुन द्यावी. हे करीत असतांना अपीलार्थीच्या अर्जाचा विचारही करण्यात यावा. जेणेकरुन सर्वसाधारणपणे कशा पध्दतीची माहिती अपेक्षित असते व कोणती माहिती द्यावयाची किंवा नाही याचा विचार पोलीस आयुक्तांच्या सर्वोच्च पातळीवर होऊ शकतो. जेणेकरुन जनतेची माहितीची गरज, त्यांच्यातील सुरक्षिततेची भावना तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती गोपनीयता या तीनही बाबींचा सर्व समावेशकपणे एकत्रित विचार करुन जनतेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी गृह विभागाने अपीलार्थींचा अर्ज पोलीस आयुक्तांकडे पाठवावा व त्यांनी अशा प्रकारे माहिती तयार करुन ती जनतेला व अपीलार्थीस द्यावी.

आयोगाच्या आदेशानुसार याप्रकरणी कार्यवाहीसाठी श्री.चेतन कोठारी यांच्या दि. ३/१/९९ च्या अर्जाची प्रत तसेच मा.आयोगाने दिलेल्या आदेशाची प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे. "

नुकतीच पोलीस आयुक्तांची बदली होऊन नवीन पोलीस आयुक्त त्याठिकाणी रुजू झाले आहेत. त्यामुळे आयोगाने जी माहिती देण्याचे पोलीस आयुक्तांना निर्देश दिले आहेत ती माहिती १५ जुलै, २०१० पर्यंत देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

***----आदेश----***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
या आदेशाची प्रत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनाही देण्यात यावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः २२.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/८५२/तक्रार क्रमांक८४४/०१

श्री. चेतन कोठारी -----तक्रारदार
५२, ओशियानी अपार्टमेंट, डॉ. राजाबाली पटेल लेन,
बी. देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय अभियंता ----उत्तरवादी
ग्राहक देखभाल (कस्टमर केअर) ए वॉर्ड,
बेस्ट (विद्युत)भवन, बेस्ट मार्ग, १ ला मजला,
कुलाबा, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी
विभागीय अभियंता कार्यालय
ग्राहक देखभाल (कस्टमर केअर) ए वॉर्ड,
बेस्ट (विद्युत)भवन, बेस्ट मार्ग, १ ला मजला,
कुलाबा, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

तक्रारीचा दिनांक २९/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २१/६/२०१०
तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदारांनी मागितलेली माहिती फार विस्तृत प्रमाणावर असल्यामुळे ती मुदतीत देता येऊ शकली नाही. मात्र तक्रारदारांना आता परिपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी मान्य केले व आता त्यांची कांहीही तक्रार राहिलेली नाही.

***---आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: २२.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/२१३५३/अपील क्र. ५८०७/०२
मुमाआ/अपील/ २००९/२१३५३/अपील क्र. ५८०८/०२
मुमाआ/अपील/ २००९/२१३५३/अपील क्र. ५८०९/०२
मुमाआ/अपील/ २००९/२१३५३/अपील क्र. ५८१०/०२

श्री. डॉ. गंगाधर वैद्य ------ अपीलकर्ता
घर नं. ४४१०, निंबाळकर गल्ली,
अहमदनगर, ४१४ ००१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक आयुर्वेद ------- उत्तरवादी
आयुर्वेद संचालनालय, शासकीय दंत महाविद्यालय
व रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्ज कंपाऊंड
पी. डिमेला रोड, फोर्ट , मुंबई ४०० ००१.
जन माहिती अधिकारी
संचालक आयुर्वेद कार्यालय
आयुर्वेद संचालनालय, शासकीय दंत महाविद्यालय
व रुग्णालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्ज कंपाऊंड
पी. डिमेला रोड, फोर्ट , मुंबई ४०० ००१.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक ४२२ ००४.
जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक ४२२ ००४.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, विश्रामबाग,
अहमदनगर.
जन माहिती अधिकारी
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, विश्रामबाग,
अहमदनगर.

४. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य
गं.शा गुणे आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर.
जन माहिती अधिकारी
गं.शा गुणे आयुर्वेद महाविद्यालय,
अहमदनगर.

***- वि वे च न -***

अपीलार्थीचे चारहि अर्ज हे त्यांच्या सेवाविषयक प्रश्नांच्या बाबतीत असल्यामुळे या सर्वांची एकत्रित सुनावणी घेण्यांत आली.

अपीलार्थीचे अर्ज हे कांही माहितीची मागणी, कांही तक्रारी, कांही त्यांच्या एखादया विषयाविषीचे भाष्य व काही संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांचे मागितलेले मत अशा स्वरुपाचे आहेत.

या चारहि अपीलांच्या बाबतीत सर्व पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, अपीलार्थी हे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. व हायकोर्टाच्या आदेशानुसार राज्य शासनाने त्यांना १९८८ सालापासून प्राध्यापक पदाची श्रेणी देण्याचा निर्णय घेतला असला तरी त्या संदर्भातील नोंद त्यांच्या सेवापुस्तकात झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

श्रीयुत वैद्य यांच्या वेतनश्रेणीच्या बाबतीत शासनाचे जे आदेश असतील त्याप्रमाणे त्यांच्या सेवापुस्तकामध्ये नोंद असणे हे आवश्यकच आहे. त्याप्रमाणे सेवापुस्तकामध्ये नोंद होऊन त्याची प्रत अपीलार्थीना देण्याचे निर्देश देण्यांत आले.

अपीलार्थींचा आणखीन एक मुद्दा की त्यांना सेवानिवृत्तीनंतर रजा रोखीकरणाचा होता. त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा संचालक, आयुर्वेद यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारचे रजा रोखीकरण त्यांना अनुज्ञेय नाही. व त्यासंदर्भातील कागदपत्रेही अपीलार्थीस देण्यात आलेले आहेत.

विद्यापीठाकडून मागितलेल्या माहितीच्या बाबतीत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस योग्य ते स्पष्टीकरण व माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

माहितीच्या अधिकारामध्ये आपले मत व्यक्त करुन इतरांचे त्यावरील भाष्य विचारणे किंवा

एखादया प्रश्नाविषयी जन माहिती अधिकारी किंवा इतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मत विचारणे हे "माहिती " या संज्ञेमध्ये येत नाही. अशा प्रकारचे मत नस्तीमध्ये आधीपासून अस्तित्वात असेल तर त्याची प्रत मिळू शकेल. त्यामुळे विद्यापीठाने दिलेले उत्तर हे योग्य वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

चारहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
महाविद्यापीठाच्या प्राचार्यांनी सेवापुस्तकाच्या बाबतीत योग्यती कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः २२.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६७८०/अपील क्र. ५८०६/०२

श्री. सैफुद्दीन मुक्रा ------ अपीलकर्ता
बी-२३, ५ वा मजला, गौतम अपार्टमेंट,
जयप्रकाश रोड, सातबंगला, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र) ------ उत्तरवादी
के/पश्चिम वॉर्ड, मुबई महानगरपालिका,
पालिराम पथ, २ रा मजला, अंधेरी (पश्चिम)

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.प्र)
के/पश्चिम वॉर्ड, मुबई महानगरपालिका,
पालिराम पथ, २ रा मजला, अंधेरी (पश्चिम)

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक ८/२/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाच्या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केलेले आहे.

" अर्जदार श्री. सैफुद्दीन मुकरा यांनी दि. २४/०४/२००९ रोजी सहायक अभियंता (इ.व का) के/प यांच्या कार्यालयात माहितीचा अधिकार २००५ अधिनियमान्वये अर्ज करुन वर्सोवा गौतम अपार्टमेंट को.ऑप.हौ.सोसायटी येथील मोडकळीस आलेल्या गॅरेजवर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती विचारली होती. सदर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जास या कार्यालयामार्फत दि. ३०/९/२००९ रोजी सआकेप/ई व का/२४३७९/आरटीआय/II या क्रमांकान्वये उत्तर पाठविले होते.

अर्जदार श्री. सैफुद्दीन मुकरा हे कार्यालयामार्फत पाठविलेल्या उत्तराने समाधान

नसल्याकारणाने त्यांनी दि. ३०/१०/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी के/प विभाग यांच्याकडे प्रथम सनावणीकरीता अर्ज केला होत. सदर सुनावणी दि. १९/११/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी विभाग कार्यकारी अभियंता के/प यांच्या कार्यालयात ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी विभागीय कार्यकारी अभियंता के/प विभाग यांनी सार्वजनिक माहिती अधिकारी सहायक अभियंता (इ.व.का) यांना वर्सोवा गौतम को.हौ.सो. येथील मोडकळीस आलेल्या गॅरेजवर मनपा अधिनियमाच्या २५१ कलमान्वये कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

सदर आदेशानंतर सहायक अभियंता (इ.व.का) के/प यांनी वर्सोवा गौतम अपार्टमेंट को.हौ.सो. येथील गॅरेजधारकास मनपा अधिनियमाच्या २५१ कलमान्वये करण्यात आलेल्या कारवाईखाली दि. २४/१२/२०१० रोजी अंतिम आदेश दिले होते.

अंतिम आदेश दिल्यानंतर एका गॅरेज धारकानी या कार्यालयास CE/7852/BSIT/AK दिनांक २९/०६/१९८२ रोजी कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव यांच्यातर्फे मंजूर करण्यात आलेल्या गॅरेजचा नकाशा सादर केला होता. सदर नकाशात दाखविलेल्या गॅरेजची स्थिती ही जागेवर असलेल्या गॅरेज सोबत जुळत नसल्याकारणे सदर मोडकळीस आलेल्या गॅरेजचे निष्कासन या कार्यालयामार्फत वर्सोवा पोलीस ठाणेच्या मदतीने दि. ०९/०२/२०१० रोजी केलेले आहे. "

यावरुन अपीलार्थींना अभिप्रेत असणारी कारवाई झाल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशात जी कारवाई करण्याचे निर्देश कार्यकारी अभियता यांनी दिले होते त्यासंबंधीचा अहवाल त्यांना पाठवावा व त्याची प्रत अपीलार्थीस माहिती म्हणून देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २२.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५७४/अपील क्र.५८०५/०२

श्री. मुकुंदम गुडीमेल्ला ------ अपीलकर्ता
गुरुकृपा , रु नं. ९५/१, आंबेडकर चौक,
पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ७५.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
अभियंता विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी
अभियंता विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २०/०३/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलास अनुसरुन पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.

" अपीलार्थी यांनी २००५ योजनेतील तात्पुरते संक्रमण शिबीराबाबत माहिती विचारली होती. सदर अर्जाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी क्र. झोपुप्रा/अभि/माअ/३९९४ दिनांक ०७/०५/२०१० अन्वये देण्यात आले. अर्जदाराने सदर माहितीचे विहित शुल्क भरल्यानंतर अर्जदारास दि. १६/६/२०१० अन्वये माहिती देण्यात आली.

यापूर्वी सुध्दा सदर अर्जदाराने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जे अर्ज

सादर केले त्या सर्व अर्जाना जनमाहिती अधिकारी यांनी उत्तरे दिली आहेत.

वरील विवेचनावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सादर केलेल्या सर्व अर्जास उत्तरे दिली असून योग्य ती माहिती पुरविण्यांत आली आहे. तसेच अर्जदारास खोटी माहिती देणे, दिशाभूल करणे असा कुठलाही जन माहिती अधिकाऱ्यांचा उद्देश नसल्याचे दिसून येते. यास्तव जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंबाने माहिती न देता ती वेळेवर देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून यते. तसेच उपरोक्त संदर्भानुसार अपीलकारास लेखी स्वरुपात खुलासा/माहिती क्र. झोपुप्रा/अभि/२९५ दिनांक १८/६/२०१० अन्वये देण्यात आली आहे."

रेकॉर्डप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २२.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५७५/अपील क्र.५८०४/०२

श्री. वसंत उटीकर ------ अपीलकर्ता
तिरंगा, डी २०/०३ तळमजला,
सेक्टर २५, जुईनगर (पश्चिम) नवी मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (प्रशा) ------ उत्तरवादी
उपनगरिय विक्रीकर भवन इमारत, २ रा मजला,
बांद्रा- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहायक
विक्रीकर सह आयुक्त (प्रशासन)
उपनगरिय विक्रीकर भवन इमारत, २ रा मजला,
बांद्रा- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २२/०३/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या दि. १२/१/२०१० रोजीच्या पत्राने जी माहिती दिली होती त्यात दि. ३१/१२/२००९ च्या ऐवजी ३१/१०/२००९ रोजी कार्यमुक्तीचा दिनांक नमूद करण्यात आला होता ही बाब लक्षात येताच चुकीचे निराकरण करुन घेण्यासाठी शासकीय माहिती अधिकारी यांनी दि. १५/१०/२०१० च्या पत्रान्वये नव्याने माहिती पुरविली.

अपीलार्थीचे म्हणणे अशा पध्दतीचे शुध्दीपत्रक काढता येत नाही.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर झालेली चुक ही क्लेरिकल स्वरुपाची आहे व एकदा झालेली चुक लक्षात येताच त्वरित दुरुस्त करण्यात आली ही गोष्ट योग्च आहे असे आयोगास वाटते. त्यामुळे अपीलार्थी ज्याप्रमाणे शास्ती लावण्याचा आग्रह करीत आहेत ते योग्य वाटत नाही.

## *----आदेश----*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २२.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/---/अपील क्र.५८११/०२

श्रीमती. कांचन बापर्डेकर ------ अपीलकर्ता
२/३३, मयुर सोसायटीची चाळ नं. २,
कॉलेज लेन, दादर (पश्चिम) मुंबई २८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मत्स्य आयुक्त ------ उत्तरवादी
तारापोरवाला मत्स्यालय, चर्नी रोड (पश्चिम)
मुंबई .

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
तारापोरवाला मत्स्यालय, चर्नी रोड (पश्चिम)
मुंबई .

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १४/१२/२००९
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना पुढील माहिती पाहिजे होती.

"अे. दि. १६/९/०२ व ६/१०/०२ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत एकदा विकलेले गाळे पुन्हा अन्य खरेदीदाराना विकण्याच्या ठरावाला आक्षेप असा विषय असलेल्या वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या श्री. जगन्नाथ हरी वैती या सचिवानी संस्थेच्या लेटर हेडवर उपनिबंधक मत्स्य यांना दि. ४/३/२००४ रोजी दिलेल्या पत्राची छायांकित प्रत साक्षांकित करुन मिळावी. तसेच वर नमूद विषय असलेल्या वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या श्री.

तुकाराम महादेव वरळीकर , श्री. सुरेश शंकर पाटील व सौ. किशोरी लिलाधर नाखवा या ३ कार्यकारिणी सदस्यांनी ही त्याच दरम्यान दिलेल्या पत्राची साक्षांकित प्रत मिळावी.

बी. सदर दिलेल्या दोन्ही पत्रास अनुसरुन उप निबंधक मत्स्य यांनी किंवा गमरे यांनी केलेल्या तपासाच्या व त्याबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अहवालाच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात.

सी. उपनिबंधक (मत्स्य) यांचे ऑफीस प्रशासकीय इमारत चेतना कॉलेज बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ येथून तारापोरवाला मत्सालय चर्नी रोड मुंबई २ येथे कोणत्या तारखेला शिफ्ट करण्यात आले ती तारीख कळवावी. "

अपीलार्थींनी मागितलेली माहिती त्यांना न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे. सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपीलार्थींना जी माहिती पाहिजे ती वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सहकारी सोसायटी.लिमि यांच्या संदर्भातील आहे व या सोसायटीचे माजी चिटणीस जगन्नाथ हरी वैती यांनी दि. ४/३/२००४ रोजी उपनिबंधकांना जे पत्र लिहिले आहे त्याची प्रत अपीलार्थीस पाहिजे आहे. वरळी कोळी समाज सहकारी सोसायटी यांनी सुध्दा आयोगास निवेदन दिलेले आहे.

उपनिबंधक तथा जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे की, त्यांचे कार्यालय तारापोरवाला मत्स्यालय येथे होते ते बांद्रा येथे स्थलांतरित करण्यात आले. त्यानंतर ते २००५ साली पुन्हा तारापोरवाला मत्स्यालय येथे स्थलांतरित करण्यात आले. या दरम्यान अपीलार्थीस हवी असलेली कागदपत्रे गहाळ झाली असण्याची शक्यता आहे. कारण रेकॉर्डला ती दिसून येत नाहीत.

ज्या दि. ४/३/२००४ रोजीच्या पत्राची प्रत अपीलार्थी मागतात ती त्यांना पोलीस स्टेशनकडून प्राप्त झालेली आहे व ती त्यांच्याकडे आहे. सोसायटीने दिलेल्या कागदपत्रांच्या वाचन केले असता असे दिसते की, हे पत्र खोटे आहे म्हणून त्यांनी मेट्रो पोलिटन मॅजिस्ट्रेटकडे अर्ज केला होता व मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेटनी दि. १८/१२/२००७ रोजीच्या आदेशाने सदरील पत्र खरे आहे किंवा बनावट याची चौकशी करण्याचे निर्देश दादर पोलीस स्टेशनला दिलेले आहेत. अशा परिस्थितीत सदरील पत्राच्या खरेखोटेपणाबाबत निकाल आधी झालेला बरा. माहिती म्हणूनच पाहिजे असेल तर सदरील पत्र हे अपीलार्थींच्या ताब्यात आहेच. मात्र श्रीयुत मगरे, सहकारी अधिकारी यांनी

**केलेल्या चौकशी अहवालाची प्रत ही सुध्दा सापडत नाही असे उपनिबंधक कार्यालयाचे म्हणणे आहे. या अहवालाची प्रत शोधून काढण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करावा व त्याची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी.**

**नस्ती गहाळ होण्याच्या संदर्भात मत्स्य व्यवसाय आयुक्तांनी कसोशीने चौकशी करणे आवश्यक आहे. ती चौकशी त्यांनी करावी व यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करावी.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी वर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**दिनांक: २४.०६.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६४३०/अपील क्र.५८१२/०२

श्री. मुकेश छेडा ------ अपीलकर्ता
विरसन्स विला, फ्लॅट नं. १७,
५ वा मजला, रानडे रोड, शिवाजी पार्क,
दादर (पश्चिम) मुंबई २८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
जी / नॉर्थ , हरिश्चंद्र येवले मार्ग,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (टि.पी. )
जी/नॉर्थ, वॉर्ड ऑफिस बिल्डींग , रुम नं. ३६,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १५/०१/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (बि.प्लान) यांनी दि. ४/१२/२००९ रोजी दिलेल्या आदेशाची S.P.I.O.Ex.Eng (B.P.) City-ii यांनी अजून अमलबजावणी केलेली नाही असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थीस महापालिका आयुक्त यांनी दि. २६/११/२००९ रोजी जी बैठक घेतली होती त्या बैठकीचे मिनिटस् पाहिजे होते.

हे आदेश मिळताच त्यांनी सदर बैठकीच्या मिनिटस्‌ची प्रत अपीलार्थीस द्यावी. जर मिनिटस्‌ लिहिले गेले नसतील तर तसे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

S.P.I.O.Ex.Eng (B.P.)City-ii यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अमलबजावणी का केली नाही याचा खुलासा १५ दिवसात आयोगास सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत S.P.I.O.Ex.Eng (B.P.)City-ii यांना पाठविण्यात यावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २४.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६४२८/अपील क्र.५८१३/०२

श्री. मिलिंद घाडगे ------ अपीलकर्ता
सी १:९/३:१ सेक्टर २,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबई १८.

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय,
वरळी बी.डी.डी. चाळ नं.५२, मुंबई १८.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १३/०१/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले.

अपीलार्थी श्री. मिलींद नाथा घाडगे यांनी अपील अर्जात नमूद केलेल्या विषयाबाबत आजपर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या सर्वच अर्जांना (१४) कार्यालयाने वेळोवेळी उत्तरे व कागदपत्रे दिलेली आहेत. अपीलार्थी मागत असलेली माहिती फार जुनी असल्याने तसेच या कार्यालयाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने ती पुरविण्यास काही प्रमाणात विलंब झाला. परंतु ती लपविण्याचा किंवा ती न पुरविण्याचा हेतू नव्हता.

श्री. मिलींद नाथा घाडगे हे एकाच विषयाची माहिती वेगवेगळया पध्दतीने मागवित

असल्याने व त्यांना माहिती पुरवुनही त्यांचे समाधान होत नसल्याने वरील परिस्थिती निर्माण झालेली आहे.

श्री. मिलींद नाथा घाडगे यांनी आजपर्यंत सादर केलेले अर्ज व त्यांना या कार्यालयाकडून देण्यात आलेली उत्तरे याची सुची व त्यांच्या छायांकित प्रती यासोबत आपल्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. यावरुन दिसून येईल की, या कार्यालयाने माहिती पुरविताना कोणतीही लपवाछपवी किंवा टाळाटाळ केलेली नाही. श्री.घाडगे यांनी केलेल्या अपील अर्जामधील मुद्दे सत्य नसून असत्य आहेत. श्री. घाडगे यांच्या अर्जातील मुद्दयांमध्ये काही तथ्य नसून या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती त्यांना वेळोवेळी पुरविण्यात आलेली आहे.

अपीलार्थीना ज्या बी.डी.डी. चाळ क्र. ५४ बाबत माहिती पाहिजे होती. त्याबाबत माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधित चाळीचे व्हेरिफिकेशन करण्यात आलेले आहे व त्यानुसार माहितीहि देण्यात आलेली आहे.

बी.डी.डी. चाळ ही जुनी चाळ असल्यामुळे माहिती गोळा करुन देण्यास झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे.

रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २४.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६५२/अपील क्र.५८१३/०२

श्री. सुनिल शिंदे ------ अपीलकर्ता
३०३, शांती निकेतन, उत्तर एस.सी २१,
प्लॉट नं. ८, गोराई बोरिवली (पश्चिम) मुंबई ९९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक ------ उत्तरवादी
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम यांचे कार्यालय,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ६०.

२. जन माहिती अधिकारी
शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम यांचे कार्यालय,
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ६०.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १५/०३/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, कांदिवली चारकोप या शाळेसंबंधी कांही माहिती पाहिजे होती. मात्र ती कायम स्वरुपी विनाअनुदनीत आहे म्हणून माहिती देण्यास शाळेने नकार दिला होता.

अपीलार्थीचा अर्ज हा शाळेला नसून शिक्षण निरीक्षक कार्यालयास केलेला आहे. तेव्हा या शाळेला दिलेल्या मंजूरी व मान्यतेबाबत अपीलार्थीनी जी माहिती मागितली आहे ती शिक्षण निरीक्षक कार्यालयात असलेल्या रेकॉर्डप्रमाणे अपीलार्थीस ५ दिवसांच्या आत देण्यात यावी. यास अपीलार्थी यांनी मान्यता दिली.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः २४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६४५/अपील क्र.५८१६/०२

श्रीमती. सिलिया डिसोजा ------ अपीलकर्ता
स.नं. २२, देगामवाला बिल्डींग,
४४, नेसबिट रोड, माझगांव, मुंबई १०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता ii
निवासी कार्यकारी अभियंता कार्यालय,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २९/०३/२०१०
सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थींना ज्या नस्तीच्या संदर्भात माहिती पाहिजे होती त्या नस्तीची संपूर्ण पहाणी करुन त्यांनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती व नकाशाच्या प्रती देण्यांत आलेल्या आहेत.

पुनर्विकास योजनेसंबंधी अपीलार्थींची कांही तक्रार असेल तर त्यांनी मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व.पु.मं. यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या तक्रारीचे निवारण करु शकतात.

रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः २४.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४७६४२/अपील क्र.५८१४/०२**

**श्री. मनोरंजन रॉय ------ अपीलकर्ता**
**१०५, जे. आर. म्हात्रे रोड,**
**जुहू रुईया पार्क, मोरे गांव, जुहू, मुंबई ४९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार ------ उत्तरवादी**
**हायकोर्ट, तळमजला, रूम नं. ८ व ९,**
**पी.डब्ल्यू.डी बिल्डींग, फोर्ट, मुंबई ३२.**

**२. जन माहिती अधिकारी**
**हायकोर्ट, तळमजला, रूम नं. ८ व ९,**
**पी.डब्ल्यू.डी बिल्डींग, फोर्ट, मुंबई ३२.**

***- वि वे च न -***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २३ मार्च २०१०**
**सुनावणीचा दिनांक २२/६/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस केस नं. PIL/98/2008 मध्ये दि. २६/३/२००९ रोजी मा. मुख्य न्यायधिश यांचेसमोर झालेल्या संवादाची CD पाहिजे होती.**

**असे संवाद रेकॉर्ड करण्यात येत नसल्यामुळे अपीलार्थीस CD देता येत नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.**

**तसेच अपीलार्थींच्या इतर मुद्दयाबाबत हायकोर्ट राईट टू इन्फर्मेशन (सुधारित) नियम २००९ प्रमाणे अर्ज केल्यास अपीलार्थीस माहिती मिळू शकेल असेही जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केलेले आहे.**

अपिलीय अधिकाऱ्यांनी प्रोसिडींग रेकॉर्ड करण्याची पध्दत नाही हे म्हणणे कायम केले. तसेच जर अपीलार्थीनी एखादे पत्र दिले असेल तर त्याची प्रत त्यांच्याकडेच असायला पाहिजे असेहि सांगितले. मात्र बरेचदा अर्जदारांचा अर्ज रेकॉर्डला आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी प्रत मागत असतात. तेव्हा हायकोर्टाच्या नियमाप्रमाणे त्यांना ही प्रत देण्यास हरकत नाही.

मुद्दा क्र. ३ च्या बाबतीत जी हायकोर्टाची विहित पध्दती असेल ती अमलात आणून अपीलार्थीनी माहिती मिळवावी.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: २४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६४८/अपील क्र.५८१९/०२

श्री. गुलाम मोहम्मद अ.अ. बनानी ------ अपीलकर्ता
रु नं. ११/२१, कलेक्टर चाळ,
यु.पी.रेस्टॉरंटच्या मागे, मच्छी मार्केट,
चिरानगर, घाटकोपर (पश्चिम) मुंबई- ८६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ------ उत्तरवादी
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २९ मार्च २०१०
सुनावणीचा दिनांक २३/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना नसिम खान,आमदार यांच्या वॉर्ड क्रमांक ४९ मधील वाल्मिकी योजनेअंतर्गत बांधलेल्या घरकुलाचे लाभार्थी, योजनेच्या अटी व शर्ती यांची माहिती मागितली होती.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अगोदरच मुद्दा क्र. १ ची लाभार्थींची माहिती देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. घरकुलांच्या लोकेशनची यादी म्हाडातर्फे देण्यात आलेली आहे व लाभार्थींची माहिती ही उपजिल्हाधिकारी (अ.नि) कुर्ला विभाग यांच्या कार्यालयाकडून उपलब्ध करुन घ्यावी.

अपीलार्थींचे म्हणणे की, त्यांना अजूनहि समाधानकारक माहिती मिळालेली नाही. तेव्हा असे निर्देश देण्यात येतात की, वाल्मिकी योजनंअंतर्गत बांधलेल्या घरकुलांचे वाटप करण्याची जबाबदारी ज्या संस्थेची असेल त्या संस्थेने ते घर कोणाला देण्यांत आले त्याची माहिती द्यावी. जर ही जबाबदारी झोपडपट्टी सुधार मंडळावर असेल तर त्यांनी स्वत:हूनच माहिती द्यावी. इतरांची जरी जबाबदारी असेल तर या विवक्षित परिस्थितीत सदर घरकुलांची यादी संबंधित कार्यालयाकडून १५ दिवसांत प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २४.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४७६४६/अपील क्र.५८१८/०२**

**श्री. गुलाम मोहम्मद अ.अ. बनानी ------ अपीलकर्ता**
**रु नं. ११/२१, कलेक्टर चाळ,**
**यु.पी.रेस्टॉरंटच्या मागे, मच्छी मार्केट,**
**चिरानगर, घाटकोपर (पश्चिम) मुंबई- ८६.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ------ उत्तरवादी**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता**
**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***- वि वे च न -***

**अपील नोंद झाल्याचा दिनांक ६/५/ २०१०**
**सुनावणीचा दिनांक २३/६/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस चिरागनगर, मच्छीमार्केट जवळ , घाटकोपर येथील बांधण्यात आलेल्या बालवाडीच्या संदर्भात कोणत्या संस्थेच्या ती बालवाडी आहे, बालवाडीचे करारपत्र, त्यांच्या विरोधात झालेल्या तक्रारी या संदर्भातली माहिती मागितलेली आहे.**

**दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अंतिमतः अपीलार्थींनी आयोगाकडे दि. ६/५/२०१० रोजी द्वितीय अपील केलेले आहे.**

**सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, उशिरा का होईंना अपीलार्थीस उपलब्ध सर्व**

माहिती दिलेली आहे वच जन माहिती अधिकाऱ्यांस अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रशासकीय अधिकारात विलंबाबद्दल ताकीद सुध्दा दिलेली आहे.

दिलेल्या माहितीने समाधान होत नसल्यास अपीलार्थी नस्ती पाहून रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली आहे की नाही याची खात्री करुन घेऊ शकतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २५.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६५८/अपील क्र.५८३६/०२

श्री. सुरेश बोरकर ------ अपीलकर्ता
अे २/सी, २०१, व्हॅलेंटाईन अपार्टमेंट,
फिल्मसिटी रोड, टारमेंट कंपनी समोर,
मालाड (पूर्व) मुंबई ४०० ०९७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
तथा उपायुक्त परि-२
जी/ उत्तर विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई २८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परि)
जी/ उत्तर विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई २८.

*- वि वे च न -*

अपील नोंद झाल्याचा दिनांक १/४/ २०१०
सुनावणीचा दिनांक २४/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस श्री.कुबल (१९९६), श्री. दळवी (१९९९) श्री. काजरोळकर (२००३) यांचे आरे सरिता स्टॉल कुठच्या निकषाच्या आधारे मंजूर करण्यात आले होते त्याची माहिती पाहिजे होती.

मुळ लायसन्स मंजूरीची कागदपत्रे जरी सापडत नसली तरी लायसन्सच्या अनुषंगाने असणारी इतर माहितीही अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. लायसन्स देण्याचा संपूर्ण प्रस्ताव हा दुग्ध विकास विभागाकडून तपासणी होत असे सांगण्यात आले.

मुळ नस्ती जरी नसली तरी लायसन्सच्या बाबतीत खुलासा होईल अशी कागदपत्रे देण्यांत आलेली आहेत व मुळ नस्ती मात्र शोध घेऊनहि सापडत नाही. महापालिकेला याअगोदरच संपूर्ण लायसन्स व इतर डिपार्टमेंटचा रेकॉर्ड संगणकीकृत करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यातील महापालिकेने संगणकीकरणाचा कार्यक्रम पूर्णत्वास आणावा.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६५७/अपील क्र.५८३७/०२

श्री. गिरीषकुमार नायर ------ अपीलकर्ता
बि.नं. ४२, रुम नं. १२६२,
आदर्शनगर, वरळी, मुंबई ४०० ०३०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता ------ उत्तरवादी
इमारत प्रस्ताव (शहर)
ई विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
३ रा मजला, १०, शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (प)
मुंबई ४०० ००८.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र)
ई विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
३ रा मजला, १०, शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा (प)
मुंबई ४०० ००८.

*- वि वे च न -*

अपील नोंद झाल्याचा दिनांक २९/३/ २०१०
सुनावणीचा दिनांक २४/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस प्लॉट नं. सी.एस.नं. ८२६ याची मालकी मुंबई पोर्ट ट्रस्टची आहे व ज्यांत १९७० साली ४ निवासी इमारती बांधल्या त्या इमारतींच्या संबंधात ऑक्युपेशन सर्टिफिकेटस्च्या प्रमाणित प्रती पाहिजे होत्या.

माहिती बरीच जुनी असल्यामुळे रेकॉर्डला यासंदर्भात ती नस्ती सापडत नाही व त्यामुळे अपीलार्थीस माहिती प्राप्त झालेली नाही.

अपीलार्थींनी मुंबई पोर्ट ट्रस्टकडे सुध्दा अर्ज केला पण त्यांच्याकडूनहि त्यांना माहिती प्राप्त

होऊ शकलेली नाही.

दिलेल्या बिल्डींग परमिशनच्या सर्व नस्त्या (गहाळ झालेल्या) या रि-कंन्स्ट्रक्ट कराव्यात असे निर्देश मुंबई महापालिकेला याअगोदरच देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. सद्य:परिस्थितीत मात्र अपीलार्थीस हवी असणारी माहिती मिळू शकत नाही हे नाईलाजाने मान्य करावे लागते.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २५.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६४३/अपील क्र.५८३९/०२

श्री. संदिप विशे ------ अपीलकर्ता
मु.पो. मुगाव, ता. शहापूर,
जिल्हा ठाणे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव ------ उत्तरवादी
राज्य माहिती आयोग, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर,
मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर,
मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक ३/३/ २०१०
सुनावणीचा दिनांक २४/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस आयोगाच्या कार्यालयातील माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ संबंधीची माहिती पाहिजे होती.

त्याबाबत अपीलार्थीस दि. २० जुलै २०१० रोजीच्या पत्राने सदरील माहिती आयोगाच्या वेबसाईटचा पत्ता देऊन वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे कळविले.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: २५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

ुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७६५६/अपील क्र.५८३८/०२

श्री. सी.पी. सिंग ------ अपीलकर्ता
२, क्लासिक पॉवर रेसिडन्सी,
टी.पी.एस III, सब-वे रोड नं. ३,
सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०५४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक ------ उत्तरवादी
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ८

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस महानिरीक्षक
(गोपनीय)
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ८

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २५/३/ २०१०
सुनावणीचा दिनांक २४/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींचा जो दि. २०/७/२००८ व ३०/६/२००९ रोजीच्या तक्रारी या पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे ते अर्ज पोलीस महासंचालक कार्यालयाने ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयाकडे पाठविले होते. अपीलार्थीस त्या तक्रारीविषयी झ ालेल्या चौकशीच्या कार्यवाहीची माहिती पाहिजे होती.

सुनावणीच्या वेळेला असे स्पष्ट झाले की, या तक्रारींच्या संदर्भात चौकशी करुन एक अहवाल

दि. ८/४/२०१० व दुसरा अहवाल दि. २३/४/२०१० रोजी संबंधित अधिकाऱ्यांकडून ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयास प्राप्त झाला व त्या अहवालाच्या प्रती अपीलार्थीस पाठविण्यांत आलेल्या आहेत.

अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. मात्र अपीलार्थीच्या अर्जासंबंधी रेकॉर्डला असलेली सर्व माहिती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २५.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४६७९१/अपील क्र.५८२९/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे ------ अपीलकर्ता**
**रुम नं. ३०६, बि.नं. १०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ. आंबेडकर नगर,**
**मानखुर्द ,मुंबई ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (स्थापत्य) ------ उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**घाटकोपर विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***- वि वे च न -***

**अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.**

**सेवानिवासस्थान इमारतीच्या अनुलग्न जागेमध्ये व्यवसाय करणे अनधिकृत व बेकायदेशीर असून ते कितीही जुने असले तरी त्याला मान्यता देता येत नाही असा निर्णय मा.अरविंद ढोले प्रभारी/मुख्याधिकारी मुंबई मंडळ यांनी दिलेला आहे. हा निर्णय ज्या सरकारी किंवा म्हाडा मंडळाच्या अध्यादेश नुसार दिलेला आहे त्याची छायांकित प्रत मिळणेबाबत.**

**दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याचे कारण दर्शवून अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. २५ जानेवारी, २०१० रोजी द्वितीय अपील सादर केले. त्याची सुनावणी दि. २४ जून २०१० रोजी घेण्यांत आली त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.**
**" अपीलार्थी श्री. विशाल रामदास भोगे यांना त्यांच्या म्हाडाने तोडलेल्या अनधिकृत**

दुकानाबाबत सर्व माहिती, व या कार्यालयाने आतापर्यंत याप्रकरणी केलेल्या कार्यवाही व पत्रव्यवहाराबाबतची संपूर्ण माहिती श्री. भोगे यांनी माहिती अधिकार अंतर्गत वेळोवेळी मागणी केल्यानुसार देण्यात आलेली आहे. मुळ उपलब्ध नस्तीची पुन्हा तपासणी करावयाची असल्यास या कार्यालयाशी संपर्क साधावा असे अनेक वेळा कळविण्यात आले आहे. तसेच अपीलार्थीचे प्रथम अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे सुध्दा अनेक वेळा अपील दाखल केले होते व अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार श्री. भोग यांना वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे.

२. श्री. विशाल भोग यांचे अनधिकृत दुकान म्हाडाने २००५ साली तोडले होते व त्याबाबत श्री. भोगे यांनी म्हाडाविरुध्द मा. लोकआयुक्त यांचेकडे त्यांच्या तोडलेल्या दुकानाची पुनर्बांधणी करुन द्यावी व फोटोपास द्यावा म्हणॅन तक्रार दाखल केलेली होती. मा. लोकआयक्त यांच्या आदेशानुसार मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ, श्री. विशाल भोग यांची सुनावणी घेतली होती व श्री. भोगे यांना शासन निर्णयानुसार सदरहू ठिकाणी फोटोपास अनुज्ञेय नाही तसेच त्यांनी मूळ ठिकाणी बांधकाम करण्याची किंवा पुनर्वसनाची मागणी वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास अनुज्ञेय ठरत नाही असा निर्णय दिला होता. मा. मुख्य अधिकारी यांनी सदर अनधिकृत दुकानाची उपलब्ध कागदपत्रे/ पुरावे यांची छाननी करुन आवश्यक तो निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे त्याबाबतीत सरकारी अथवा म्हाडा अध्यादेशाचा उल्लेख आवश्यक वाटत नाही. सदरहू सुनावणीची प्रत श्री. भोगे यांना सुध्दा देण्यात आली आहे. सदरहू निर्णयानुसार मा. लोकआयुक्तांना अहवाल सुध्दा सादर केला होता. मा. लोकायुक्त यांनी श्री. विशाल भोगे यांची मागणी अमान्य करुन त्यांची तक्रार रद्दबातल केली आहे व प्रकरण निकाली काढलेले आहे.

उपरोक्त प्रकरणाची सर्व माहिती अपीलकर्ता श्री. विशाल रामदास भोगे यांना माहिती अधिकारांतर्गत देण्यात आलेली आहे. वस्तुस्थिती श्री. भोगे यांना माहित असून सुध्दा ते त्याचा उल्लेख मा. राज्य माहिती आयुक्त यांना केलेल्या अपील अर्जात कोठेही नमूद करीत नाहीत.

तसेच यापूर्वी मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे झालेल्या अपीलामध्ये अपीलार्थीनी त्यांच्या दुकानाबाबत घेतलेल्या निर्णयास कोणते निकष लावण्यात आले याबाबत माहिती, खुलासा विचारला होता. त्यामध्ये सुध्दा मा.मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी

स्पष्ट आदेश दिले होते की, रेकॉर्ड प्रमाणे असलेली माहिती अपीलार्थीस देण्यात आली आहे व त्यानुसार श्री.भोगे यांचे अपील निकालात काढण्यात येत आहे असे आदेश दिले होते.

उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थिती असूनसुध्दा अपीलार्थी श्री. विशाल रामदास भोगे हे वारंवार अपील दाखल करीत आहेत यापूर्वी अपीलामध्ये झालेली सुनावणी व देण्यात आलेले आदेशाचा कोणताही उल्लेख करीत नाहीत व नवीन अपील दाखल करीत आहेत, तरी अपीलकर्त्यांस योग्यत्या सूचना देऊन अपील निकाली काढण्यात यावी अशी विनंती आहे."

वरील निवेदनावरुन असे स्पष्ट होते की, अपीलार्थीस त्यांच्या अर्जाच्या संदर्भात रेकॉर्डला असलेली सर्व माहिती दिलेली असल्याचे दिसून येते.

***----आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २५.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४६७९०/अपील क्र.५८३०/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे ------ अपीलकर्ता**
**रुम नं. ३०६, बि.नं. १०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, डॉ. आंबेडकर नगर,**
**मानखुर्द ,मुंबई ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (स्थापत्य) ------ उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**घाटकोपर विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***- वि वे च न -***

**अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.**

**श्री. ॲन्थोनी सॅबेस्टीयन यांचे फोटोपास रद्द केल्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट पिटीशन नं. १३१२/०९ च्या अनुषंगाने उच्च न्यायालय यांच्या दि. २७/७/२००९ च्या आदेशानुसार म्हाडा मंडळाने काय निर्णय घेतला याची माहिती जाणून घेणे.**

**दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याचे कारण दर्शवून अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. त्याची सुनावणी दि. २४/६/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींचे म्हणणे सांगून झाल्यानंतर पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले.**

"      अपीलार्थी श्री. विशाल भोगे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तसेच मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सुभाष नगर चेंबूर येथील श्री. अन्थोनी सॅबेस्टीयन व श्रीमती. हेलन सेबेस्टीयन यांना अंतिम नोटीस देऊन सुनावणी घेण्यात आली होती व सुनावणीनुसार श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती. हेलन सेबेस्टीयन यांना त्यांची झोपडी निष्कासित करण्याबाबत या कार्यालयाने पत्र क्र. १२३४, दि. २०/३/२०१० नुसार आदेश देण्यात आले आहेत.   तसेच सदरहू आदेशाची एक प्रत श्री. विशाल भोगे यांना त्यांच्या माहितीसाठी यापूर्वी रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात आली आहे.

उपरोक्त बाब ही सहसचिव, राज्य माहिती आयोग यांना यापूर्वीच्या सुनावणी दरम्यान या कार्यालयाने कळविण्यात आली आहे.

तसेच दि. ६/२/२०१० रोजी  श्री. विशाल रामदास भोगे यांच्या अपीलावर झालेल्या सुनावणीनंतर श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती. हेलन सेबेस्टीयान यांना वितरीत केलेल्या फोटोपास बाबत श्री.विशाल भोगे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माहिती देऊन सुध्दा श्री. विशाल भोगे हे वारंवार अपील दाखल करत असून यापूर्वी अपीलामध्ये झालेली सुनावणी व देण्यात आलेले आदेशाचा कोणताही उल्लेख करीत नाहीत व नवीन अपील दाखल करत आहेत असा अहवाल या कार्यालयाने मा. राज्य माहिती आयुक्त यांना सादर केला होता व या अहवालावरुन मा. राज्य माहिती आयुक्त यांनी त्यांचे अपील अमान्य करण्यात येत आहे असे आदेश पत्र क्र.४५४११/ अपील क्र. ५३२७/०२  दि. ८/२/२०१० नुसार दिले आहेत.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता श्री.विशाल भोगे यांना त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली आहे  व या व्यतिरिक्त आणखी काही माहिती हवी असल्यास संबंधित नस्तीचे निरीक्षण करण्यास या कार्यालयात उपस्थित रहावे व नस्तीच्या निरीक्षणानंतर आपणास हवी ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे या कार्यालयाचे पत्र क्र. २०१२ दि. २०/०५/२०१० नुसार श्री. भोगे यांना कळविण्यात आले होते व त्यानुसार अपीलार्थी श्री. विशाल भोगे यांनी दि. ७/६/२०१० रोजी संबंधित नस्त्यांचे निरीक्षण केलेले आहे.  "

वरील निवेदन पाहता माहिती देण्याच्या दृष्टीने  परिपूर्ण कार्यवाही केल्याचे दिसून येते.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः २५.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६७८९/अपील क्र.५८३१/०२

श्री. विशाल रामदास भोगे ------ अपीलकर्ता
रुम नं. ३०६, बि.नं. १०१,
न्यू म्हाडा कॉलनी, डॉ. आंबेडकर नगर,
मानखुर्द ,मुंबई ४०० ०४३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (स्थापत्य) ------ उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
घाटकोपर विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.

मा. कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग, मुंबई मंडळ यांनी श्रीमती. हेलन सॅबेस्टीयन यांचे आयकर वितरण कागदपत्रांची पडताळणी बाबत मा. आयुकर अधिकारी यांचेकडे पत्र क्र.१४८९ नुसार दि. १५/५/०९ पाठविले होते. सदर वितरण पत्रांची सत्यता माहिती करुन घेणे.

दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याचे कारण दर्शवून अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. त्याची सुनावणी दि. २४/६/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीचे म्हणणे सांगून झाल्यानंतर पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिले.

" श्री.विशाल रामदास भोगे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती.

हेलन सेबेस्टीयन यांना सन २००५ साली म्हाडाने ज्या कागदपत्रांच्या आधारे फोटोपास वितरीत केला होता त्या कागदपत्रांच्या सत्यता पडताळणीसाठी या कार्यालयातर्फे विविध सरकारी कार्यालयाकडून (उदा महानगरपालिका, आयर कार्यालय, रेशनिंग ऑफिस, निवडणूक कार्यालय इ.) पडताळणी अहवाल मागविण्यात आलेला होता. यापैकी आयकर कार्यालयाकडून या कार्यालयास अहवाल प्राप्त झालेला नाही व याची माहिती श्री.भोगे यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे यापूर्वी झालेल्या सुनावणी दरम्यान देण्यात आलेली आहे. "

विविध कार्यालयाकडून प्राप्त अहवाल व सद्य:स्थिती नुसार तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सुभाष नगर चेंबूर येथील श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती हेलन सेबेस्टीयान यांना अंतिम नोटीस देऊन सुनावणी घेण्यात आली होती व सुनावणी नुसार श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती हेलन सेबेस्टीयान यांना त्यांची झोपडी निष्कासित करण्याबाबत या कार्यालयाने पत्र क्र. १२३४ दि. २०/०३/२०१० नुसार आदेश देण्यात आले आहेत. तसेच सदरहू आदेशाची एक प्रत श्री. विशाल भोगे यांना त्यांच्या माहितीसाठी यापूर्वी रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात आली आहे.

उपरोक्त बाब ही सहसचिव, राज्य माहिती आयोग यांना या कार्यालयाने कळविलेली आहे.

तसेच दि. ६/२/२०१० रोजी श्री. विशाल भोगे यांच्या अपीलावर झालेल्या सुनावणीनंतर श्री. ॲन्थोनी सेबेस्टीयन व श्रीमती हेलन सेबेस्टीयन यांना वितरीत केलेल्या फोटोपास बाबत श्री.विशाल भोगे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळोवेळी माहिती देऊन सुध्दा श्री. विशाल भोगे हे वारंवार अपील दाखल करत असून यापूर्वी अपीलामध्ये झालेली सुनावणी व देण्यात आलेले आदेशाचा कोणताही उल्लेख करीत नाहीत व नवीन अपील दाखल करत आहेत असा अहवाल या कार्यालयाने मा. राज्य माहिती आयुक्त यांना सादर केला होता व या अहवालावरुन मा. राज्य माहिती आयुक्त यांनी त्यांचे अपील अमान्य करण्यात येत आहे असे आदेश पत्र क्र. ४५४११/ अपील क्र. ५३२७/०२ दि. ८/०२/२०१० नुसार दिले आहेत.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता श्री. विशाल भोगे यांना त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध सर्व माहिती देण्यात आली आहे. व या व्यतिरिक्त आणखी काही माहिती हवी असल्यास संबंधित नस्तीचे निरीक्षण करण्यास या कार्यालयात उपस्थित रहावे व नस्तीच्या निरीक्षणानंतर

**आपणास हवी ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे या कार्यालयाचे पत्र क्र. २०१२, दि. २०/०५/२०१० नुसार श्री.भोगे यांना कळविण्यात आले होते व त्यानुसार अपीलार्थी श्री. विशाल रामदास भोगे यांनी दि. ०७/०६/२०१० रोजी संबंधित नस्त्यांचे निरीक्षण केलेले आहे. "**

**त्यामुळे अपीलार्थीस मागितलेली माहिती तर देण्यात आलेली आहेच शिवाय त्यावरील कार्यवाहीची सुध्दा माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश----***

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**दिनांकः २५.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०८/०२

श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता
श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ------- उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक २/०२/२००८
सुनावणीचा दिनांक १९/५/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२१.११.२००७ रोजी अर्ज करुन के.बी.एच. माध्यमिक विद्यालय टाळकी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. देवरे यांची नेमणूक उच्च

माध्यमिकचे मुख्याध्यापक म्हणून दि. १/७/१९९६ पासून केली गेली. त्यावेळी त्यांना रु. २२००-३७०० ही वेतनश्रेणी लावून घेतली. दि. १/१/९६ पासून ५ व्या आयोगाच्या शिफारशीप्रमाणे मिळणारी वेतनश्रेणी अगोदर ६ महिने लावून घेतली व आर्थिक लाभ घेतला या अनुषंगाने एकूण ४ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, श्री. देवरे, मुख्याध्यापक यांना ५ व्या आयोगाच्या शिफारशीप्रमाणे दिलेली वेतनश्रेणीतील वेतन वरिष्ठ लेखापरिक्षक यांच्याकडून पडताळणी करुनच वेतननिश्चित केलेली आहे त्याप्रमाणे अपीलार्थीस सांगितले. माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली म्हणून प्रथम अपील दाखल केले. सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा सविस्तर खुलासा ऐकून घेतल्यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती विहित मुदतीत दिल्याचे आढळून आल्यावर अपील निकाली काढले. परंतु अपीलार्थींनी त्या विरोधात द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थी यांनी त्यांच्या अपीलात श्री. देवरे ,मुख्याध्यापक यांना नेमणूकीच्या ६ महिने अगोदर वेतनवाढ देऊन आर्थिक लाभ दिला ही मुख्य तक्रार असताना अपीलार्थींनी अपीलात इतर अवांतर बाबीचा उल्लेख केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य दिली असल्याचे दिसून येते.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २५.६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३२२/०२

श्री. तेजिंदरसिंग मनमोहनसिंग बिंद्रा ------ अपीलकर्ता
प्लॉट नं. १, मंदार अपार्टमेंट, जनरल वैद्य नगर,
नाशिक-पुणा रोड, नाशिक- ११.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय परिवहन अधिकारी ------- उत्तरवादी
नाशिक विभाग, नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा परिवहन अधिकारी नाशिक
महा. परिवहन अधिकारी, नाशिक महाराष्ट्र परिवहन कार्यालय,
पेठ रोड, पंचवटी, नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. तेजिंदरसिंग मनमोहनसिंग बिंद्रा ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२.०९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. दि. २३/६/२००८ रोजी वाहन परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यांत आलेल्या ज्ञापन पत्राची प्रत.

२. रोज प्रकाशित होणाऱ्या वर्तमानपत्रातील बातमीनुसार वेगवेगळया अधिकाऱ्यांचे /कर्मचाऱ्यांचे प्रसिध्द होणारे फोटोसंबंधी व मोटर परिवहनचे एजंट श्री. तेजिंदरसिंग बिंद्रा यांना दि. २३/६/२००८ रोजी केलेल्या आरोपांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २९/९/२००८ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस मागितलेल्या माहितीच्या प्रतीचे रु.३३/- चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. परंतु पैसे भरुनहि माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित होते. त्यामुळे आयोगास या अपीलासंबंधी एकतर्फी निर्णय घ्यावा लागला.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी १० दिवसांत देण्यांत यावी. तसेच अपीलार्थींनी शुल्क भरल्यानंतरहि माहिती का दिली नाही याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकाऱ्यांनी १५ दिवसांचे आंत आयोगास सादर करावा.

***----आदेश----***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २५.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३११/०२

श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता
श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी ------- उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
टि.के.आर.एच.माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
निमगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलांचा दिनांक २/०२/२००८
सुनावणीचा दिनांक १८/५/२०१०
अपीलार्थी ,जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.११.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. ४ कि.मीटर वर भरणाऱ्या ३ वर्गांना भागशाळा म्हणून मान्यता मिळाली आहे काय १

२. भागशाळा म्हणून मान्यता मिळाली असल्यास मान्यतेची छायांकित प्रत.

३. नवीन वर्ग बांधण्यासंबंधीची माहिती.

४. वर्ग कोणत्या वर्षापासून बसविले आहेत इत्यादि ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २२/१२/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती दिली. परंतु अपीलार्थींनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी, अपूर्ण दिली असल्याच्या कारणावरुन प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस दिलेल्या माहितीचा खुलासा प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे सादर केला. त्यावरुन अपीलार्थीस आवश्यक ती माहिती मुदतीत दिलेली आहे असे सांगून अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत अपीलार्थी यांनी जोडपत्रानुसार माहिती मिळाली नाही ती मिळवून द्यावी असे सांगितले. तर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुन्हा एकदा नव्याने माहिती देण्यात येईल असे कथन केले.

जन माहिती अधिकारी यांनी कांही प्रमाणांत माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. उर्वरित देण्यायोग्य परंतु अचूक अशी माहिती अपीलार्थीस विनामूल्य १५ दिवसांत पुरवावी याबाबत तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २८.६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१०/०२
मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०६/०२

श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता
श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी ------- उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
लोकनेते व्यंकटराव हिरे उर्दु माध्यमिक विद्यालय,
रमजानपुरा, द्याने शिवार, ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.११.२००७ रोजी दोन अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१.	आपल्या शाळेत शासनाची मान्यता मिळण्याअगोदर कोणत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग सुरु केला ते वर्ष.

२.	कोणत्या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर मान्यता मिळाली.

३.	कर्मचाऱ्यांना शासनाने मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन मिळते काय १ इत्यादी ८ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २७/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस २ अपीला वरील हवी असलेली माहिती देण्यात आली. परंतु अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी झालेल्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. त्यामुळे त्यांच्या गैरहजेरीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शाळेची मान्यता मिळाल्याचे वर्ष, शाळेचे कामकाजाबद्दलची माहिती अपीलार्थीस विनामूल्य व मुदतीत देण्यात आली असल्याने निर्णय देऊन अपील निकाली काढले. परंतु अपीलार्थींना हा निर्णय मान्य नसल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थींनी प्रथम अपीलावरील सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने एकतर्फी निर्णय दिला असल्याचे सांगितले तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींचा माहिती मागण्याचा हेतू शुध्द नाही, त्यांनी आतापर्यंत बरीच अपीले दाखल केली आहेत. परंतु माहिती मागविताना ते जनहिताच्या दृष्टीने मागत नाहीत. तरीही त्यांना वस्तुनिष्ठ माहिती विनामूल्य देण्यांत आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे योग्यरित्या निरसन करुन त्यांना समाधानकारक माहिती पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*<u>----आदेश---</u>*

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २८.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०७/०२

श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता
श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी ------- उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
म्युनिसिपल हायस्कूल मालेगांव,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०४.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.११.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली.

१. ८ वी ब चा वर्ग शाळेपासून ३-४ किलोमिटर अंतरावर असलेल्या द्याने येथील शाळेत बसतो त्याला भागशाळा म्हणून मान्यता आहे काय १

२. भागशाळा म्हणून मान्यता मिळाली असल्यास त्याची प्रत इत्यादी ६ मुद्दयांवर माहिती

मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १८/१२/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस मुद्दा क्र. १ व २ वरील मागितलेली माहिती वस्तुनिष्ठ नाही. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत इत्यादी माहिती देण्यात आली. माहिती अपूरी मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीच्या दिनांकास अपीलार्थी कळवूनही अनुपस्थित राहिले. त्यामुळे त्यांचे याप्रकरणी काही म्हणणे नाही असे गृहीत धरण्यांत आले. त्यामुळे अपीलार्थीनी मागितलेली माहिती व अपील अर्जाला दिलेले उत्तर व जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील आयोगाकडील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत अपीलार्थीनी योग्यप्रकारे माहिती देण्यांत येत नाही अशी तक्रार केली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्याबद्दल आयोगाकडे असा खुलासा केला की, दोन्ही शाळा स्वतंत्र आहेत, शाळेची १९५५ पासून संस्थेच्या ताब्यात प्रशास्त इमारत आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होत नाही. शाळेबद्दल विद्यार्थी ,पालक व शासकीय अधिकारी यांची तक्रार नाही. त्यांनी वस्तुनिष्ठ व रितसर माहितीची मागणी केली तर त्यांना निश्चितच मुदतीत योग्य ती माहिती देण्यांत येईल असे आयोगास सांगितले.

एकंदरीत याप्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीना रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्यात आली आहे व आणखी माहिती पाहिजे असल्यास ती देण्याचीहि तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २८.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०२/०२

श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता
श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ------- उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.११.२००७ रोजी अर्ज करुन आपल्या संस्थेने दुसऱ्या संस्थेकडून जून १९९९ पासून कायम स्वरुपी कौलाणे येथील शाखा चालविण्यास घेतली. नंतर ती शाखा जून २००४ पासून बंद केली तेथील कर्मचाऱ्यांना दुसऱ्या संस्थेत समायोजन करुन घेतले परंतु त्यांच्यापेक्षा सेवाजेष्ठ आहेत त्यांचे समायोजन न होण्याच्या कारणास्तव माहिती मिळावी व उरलेल्या कर्मचाऱ्यांच्या समायोजनेबाबत माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १५/१२/२००७ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस सदर माहिती प्रकरण शासनस्तरावर न्यायप्रविष्ठ आहे. प्रत्यक्षांत आपण म्हणता तशी वस्तुस्थिती नाही असे लेखी कळविले. परंतु प्रत्यक्षात मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीचे कथन केले. प्रत्यक्षांत अपीलार्थी यांनी उपस्थित केलेले मुद्दे विसंगत व चुकीचे आहेत. सदर प्रकरण शासन स्तरावर न्यायप्रविष्ट असल्याने निवृत्ती व वेतन याबद्दल प्रश्न उद्‌भवत नाही असे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या नजरेस आणले. त्यात तथ्य असल्याचे सांगून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील निकाली काढले. परंतु योग्यती माहिती न दिल्यामुळे अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी अपीलार्थीनी प्रथम अपीलावरील सुनावणीचे पत्र मिळाले नाही व मागितलेली माहिती दिशाभूल करणारी असून योग्य ती माहिती मिळावी अशी विनंती करुन जन माहिती अधिकाऱ्यांस दंड करण्यात यावा असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अभिलेखात उपलब्ध होती ती दिली. मागितलेली माहिती चुकीच्या आधारावर होती. संस्थेची कौलाणे येथे शाळाच नाही. वस्तुतः ज्या संस्थेशी आमचे संबंध नाही अशी कुठलीही माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. एकंदरीत अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करुन सर्व माहिती दिलेली असून अद्याप नव्याने माहिती पुरविण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दाखवली आहे. आवश्यक वाटल्यास ती अपीलार्थीस देण्यात यावी. अशा परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २८.६.२०१०

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२९३/०२
मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२९४/०२
मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१७/०२

श्री. अभंग रायभान शंकर ------ अपीलकर्ता
युनिट क्र. ४, प्लॉट नं. ५०, नंदनगर,
मु.पो. लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक ------- उत्तरवादी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण , नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
निफाड विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय,
निफाड, ता. निफाड, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा सहा पोलीस निरीक्षक
लासलगांव पोलीस स्टेशन लासलगांव,
ता. निफाड, जि. नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,
अप्पर पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रामीण) नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. अभंग रायभान शंकर ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०३.२०१० रोजी व्दितीय अपीले सादर केली. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित

करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.११.२००९ रोजी तीन अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

जिल्हाधिकारी नाशिक यांना दि. २९/८/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत. तसेच मा.डॉ. निखिल गुप्ता, जिल्हा पोलीस अधीक्षक नाशिक यांना दि. ३१/८/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची आपणास दिलेली प्रत, त्यावर आपले उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय (१)निफाड विभाग (२) लासलगांव पोलीस ठाणे यांच्याकडून करण्यांत आलेल्या कार्यवाहीसंबंधीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २३/१२/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीनी प्रश्नार्थक माहिती मागितली आहे. त्यांनी अधिनियम २००५ मधील कलम २(च)(झ)(छ) नुसार अभिलेख आणि दस्तऐवजाची मागणी केलेली नाही. दि. २९/०८/२००९ वरील तक्रारीतील नमूद मुद्दयांवर चौकशी करण्यांत येत आहे. तसेच दि. ३१/८/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर उप विभागीय पोलीस अधिकारी निफाड यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास कळविले आहे असे अपीलार्थीस कळविले.

ज्यासंदर्भात माहिती मागितली ती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपीले दाखल केली. त्यावर दि. ६/३/२०१० रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक येथे एकत्रित अपीलावर सुनावणी ठेवण्यात आली. परंतु अपीलार्थी सुनावणीस गैरहजर राहिले. त्यांनी त्याचे कारण दिलेले नाही त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पूर्वीच माहिती दिली गेली असल्याचे नमूद केले. परंतु अपीलार्थीनी माहिती अपूरी मिळाल्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली.

द्वितीय तीनही अपीलात माहिती मागणीचा विषय एकच असल्याने तीनही अपीलावर एकत्रित सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थीचे म्हणणे होते की, माहिती उपलब्ध असूनहि ती देण्यात येत नाही. त्यामुळे त्यांना दंड करण्यात यावा. परंतु अपिलीय अधिकारी एकच असले तरी वेगवेगळया जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस माहिती दिली. तसेच अपीलार्थीनी अर्जात नमूद केलेल्या अर्जाची चौकशी पूर्ण झालेवर

**सविस्तर संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. तरी जन माहिती अधिकारी यांनी एकत्रितपणे समन्वय साधून चौकशी पूर्ण करुन अपीलार्थींनी एकाच विषयावर मागितलेली माहिती एकाचवेळी गठीत करुन अपीलार्थीस १५ दिवसांत विनामूल्य माहिती पुरवावी. समन्वयाचे काम अप्पर पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांनी पहावे.**

***----आदेश---***

**तीनही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांकः २९.६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२५५/०२

श्री. पंडित दाजीबा आहेर ------ अपीलकर्ता
मनिषा बंगला नं.१३, रामदास स्वामी नगर,
गांधीनगरच्या मागे, नाशिक-६.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (आस्थापना) ------- उत्तरवादी
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ व द)
विभाग -- २, जिल्हा परिषद नाशिक- १.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. पंडित दाजीबा आहेर ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०८.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित, अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.०५.२००६ रोजी अर्ज करुन नवीन इमारतीचे केलेले निकृष्ट बांधकामे झालेली पडझड व त्यामुळे इमारती वापरांत न येताच पडून गेल्यामुळे त्यावर झालेला बांधकाम खर्च, शासनाचे आर्थिक नुकसान या परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या कंत्राटदाराकडून वसूली केलेल्या शासकीय निधीची माहिती इत्यादी ६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८/५/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीनी मागितलेली माहिती यापूर्वीच दिल्याचे नमूद केले आहे. परंतु अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील अपीलावर अपिलीय अधिकारी यांनी दि. २८/१/२००७

रोजी अपीलार्थीस माहिती दिली असल्याचे दिसून येते. परंतु अपीलार्थीस पूर्ण माहिती मिळाली नाही या कारणास्तव अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीस उत्तरवादी उपस्थित होते, परंतु अपीलार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे अपीलार्थींचे म्हणणे काय होते हे समजू शकले नाही. परंतु उत्तरवादी यांनी आयोगास सर्व कनिष्ठ अभियंता व ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांना वसूलपात्र रक्कमेस जबाबदार धरण्यात आले आहे. घरकुलाच्या कामातहि अनियमितपणा झाल्याचे चौकशीत आढळून आल्याने चौकशी अधिकारी यांनी सर्व संबंधितांविरुध्द वसूलीस जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा अभिप्राय दिलेला आहे. इतर सर्व माहिती अपीलार्थीस लेखी कळविलेली आहे. त्यामुळे अपीलार्थीस सविस्तर माहिती मिळाल्याचे दिसून येते.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २९.६.२०१०
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०९/०२**

**श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ------ अपीलकर्ता**
**श्रध्दा सबुरी, राजश्रृंगी कॉलनी, मालेगांव कॅम्प,**
**ता. मालेगांव, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी ------- उत्तरवादी**
**महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,**
**ता. मालेगांव, जि. नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**के.बी.एच. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,**
**मालेगांव कॅम्प, ता. मालेगांव, जि. नाशिक.**

***- वि वे च न -***

**अपीलार्थी श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.११.२००७ रोजी अर्ज करुन सर्वश्री माळी, खैरनार व शेवाळे या कर्मचाऱ्यांचा शाळेतील रुजू दिनांक द्यावा व त्यांना कोणकोणत्या कामाचा चार्ज देण्यांत आला. (२) त्यांच्या हजेरी पत्रकावरील सहयांची प्रत (३) श्री. माळी कोणत्या विषयाचे शिक्षक आहेत इत्यादी माहिती मागितली होती.**

जन माहिती अधिकारी यांनी दि. १/१२/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कर्मचाऱ्यांचा रुजू दिनांक देण्यात आले. परंतु कर्मचाऱ्यांच्या हजेरीपत्रावरील सहया व कागदपत्रे ही माहिती त्रयस्थास देऊ नये असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे म्हणून देण्यांत आली नाही. त्याविरोधात अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. त्यावर सुनावणी घेण्यांत आली. मुदतीत कळवूनही अपीलार्थी सुनावणीस हजर राहिले नाहीत त्यामुळे अपीलार्थींच्या गैरहजेरीत सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळी माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती व कागदपत्रे यांचे अवलोकन केल्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस दिलेले उत्तर योग्य असल्याचे मत व्यक्त केले. परंतु माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी कर्मचाऱ्यांचे सहीचे नमूने मागितले नव्हते तर हजेरीपत्रकावरील कर्मचाऱ्यांची उपस्थिती मागितली होती असे आयोगास स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांनी माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने नाकारण्यात आली असे सांगितले.

एकंदरीत या प्रकरणाचा विचार करता अधिनियमाच्या प्रकरण २, नियम (१) मधील कलमात दिलेल्या आबंधने याचा विचार करता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यास हरकत नाही.

अपीलार्थींनी मागितलेली उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस १५ दिवसात विनामूल्य पुरवावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिली जाते की नाही याची दक्षता घ्यावी.

***---आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः २९.६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२८८/०२**

**सौ. शुभदा अनंतकुमार दिक्षीत ------ अपीलकर्ता**
**श्री सन्मित्र हौसिंग सोसायटी, एन-२,**
**मार्गशिर्ष, गणेश चौक रोड, न्यू नाशिक (सिडको),**
**नाशिक ४२२ ००९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी (प्रशासकीय कार्यालय) ------- उत्तरवादी**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र)**
**मर्या. सिडको. मुंबई आग्रा रोड, न्यू नाशिक (सिडको),नाशिक.**

**जन माहिती अधिकारी**
**सिडको विभागीय कार्यालय, मुंबई आग्रा रोड,**
**न्यू नाशिक, नाशिक.**

***- वि वे च न -***

**अपीलार्थी सौ.शुभदा अनंतकुमार दिक्षीत ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित, प्रथम अपीलीय अधिकारी, व अपिलार्थी अनुपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०९.२००८ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.**

**१. चिल्ड्रन पार्क , मार्गशिर्ष स्टेट बँक चौक सिडको न्यू नाशिक, टपरी लेआऊट नकाशा प्रत.**

**२. श्री.काशिनाथ दिंडे यांना पूर्वी मिळालेला गाळा बदलून देण्याची कारणे व कागदपत्रे.**

**३. गाळा क्र. ३९ चा मंजूर बिल्डींग प्लॅन व त्याचे प्रत्यक्ष बांधकाम इत्यादी ६ मुद्दयांवर**

माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सदर भूखंडाची माहिती मिळणेसाठी शुल्क म्हणून रु.५००/- कार्यालयात जमा करावे असे कळविले.

अपीलार्थीनी फी रु.५००/- भरल्यानंतर दि. १८/१२/०८ च्या पत्राद्वारे भूखंडाचा क्रमांक, सेक्टर त्याचा करारनामा व ताबा पावती, कर, बांधकाम परवानगी प्रत, व भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांची पूर्तता केल्यावर नकाशाच्या प्रती मिळतील म्हणून कळविले. त्याप्रमाणे अपीलार्थीनी दि. ६/१/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ती कागदपत्रे पुरविली. परंतु कांही मुद्दयांवर माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान त्यांनी असे निदर्शनास आणले की, एकूण मुद्दयांपैकी कांही मुद्दयावरील माहिती अपीलार्थीस दिलेली आहे. मुद्दा क्र. १,३,४,५, याबद्दल अद्याप कांहीही माहिती दिलेली नाही असे अपीलार्थीनी अपीलात नमूद केले आहे.

सुनावणीच्या वेळी वरील विषयांच्या बाबतीत कोर्टाने दिलेल्या दोन आदेशांच्या प्रती सादर केल्या. कोर्टात प्रकरण होते तरी रेकॉर्डप्रमाणे जी स्थिती होती त्याची उर्वरित कागदपत्रे द्यावयास पाहिजे होती व ती अपीलार्थींना १५ दिवसांत देण्यांत यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २९.६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६८०७/अपील क्र.५८४७/०२

श्री. दादासाहेब माने ------ अपीलकर्ता
चंद्रभागा निवास, प्लॉट नं. २५,
म्हाडा कॉलनी, बदलापूर (पूर्व)

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी ------ उत्तरवादी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ८/०२/ २०१०
सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०
अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी असे लेखी निवेदन दिले की, त्यांना हवी असणारी माहिती मिळालेली आहे. कोंकण मंडळाविरुध्द आता त्यांची कांहीही तक्रार राहिली नाही. तरी त्यांचे अपील रद्द करण्यांत यावे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ३०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६८०३/अपील क्र.५८४६/०२

श्रीमती त्रिवेणी अण्णासाहेब मानव व ------ अपीलकर्ता
श्री. शिवाजी सत्यवान फणसेकर
द्वारा लेझर फोटो स्टुडिओ, बासुरी बार शेजारी,
बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व) मुंबई ३७

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी तथा ------ उत्तरवादी
उपजिल्हा निवडणूक अधिकारी
मुंबई शहर जिल्हा, ओल्ड कस्टम, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. मतदार नोंदणी अधिकारी
१८० वडाळा विधानसभा मतदारसंघ,
सहकार नगर, मनपा मराठी शाळा, सहकार नगर,
वडाळा (पश्चिम) मुंबई ४०० ०३१.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०९/०२/ २०१०
सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अपीलार्थींना सर्व माहिती दिली असल्याचे दिसून आले. मात्र मतदारयादीत नांवनोंदणी करीत असतांना जी कागदपत्रे दाखल केलेली असतात ती शासन निर्णयाप्रमाणे एक वर्षभर जतन केली जातात व नंतर नष्ट केली जातात असे जे अपीलार्थींना उत्तर देण्यांत आलेले आहे त्याबाबत शासन निर्णय / आधार असेल त्याची प्रत अपीलार्थींना १० दिवसाच्या आत पाठविण्यात यावी.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः ३०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६७९७/अपील क्र.५८४५/०२

श्रीमती सुमित्रा कोलगे ------ अपीलकर्ता
एफ/१, प्रशांत , १३९ सेनापती बापट मार्ग,
माहिम, मुंबई ४०० ०१६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुल सचिव ------ उत्तरवादी
मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्थापना)
मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २८/०१/ २०१०
सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या सलगसेवा होण्याच्या अगोदर जी खंडितसेवा झाली होती त्याचाहि फायदा मिळण्याच्या संदर्भात जो त्यांनी अर्ज केला होता त्यावर झालेल्या कारवाईची माहिती मागितली होती. सन १९९० साली अशा प्रकारचा खंडितसेवेचा फायदा कर्मचाऱ्यांना देण्यात यावा अशा प्रकारचा निर्णय मान्यतेसाठी विद्यापीठाने शासनाकडे पाठविला होता. पण त्यावर शासनाकडून निर्णय न आल्यामुळे या सेवेचा फायदा अपीलार्थी व इतर कोणालाही देण्यात आलेला नाही असे सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले.

सद्य:स्थितीची माहिती दिली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ३०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६८०९/अपील क्र.५८४८/०२

श्री. किरण मांजरेकर ------ अपीलकर्ता
४/३०६, सुगंध परबत नगर, एस.व्ही.रोड,
दहिसर (पूर्व) मुंबई ४०० ०६८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण
एम.जी.क्रॉस रोड, तरण तलावाजवळ, कांदिवली (प)
मुंबई ४०० ०६७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियता (इ.व.का.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/ दक्षिण
एम.जी.क्रॉस रोड, तरण तलावाजवळ, कांदिवली (प)
मुंबई ४०० ०६७.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २७/०१/ २०१०
सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीना आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्यामुळे त्यांचे अपील रद्द करण्यात यावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ३०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४६८०५/अपील क्र.५८४९/०२**

**श्री.हसमुख ओझा ------ अपीलकर्ता**
**महावीर इस्टेट, २ रा मजला, रुम नं. १८,**
**एन.एम.जोशी मार्ग, मुंबई ४०० ०२७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी**
**ई-२, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.**

**२. जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**ई-२, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.**

***- वि वे च न -***

**अपीलाचा दिनांक ०८/०१/ २०१०**
**सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी मागितलेली माहिती ही दोन कार्यालयांमार्फत द्यावयाची होती. एका कार्यालयाची माहिती अपीलार्थीस आधीच देण्यांत आली होती व दुसऱ्या कार्यालयाची माहिती दि. २९/६/२०१० रोजी अपीलार्थीनी स्वतः स्वीकारलेली आहे.**

**माहिती देण्यास उशीर लागण्याचे कारण कार्यालयाचे नुतनीकरणाचे काम सुरु असल्याने रेकॉर्ड अस्ताव्यस्त झाला होता व त्यामुळे विलंब झाला असे कारण सांगण्यांत आले.**

**नुतनीकरण जरी होत असले तरी रेकॉर्ड हा अगदी त्वरित उपलब्ध होऊ शकला नाही तरी**

थोडया फार प्रयत्नाने कमी कालावधीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते याची समज सहाय्यक लेखाधिकारी/ उत्तर/ दु.व.पु. मंडळ यांना देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः ३०.०६.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४६७९८/अपील क्र.५८५१/०२**

**श्री. मिर्झा अब्दुल हसन ------ अपीलकर्ता**
**बी/ ४०८, सागर अपार्टमेंट,**
**फ्रान्सिस पीटर परेरा मार्ग, सोनापूर लेन,**
**कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (इ.व.का) ------ उत्तरवादी**
**पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**राज लिगेसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम) मुंबई ४०० ०८३.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)**
**पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**राज लिगेसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,**
**एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम) मुंबई ४०० ०८३.**

***- वि वे च न -***

**अपीलाचा दिनांक २८/०१/ २०१०**
**सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना ज्या १९६४ सालच्या इमारतीच्या संदर्भात वेगवेगळया परवानगीच्या प्रती व इतर माहिती पाहिजे होती त्या संबंधात केवळ इमारतीचे नांव याखेरीज इतर कोणतीही माहिती न दिल्याने नस्ती शोधून काढणे कठीण झाले होते. अपीलार्थींनी जो C.T.S. नंबर दिला होता तो चुकीचा आढळून आला होता त्यामुळे अपीलार्थीस माहिती देता आली नव्हती.**

**सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, पाणीपुरवठा विभागातून आता त्या इमारतीचा**

**C.T.S. नंबर व फाईल नंबर बाबत माहिती प्राप्त झालेली आहे. आता अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही ८ दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. व त्यास अपीलार्थीनी सुध्दा संमती दर्शविली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश----***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**दिनांक: ३०.०६.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५४७/अपील क्र.५८५३/०२

श्री. प्रविण त्रिपाठी ------ अपीलकर्ता
१६६, जी मुंबादेवी टेम्पल कंपाऊंड,
मुंबई ४०० ००२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ २, सर जे.जे. मार्ग, नागपाडा,
मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे. जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई .

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ३०/६/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस इतर माहिती जरी देण्यांत आली असली तरी त्यांच्या अपीलमेमोनुसार त्यांना श्रीयुत. लहू पवार यांच्या स्टेटमेंटची प्रत मिळालेली दिसत नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, ही प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. तर अपीलार्थींचे म्हणणे त्यांना ही प्रत मिळाली नसल्यामुळे सुनावणीच्या वेळेला सदरील प्रत अपीलार्थीस ७ दिवसांचे आत देण्याचे निर्देश देण्यांत आले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः ३०.०६.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१८२/०२**

**श्री. संतोष परमानंद कोगवळे** ------- **अपीलकर्ता**
**स.न.९९३/१, पाटील मळा, पाटील नगर,**
**सिडको - ५, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**अधिक्षक अभियंता नगर रचना विभाग, मनपा नाशिक**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कार्यकारी अभियंता, नगर रचना विभाग, मनपा नाशिक**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. संतोष परमानंद कोगवळे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०८.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) आपणाकडील पत्र जावक क्र. मरावि/वाशि पूर्व/१५६९/२००९ दि.२.०२.२००९ मध्ये नमूद केलेल्या तक्रारीची प्रत. २) महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५८ ची प्रत. ३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५१ ची प्रत मिळण्याबाबत.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ८.०९.२००९ पत्रान्वये मागणी केलेल्या नागरीकांच्या प्रती या अभिलेख्यात रेकॉर्ड म्हणून ठेवल्या जात नाहीत त्यामुळे त्या प्रती देता येत नाहीत मनपा अधिनियमांतील कलमाच्या

प्रतींबाबत असे सांगण्यात आले की त्याबाबतीतील पुस्तके बाजारात सहज उपलब्ध आहेत ती आपण प्राप्त करु शकता असे लेखी कळविले.

माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर झालेल्या सुनावणीत अर्जदाराचे तपशीलवार म्हणणे ऐकूण घेण्यांत आले व चर्चेअंती जन माहिती अधिकारी यांनी नियमावलीच्या छायांकित प्रती सहा दिवसांत उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले त्याप्रमाणे अधिनियमाच्या प्रती अपिलार्थीस देण्यात आल्या परंतु अपिलार्थीस माहिती अपूर्ण मिळाल्याने त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी झालेल्या बैठकीत १) मुंबई मनपा अधिनिमांच्या प्रती दि.२०.१०.२००९ रोजी देण्यांत आल्या. २) दि. २.०२.२००९ नंतर वेळोवेळी प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रतीही अपिलार्थीस देण्यांत आल्या आहेत यावरुन असे दिसून येते की अपिलार्थीस हवी असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ८.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२७९/०२**

**श्री. ॲड.सुधाकर आर जाधव** **------- अपीलकर्ता**
**एन-४१, जे ए ३-१२-१ सावतानगर, ४ थी स्किम,**
**नवीन सिडको, नाशिक ८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग,**
**सा.बा.विभाग, ३ रा माळा, डी.डी. इमारत, जुने जकात घर आवार,**
**मुंबई २३**

**जन माहिती अधिकारी,**
**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग,**
**सा.बा.विभाग, ३ रा माळा, डी.डी. इमारत, जुने जकात घर आवार,**
**मुंबई २३**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. ॲड.सुधाकर आर जाधव,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित तर जन माहिती अधिकारी अनुपस्थित व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) राज्य शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची मालमत्ता कर्ज व दायित्व याची माहिती देणे बंधनकारक आहे त्या संबंधी सादर केलेल्या माहितीचा तपशील २) २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी आपल्या विभागास शासनाकडून (आमदार निधीसह) एकूण मंजूर होऊन प्रत्यक्षात झालेला खर्च तपशील याची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.०४.२००९ पत्रान्वये अपीलार्थीने अर्जाव्दारे अक्र.१ वरील मागितलेली माहिती ही या कार्यालयात ठेवण्यात येत नसल्याने ती देणे शक्य नाही तर अ.क्र. २ वरील माहिती मंजूर निधी व त्यावरील खर्चासंबंधी आहे ती सविस्तर स्वरुपाची असल्याने अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे देण्यास विलंब लागेल परंतु ती उपलब्ध करुन देण्यात येईल असे लेखी कळविले माहिती मुदतीत न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले परंतु

अपिलार्थीने त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही असे नमूद केले आहे त्यामुळे व्यथीत होऊन त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या साधकबाधक चर्चेत प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की अपीलार्थीस कार्यालयीन अभिलेख्यात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली. जर अपीलार्थीस याव्यतिरिक्त अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी कार्यालयात जाऊन हव्या असलेल्या माहितीची उपलब्धतेनुसार तपासणी करुन घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ८.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ९५२/०२**

**श्री. ज्ञानचंद्र पाटील,** **-------- अपीलकर्ता**
**शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,**
**सांगली, जि.सांगली ४१६ ४१६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य. शिक्षण मडळ**
**शिवाजी नगर, पुणे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य. शिक्षण मडळ**
**शिवाजी नगर, पुणे**

**- <u>वि वे च न</u> -**

अपीलाचा दिनांक : ११.०३.२००९
सुनावणीचा दिनांक : ५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक ३०.१०.२००८ च्या माहिती अर्जान्वये दिनांक १.०१.२००१ ते ३०.१०.२००८ या कालावधीची केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ व उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींच्या अनुषंगाने एकूण सहा विविध मुद्यांबाबत माहिती मागितली. यावर त्यांना दि. १२.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. दरम्यानच्या काळात त्यांनी दि.१५.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळू शकली नाही यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादींचे म्हणणे आयोगाने जाणून घेतले कार्यालयात असलेली माहिती देण्यात आली आहे असेच दिसून आले. माहिती देण्यात झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

**आदेश**
**अपील निकली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०८.०६.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्रं. १०५/०२

श्री. संतोष नामदेव परतणे ------ अपीलकर्ता
विद्यानगर, फैजपूर,ता.यावल
जि.जळगांव

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अपर निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे,
सहकार आयुक्त व विषयक यांचे कार्यालय मध्यवर्ती इमारत,
पुणे - ०१

जन माहिती अधिकारी, तथा
उपनिबंधक,सहकारी संस्था(सा बँका-२),
सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,

पुणे - ०१

## - विवेचन -

अपीलाचा दिनांक : ८.०६.२००९
सुनावणीचा दिनांक : ३०.०९.२००९
आदेश पारित झालेला दिनांक : ३०.०९.२००९
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

"अर्जदार यांनी दि. २३.०२.२००९ रोजीच्या अर्जाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार १०१ च्या वसुली अर्जासोबत जोडलेल्या स्टँप कोर्टफीचे नियम तसेच ठरलेली १०१ च्या अर्जाच्या वसुली प्रमाणपत्रासाठी श्री.चंद्रकांत बढे पतसंस्था, वरणगांव जि.जळगांव या संस्थेत त्यांनी फक्त रु.५० भरणा दाखवून खरी रक्कम वसुलीनंतर चलनाव्दारे भरण्याबाबत व संस्थेस मान्यता दिलेल्या पत्रांची प्रत इत्यादि तीन ते चार मुद्यांवर माहिती मागितली होती."

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास हव्या असलेल्या प्रतींची फी भरुन माहिती घेऊन जावी असे कळविले त्याप्रमाणे अर्जदाराने दि.२८.०४.२००८ रोजी रु. १३७०/- कार्यालयांत भरले परंतु त्यांना माहिती देण्यात आली नाही म्हणून अर्जदाराने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते त्यावेळी राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद खंडपीठ यांनी असे आदेश पारित केले की अपीलार्थीच्या दि.९.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत झालेल्या व संभाव्य क्षमापित करुन सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा. हा निर्णय पारित झाल्यानंतर सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दि.१६.१०.२००९ च्या पत्राव्दारे चौकशी अहवालाची एकूण ६२८ पानाच्या छायांकित प्रती पाठविण्यात येत आहे असे नमूद केले आहे. अर्जदाराने त्यांच्या दि. ६.०३.२०१० च्या अर्जात जन माहिती अधिकारी यांनी निर्गमित केलेले पत्र जोडले आहे. परंतु अर्जदारास माहिती मिळालेली दिसून येत नाही. तक्रार सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते व अर्जदार उपस्थित होते. अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी माहितचे पत्र पाठविले असले तरी अर्जदार माहिती मिळालेली नाही असे त्यांच्या दि. ६.०३.२०१० अर्जावरुन अनुमान काढण्यांत येते.अर्जदारास जरी ६२८ पृष्ठे माहिती पाठविली असे नमूद केले असले तरी ती त्यांना मिळाली नाही तरी जन माहिती अधिकारी यांनी दि.१ जुलै, २०१० रोजी ही महिती पुन्हा विनामुल्य द्यावी. त्यासाठी अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात स्वतः किंवा प्रतिनिधी उपस्थित राहून ही माहिती घ्यावी. अन्यथा फक्त पोस्टेजची रक्कम पाठवावी म्हणजे अधिकारी पोस्टाने माहिती पाठवतील माहिती देण्यात कुठलीही हयगय होऊ नये.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट निदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्रं. ७६२/०२

श्री. ज्ञानचंद्र पाटील, -------- अपीलकर्ता
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि.सांगली ४१६ ४१६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, कोल्हापूर विभाग,
कोल्हापूर

जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा क्रीडा अधिकारी, मारुती मंदीर,
रत्नागिरी

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १९.१०.२००८
सुनावणीचा दिनांक : ०५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दिनांक ४.०६.२००८ च्या अर्जान्वये गांव तेथे क्रिडांगण व व्यायाम शाळा विकास योजनेबाबत दि. १.०४.२००५ ते ३१.०३.२००८ या कालावधीत माहितीची मागणी केली. परंतु माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ९.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यांना माहिती मिळू शकली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाने अपीलार्थी व उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेतले. उत्तरवादींनी दिलेल्या लेखी निवेदनावरुन दिसून येते की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आलेली आहे. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थीचे प्राप्त माहितीने समाधान झालेले नसल्याने त्यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या विषयाशी संबंधित कार्यालयातील सर्व रेकॉर्ड निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे व त्यातील ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती त्यांना हव्या असतील त्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामुल्य पुरवाव्या ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करावी.

प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याचे आत सुनावणी घेऊन आपला लेखी निर्णय देणे आवश्यक असल्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०९.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**१) मुमाआ २००९/अपील क्रं. ५०८/०२**
**२) मुमाआ २००९/अपील क्रं. ५७१/०२**
**३) मुमाआ २००९/अपील क्रं. ५७२/०२**
**४) मुमाआ २००९/अपील क्रं. ५८४/०२**
**५) मुमाआ २००९/अपील क्रं. ६४३/०२**
**६) मुमाआ २००९/अपील क्रं. ६४४/०२**
**७) मुमाआ २००९/अपील क्रं. ६४५/०२**
**८) मुमाआ २००९/अपील क्रं. ६४६/०२**
**९) मुमाआ २००९/अपील क्रं. ११८१/०२**
**१०) मुमाआ २००९/अपील क्रं. ११८२/०२**
**११) मुमाआ २००९/अपील क्रं. ११८३/०२**
**१२) मुमाआ २००९/अपील क्रं. ११८४/०२**
**१३) मुमाआ २००९/अपील क्रं. ११८६/०२**

सौ. चारुलता राजेंद्र चव्हाण -------- अपीलकर्ता
एस - ५, सारंग अपार्टमेंट, सुधाकर नगर,
कोल्हापूर

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
अप्पर पोलीस अधिक्षक, मुख्यालय
कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा क्रीडा अधिकारी, मारुती मंदीर,**
**रत्नागिरी**

**जन माहिती अधिकारी तथा**
**पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक, मुख्यालय,**
**कोल्हापूर**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग,**
**कोल्हापूर**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा**
**विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,**
**कोल्हापूर २**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,**
**कोल्हापूर २**

**---- विवेचन -----**

| अ.क्र. | अपील क्र. | अर्ज दिनांक व मागितलेल्या माहितीचे स्वरुप | जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेले उत्तर / माहिती | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे आदेश व उत्तर |
|---|---|---|---|---|
| १ | ५०८ | दि. ६.०८.२००८ च्या अर्जान्वये पोलीस ठाण्यातून बेवारस वाहने चोरुन भंगारात विकल्या प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करुन केलेल्या तीनही चौकशी अहवालाच्या प्रती मिळण्याबाबत. | जन माहिती अधिकारी यांनी दि.६.०९.२००८ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी संबंधीत अधिकारी यांनी गोपनीय अहवाल सादर केला असून पुढील चौकशी चालू असल्याने सदरची माहिती देता येत नाही | चौकशी चालू असल्याने अधिनियम २००५ नियम ८ (१) (ज) अन्वये मागणी केलेले कागदपत्रे/ माहिती देता येत नाहीत. |
| २ | ५७१ | दि. १७.१०.२००९ च्या अर्जान्वये बेवारस वाहने भंगारात विकल्या प्रकरणी पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून झालेल्या सखोल चौकशी अहवालाची व | प्राथमिक चौकशी करुन अहवाल पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांना केलेला आहे त्याकरीता अधिनियम २००५ नियम ६ (३) (क) अन्वये सदर | वरील प्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | संबंधित कर्मचारी अधिकारी यांचा घेतलेला जाब जबाब याची माहिती | कार्यालयाकडे पाठविण्यांत येत असून संबंधीत माहिती त्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी. | |
| ३ | ५७२ | दि. १०.१०.२००८ च्या अर्जाव्दारे कोल्हापूर जिल्हयात घडलेल्या गुन्हयाबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर यांच्याकडे इंटर नॅशनल हयुमन राईटस फौंडेशनच्या वतीने केलेल्या तक्रारीनुसार आपणाकडे पाठविलेल्या चौकशी अहवालाच्या प्रतींची मागणी | दि. २४.११.२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस अहवालाच्या कागदांच्या प्रती अर्जदारास पाठविण्यात आल्या आहेत. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कलम १९ (१) खाली दाखल केलेल्या अपीलावर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जास माहिती दिली त्याशिवाय उपलब्ध माहितीही देण्यात आली असे सांगितले. |
| ४ | ५८४ | दि. ९.१४.२००८ च्या अर्जाव्दारे पोलीस ठाण्यातून बेवारस वाहने चोरुन भंगारात विकली त्यासाठी उपयोगांत आणलेली वाहने इत्यादि प्रकरणी आवश्यक ती माहिती मिळण्याबाबत. | मागणी केलेल्या प्रकरणांत चौकशी सुरु असून सदरची माहिती/कागदपत्रे माहिती अधिकार २००५ मधील नियम क्र. ८ (१) (६) (ज) नुसार प्रगट करता येत नाही. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे दिनांक ३.०१.२००९ च्या पत्रान्वये बेवारस वाहने भंगारात विक्री केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले त्याचा अहवाल अर्जदारास पाठविण्यात आले आहे असे सांगितले. |
| ५ | ६४३ | दि. १०.१०.२००८ च्या अर्जाव्दारे राज्य मानवी हक्क आयोगाकडील केस संदर्भावरुन आपल्या कार्यालयाकडून क्र. २२ दि. ९.०९.२००८ रोजी पाठविण्यांत आलेल्या चौकशी अहवालाची प्रत मिळाली अशा एकूण १२ मुद्यांवर माहिती मागितली होती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.२१.२००८ च्या पत्राव्दारे तक्रारही अदखलपात्र स्वरुपाची आहे पोलीसांना तपासणीचे अधिकार नाहीत. २) वर्तमान पत्रातील प्रत्येक बाबीवर पोलीस तपास केला जात नाही म्हणून गुन्हा दाखल झालेला नाही इत्यादि १२ मुद्यांची माहिती दिली गेली | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. २१.०३.२००९ च्या पत्राव्दारे अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी हजर असलेल्या अपीलार्थी यांच्याशी झ ाालेल्या चर्चेतील मुद्दे निहाय माहिती त्यांना दिली. |
| ६ | ६४४ | दि.९.०४.२००८ च्या अर्जाव्दारे शहर पोलीस उप अधिक्षक श्री.पाटील यांनी राजापुरी येथील पांजरपोळ मधील स्क्रॅप गोठयावरुन टाकलेल्या | जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०४.२००८ च्या पत्राव्दारे मागणी केलेल्या प्रकरणाची चौकशी सुरु असून | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २७.०३.२००९ अन्वये सविस्तर उत्तर दिले गेले असल्याचे नमूद केले आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घाणिमध्ये सापडलेल्या बेवारशी वाहनाची व इतर बाबीची माहिती मागितली होती. | सदरची माहिती / कागदपत्रे अधिनियम २००५ मधील नियम क्र. ८(१) (छ) (ज) नुसार प्रगट करता येत नाहीत असे लेखी कळविले | यापूर्वीच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उचीत उत्तर दिले आहे. |
| ७ | ६४५ | दि. ११.१२.२००८ च्या अर्जाव्दारे श्री तुषार पोलीस उप अधिक्षक शहर व श्री संपत पवार यांनी पदाचा दुरुपयोग केला याप्रकरणी माहिती मागितली होती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०१.२००९ च्या पत्राव्दारे सरकारी अधिकाऱ्याबद्दल मागितलेली माहिती ही अधिनियम २००५ मधील नियम २ (च) मध्ये बसत नाही असे कळविले. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. २.०७.२००९ च्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेले उत्तर योग्य असून अपील दप्तरी दाखल केल्याचे कळविले. |
| ८ | ६४६ | दि.२७.११.२००८ च्या अर्जाव्दारे कोल्हापूर जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यातील पोलीसासाठी ज्या ज्या काही वस्तु वाहने व इतर सर्व मुद्दे मालाची व अद्याप नोंद न केलेल्या मुद्दे मालाची सविस्तर माहिती, मुद्दे मालाची विल्हेवाट लावली असेल तर त्याची माहिती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०१.२००९ च्या पत्राव्दारे पोलीस ठाण्यातील जप्त/निर्गत मुद्देमाल हा संबंधीत न्यायालयाच्या ताब्यात असल्याने त्याची माहिती देता येत नाही असे कळविले. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी प्रकरण न्याय निर्णय होणेवर प्रलंबित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी येथेचित उत्तर दिलेले असून योग्य असल्याचे कळविले. |
| ९ | ११८१ | दि. १६.०४.२००९ च्या अर्जाव्दारे भंगारात विक्री केले प्रकरणी १) विभागीय चौकशी कोणत्या अधिकाऱ्याकडे सुरु आहे त्याची सद्यस्थिती. २) विभागीय चौकशीचे आठवडा रोजनामे. ३) चौकशी कामी अखेर केलेले रोजनाम्याच्या क्षणी वरिष्ठांकडे पाठविण्यांत आलेल्या रोजनाम्याच्या प्रती मिळण्याबाबत. | जन माहिती अधिकारी यांनी दि. १.०६.२००९ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा १ बेवारस वाहनांसंबंधीची विभागीय चौकशी अवर पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांचेकडे सुरु आहे. मुद्दा क्र. २,३ व ४ चौकशी पुर्ण न झाल्यामुळे अधिनियम ८ (१) (ज) प्रमाणे माहिती देय नाही असे कळविले. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. ६.०८.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य असल्याचे अपीलार्थीच्या निदर्शनास आणले. |
| १० | ११८२ | दि. ११.०१.२००९ च्या अर्जाव्दारे कोल्हापूर जिल्हयातील पोलीस कर्मचाऱ्यांचे संगणक ज्ञान (ms-cit) सक्तीच्या नावाखाली रोखून ठेवलेल्या वेतनवाढीकडे झालेल्या नुकसानी बद्दलची माहिती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०७.२००९ च्या पत्राव्दारे सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयास दि. ५.०५.२००७ च्या नियमानुसार रोखण्यांत आलेल्या वेतनवाढी मंजूर करण्याची कार्यवाही | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. ७.०८.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस सविस्तर रित्या कळविले आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करण्यात आल्या. | |
| ११ व १२ | ११८३ व ११८४ | दि. ११.१२.२००८ च्या अर्जाव्दारे १) सन २००५ ते २००८ कालावधीत कोल्हापूर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेस मा.पोलीस अधिक्षक यांनी केव्हा भेटी दिल्या व पोलीसांनी जप्त केलेल्या मुद्देमालाची कोणती तपासणी केली. २) जप्त मुद्दे मालाची दप्तरी नोंद किती. इत्यादि १७ मुद्दयांवर माहिती मागितली होती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. ४.०४.२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस १७ मुद्यांवर उपलब्ध माहिती दिली त्यातील दोन प्रकरणांची माहिती देण्यात आली नाही. (अधिनियम २००५ मधील ८ (१) (ज) नुसार | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. १३.०५.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीने मागणी केलेली १७ मुद्यांची माहिती पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय) कोल्हापूर यांनी दि. ४.०४.२००९ च्या पत्रान्वये दिली आहे भंगार विक्री संबंधी कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु असल्याने माहिती देता येत नाही म्हणून कळविले. |
| १३ | ११८६ | दि. ९.०१.२००९ च्या अर्जाव्दारे बेवारस वाहने भंगारात विक्री केले प्रकरणी ज्या पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले व त्यांना शिक्षा होणेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर केलेल्या अहवाला सहीत विधी सल्लागाराचे मत इत्यादि माहिती मागितली होती. | जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.०२.२००९ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी एकत्रितपणे विभागीय चौकशी प्रक्रीया चालू असून सर्व कागदपत्रे विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांच्याकडे पाठविण्यांत आल्याचे कळविले. | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. ८.८.०३.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिलेले योग्य माहितीच अपीलार्थीस पुन्हा कळविली आहे. |

अपीलार्थी श्रीमती चारुलता राजेंद्र चव्हाण यांनी वरील एकूण १३ अपीलावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे. चुकीची तसेच दिशाभूल करणारी असून अधिकारी जाणून-बुजून माहिती देत नाहीत या कारणास्तव आयोगाकडे वेगवेगळया तारखेस व्दितीय अपीले दाखल केली होती. त्या सर्व अपिलांवर दि. ५.०५.२०१० रोजी राज्य मख्य माहिती आयुक्त यांच्या समक्ष एकत्रितपणे सुनावणी घेण्यांत आली त्यावेळी अपीलार्थी व प्रतिवादी उपस्थित होते या सर्व अपीलावर साधक बाधक चर्चा घडऊन आणण्यात आली त्यावेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की अपीलार्थी एकाच विषयावर आलटून-पालटून अपिले दाखल करण्यात त्याच्या । आशय आणि विषयांत सार्धम्य आहे त्यामुळे त्यांना वारंवार एकाच प्रकारची माहिती द्यावी लागते. जी माहिती सहजपणे देणे शक्य आहे ती त्यांना लवकरांत लवकर देण्यांत आली आहे परंतु ज्या विशेष

बाबी न्यायप्रविष्ठ आहेत व जी माहिती दिल्यामुळे चोकशी प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो अथवा माहिती उघड केल्यास पोलीसांच्या तपासाची दिशा बदलू शकते व त्याचा आरोपीस फायदा होऊन त्याचा चौकशी निकालावर परिणाम होऊ शकतो अशी माहिती देणे शक्य नाही अधिनियमाच्या २००५ नियमांच्या कलम ८ (१) (ज) नुसारच ती देता येत नाही असे अपीलार्थीस अनेकदा लेखीही कळविले आहे परंतु अपीलार्थीस ते पटत नाही व त्यामुळेच त्या एकाच प्रकारची थोडाफार विषय बदलून माहिती मागवितात. अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांनी असेहि सांगितले की राज्य मानवी हक्क आयोग यांनी प्रकरण क्र.२२/२००८/५७५,दि. २९.११.२००८ अन्वये निर्णय देऊन पोलीसांनी योग्य ती कारवाई केली असल्याने पोलीस अहवाल मान्य करुन प्रकरण निकाली काढले आहे. त्याचीही प्रत अर्जदारास दिली आहे.

अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की माहिती महत्वाच्या मुद्यावर व शासकीय अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारासंबंधी आहे सदर माहिती जनहिताचा हेतु समोर ठेऊनच मागितलेली आहे. परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी विषयाला बगळ देऊन दिशाभूल करणारी माहिती देतात.

एकंदरीत अपीलार्थीने दाखल केलेली सर्व अपीले व प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहितीचा साकल्याने विचार करता आयोगाचे असे मत झाले की अपीलार्थीस कार्यालयातील अभिलेख्यांत उपलब्ध असलेली माहिती दिलेली आढळून आली. ज्या बाबी संदर्भात चौकशी अजून पूर्ण झाली नाही त्याची माहिती दिल्यास पोलीस तपासांत अडथळा निर्माण होण्याची शक्यता असल्याने ती देता येत नाही हे प्रतिवादी यांचे म्हणणे योग्य वाटते. अशा परिस्थितीत अपीलार्थीस उपलब्ध माहिती दिली गेली आहे परंतु चोक्शी पुर्ण होऊन प्रकरण न्यायालयात दाखल केल्यानंतर चौकशीबाबतचे कागदपत्र अर्जदारास देण्यात यावेत.

## आदेश

**वरील सर्व एकूण १३ अपीले एकत्रितपणे निकाली काढण्यात येत आहेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१९०/०२**

**श्री. कृष्णा वामन तिवडे,** **------- अपीलकर्ता**
**विभाग अध्यक्ष, राज्य परिवहन यांत्रिक कामार संघटना,**
**नाशिक विभाग, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय नाशिक,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी,**
**कर्मचारी वर्ग व कल्याण अधिकारी, राज्य परिवहन विभागीय**
**कार्यालय नाशिक, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. कृष्णा वामन तिवडे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.४.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली कामगार करार सन १९९२-०३ अन्वये सर्व कामगारांना दुय्यम प्रती सेवा पुस्तकाची नक्कल मिळण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

दिनांक २२.१२.२००९ रोजी याच माहितीसाठी व्दितीय अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त याच विषयावर अपीलार्थीचे आधीचे अपील क्र. मुमाआ/अपील क्र. १५८६/०२ दि.२२.१०.२०१० मध्ये आदेश पारित केले होते. त्या आदेशांत उत्तरवादी तर्फे सांगण्यात आले की अपीलार्थी २०० कर्मचाऱ्यांची नावे दखील व त्याच्या दुय्यम प्रती संबंधीतांना जन माहिती अधिकारी यांच्या मार्फत देण्यात येतील परंतु प्रत्याक्षात आयोगाने अपीलार्थीस दिलेली २५ दिवसांची मुदत संपून गेली तरी सदर आदेशानुसार श्री तिडके यांनी अपेक्षित असलेल्या २००

कर्मचाऱ्यांची यादी आजपर्यंत सादर केलेली नाही तरी तिडके यांनी जन माहिती अधिकारीयांना २०० कर्मचाऱ्यांच्या नावांची यांदी त्वरीत (पाच दिवसात) उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२६१/०२**

**श्री. जनार्दन अशोक घोडे** **------- अपीलकर्ता**
**चित्तरंजन सोसायटी सायखेडा रोड,**
**जेल रोड, दसक, नाशिक रोड ४२२ २०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी,**
**उप जिल्हाधिकारी (प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नाशिक**

**व वे च न** -

अपीलकार श्री. जनार्दन अशोक घोडे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०८.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०६.२००७ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) दिवंगत स्वातंत्र सैनिक रघुनाथ कोंडाजी घोडे यांचे नामनिर्देशन पत्राची छायांकित प्रत २) श्रीमती कला वसंत डेरके याचा नामनिर्देशनानुसार वारस म्हणून नांव लावणे संबंधीचा अर्ज व सोबतची कागदपत्रे. ३) त्यानंतरच्या कार्यवाहीची टिपणी व आदेशाची प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

आयोगाकडील दिनांक ३०.०७.२००८ रोजीच्या व्दितीय अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी याच विषयावरील अपीलार्थीचे आधीचे अपील क्र. २००८/सीआर-६५/०२ दि. २६.०८.२००८ मध्ये आदेश पारित केले आहेत असे दिसून आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ११.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१७४/०२**

**श्री. प्रशांत वसंतराव देशमुख** ------- **अपीलकर्ता**
**१,गायत्री रो.हाऊसेस महाजन नगर,**
**इंद्रपस्थ कॉलनी, अतुल डेअरी समोर,**
**अंबड, नाशिक ता.जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**नाशिक एज्युकेशन सोसायटी, व्दारा पेठे विद्यालय,**
**रविवार, कारंजा, नाशिक**

**जन माहिती अधिकारी,**
**मुख्याध्यापिका, कमलावती कोठारी मुलीची प्राथमिक शाळा,**
**जेल रोड, नाशिक रोड, नाशिक,जि.नाशिक**

**व वे च न** -

अपीलकार श्री. प्रशांत वसंतराव देशमुख ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली सन १९९६ ते २००३ या कालावधीत शिक्षक शिक्षकेतरांचे पगार पत्रक हजेरी पट, व्हावचर्स ऑडीट रिपोर्ट, प्राव्हिडंट फंड व श्री. शंकर कडलग शिपाई यांची नेमणूकीचा दिनांक याची माहिती मागितली होती.

व्दितीय अपीलावर दिनांक २२.१२.२००९ रोजी झालेल्या आयोगाकडील सुनावणीच्या वेळी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी याच विषयावरील अपीलार्थीचे यापूर्वीचे अपील क्र.मुमाआ/नाशिक/अपील/सी आर क्र. १५३९/०२ मध्ये आदेश पारित करुन दि. २५.०२.२०१० राजी निर्गमित केले आहेत असे दिसून आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ११.०६.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१९९/०२

| | |
|---|---|
| श्री. योगेश मधुकर घोडे<br>रा. ४५९०, गणेशवाडी मारुती मंदिराजवळ,<br>पंचवटी, नाशिक-३. | ------- अपीलकर्ता |

विरुध्द

| | |
|---|---|
| प्रथम अपिलीय अधिकारी<br>उपायुक्त प्रशासन नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | ------- उत्तरवादी |
| जन माहिती अधिकारी<br>उपायुक्त प्रशासन नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | |

- वि वे च न -

अपीलकार श्री. योगेश मधुकर घोडे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली महानगरपालिकेचे माजी आयुक्त विकास ठाकूर यांना म.न.पालिकेच्या मालकीचे निवासस्थान राहण्यास दिलेले होते तेव्हा त्याच्या पगारातून घरभाडे कापूर घेत होते परंतु आयुक्तांच्या निवासस्थानाचे विजबील महानगरपालिकेच्या खजिल्यातून भरण्यांत आलेले असून सदर वीज बिल भरण्यासाठी महानगरपालिकेच्या नियमावीलचे प्रत. २) पाणी पट्टी बील बांधकाम विभागामार्फत भरण्यांत आल्याने ते नियमानुसार असल्यास त्याची प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०७.२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीने मागितलेली माहिती मुख्य लेखाधिकारी मनपा नाशिक व कार्यकारी अभियंता (विद्युत) व (बांधकाम) मनपा नाशिक या कार्यालयांशी संबंधीत असल्याने अर्ज संबंधीत कार्यालयास हस्तांतरीत करण्यात आला व तसे अपीलार्थीस कळविले.

माहिती विहित वेळेत न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर दि. २३.०९.२००९ रोजी सुनावणी झाली त्यावेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आस्थापना विभागाकडे माहिती उपलब्ध नसल्याने लेखी कळविण्यांत यावे असल्यास माहिती पुरवावी असे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिले.

माहिती न मिळाल्याने अपीलार्थी यांनी व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या चर्चेत असे दिसून आले की अपीलार्थीने मागितलेली माहिती २ मुद्यांवरील होती परंतु ती माहिती कुणी उपलब्ध करुन द्यावयाची याचा निर्णय आयोगाच्या सुनावणी पर्यंत झालेला नाही जन माहिती अधिकारी यांनी माहिती या कार्यालयाशी सबंधीत नाही असे सांगून संबंधीत अर्ज लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता (विद्युत/बांधकाम) या विभागाकडे वर्ग केला परंतु त्या दोन्ही विभागांनी मागितलेली माहिती मूळ कार्यालयानी त्यांच्या आस्थापनेवरुन उपलब्ध करुन द्यावी असे उलट टपाली कळविले. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जातील मागणीनुसार नियमावली आस्थापना शाखेकडे उपलब्ध नाही असे लेखी कळविले. स्वत: अपीलार्थी सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांना मिहती मिळाली की नाही याचा बोध होत नाही. या अपील निर्णयाची प्रत उप महापालिका आयुक्त प्रशासन यांना देण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्यांनी अर्जदारास दहा दिवसांत माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२७६/०२**

**श्री. अशोक विठ्ठल चकोर,** **------- अपीलकर्ता**
**व्दारा : श्री.स्वामी समर्थ हार्डवेअर अँड इलेक्ट्रीकल्स,**
**पोपारेगतळी, गावठा सिन्नर, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी तहसिलदार,**
**सिन्नर, जिल्हा नाशिक ४२२ १०३**

**जन माहिती अधिकारी**
**तलाठी, वडगांव, ता. सिन्नर, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अशोक विठ्ठल चकोर,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९.०८.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली वडगांव ता.सिन्नर येथील केस क्र.४०/८ या केसचा निकाल मा.तहसिलदार सिन्नर यांनी दिलेला आहे. २) सदर केस

मधील वारसदार ३) मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावरील नावांची नोंद ४) प्रतीवादीच्या नोटीशी च्या प्रती इत्यादि ५ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती कार्यालयाशी संबंधीत नसल्याने व प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कारण सांगून माहिती देण्याचे नाकारले या कारणास्तव अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही परंतु अपीलार्थीस प्रश्न स्वरपात मागितलेल्या माहितीचे अभिलेख समक्ष पहाण्यासाठी उपलब्ध करुन देऊन त्यांना त्यातील आवश्यक असलेली प्रतीच्या स्वरुपात देऊन त्याची पोहोच घेतली आहे.

माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली त्यामुळे आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे होते की माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी माहिती प्रश्नार्थक असली तरी ती अपीलार्थीस देण्यांत आली आहे. अपीलार्थी यांनी माहिती मिळाल्याची पोहोच दिली आहे असे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आयोगाकच्या निदर्शनास आणले.

माहितीचा अर्ज प्रश्नार्थक स्वरुपातही असू शकतो, त्या प्रश्नाचे उत्तर ज्या कागदपत्रात सापडेल त्या कागदपत्राची नक्कल द्यावयाची असते.

अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांना अभिलेख समक्ष पहावयास देऊन देण्यात आल्याचे दिसून येते या कारणास्तव मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२५९/०२**

**श्री. रघुनाथ सिताराम आढाव** **------- अपीलकर्ता**
**९, रघुकूल अपार्टमेंट, तळमजला, सेवा कुंज समोर,**
**पंचवटी, नाशिक-३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभागीय कार्यालय, नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**राज्य परिवहन विभागीय कार्यालय, नाशिक**
**शिंगाडा तलाव, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. रघुनाथ सिताराम आढाव,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ५.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.०७.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) दि. २९.०६.२००८ रोजीच्या खात्या अंतर्गत सहायक वाहतुक निरीक्षक या पदाच्या परिक्षेत उतीर्ण झालेल्याचे मार्क व उमेदवारांची यादी. २) अपीलार्थीच्या उत्तर पत्रीकेची छायांकित प्रत. ३) सदर परिक्षेत उतीर्ण किती मार्कास करण्यांत आले व त्याची नियमावली प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि.२९.०८.२००८ च्या पत्रान्वये सहायक पोलीस निरीक्षक परिक्षेची कार्यवाही मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचे मार्फत झालेली असल्यामुळे व सदरबाब धोरणात्मक असल्याने मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडे विचारणा करण्यांत येऊन मी माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस कळविण्यांत येईल असे कळविले.

अपीलार्थीस माहिती न मिळाल्याने प्रथम अपील दाखल केले त्यानुसार प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस कार्यालयीन वेळेत माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग व कल्याण अधिकारी राज्य परिवहन नाशिक यांच्याकडे समक्ष संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे सांगितले त्याचवेळी महाव्यवस्थापक यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अर्जास अनुसरुन यांग्य ते उत्तर जन माहिती अधिकारी यांनी पाठविले नाही हे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

नक्की माहिती कोणी द्यावयाची या संभ्रमात अपीलार्थी पडल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले त्यावरील सुनावणीस वादी व प्रतिवादी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की माहिती नक्की कोणी द्यावयाची याचा घोळ झाल्यामुळे विहित कालावधीत माहिती देता आली नाही त्याच प्रमाणे अपीलार्थीस माहितीसाठी समक्ष बोलाविले असता ते आले नाहीत. तरीही अपिलार्थी श्री. आढाव यांनी मागितलेली माहिती देण्यास या कार्यालयाची संमती असल्याने त्यांच्या सहमतीनुसार त्यांची स्वतःची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या सुनावणीस समोर माहिती देण्याचे कबुल केले आहे तेव्हा सदरहू माहिती अपीलार्थीस पंधरा दिवसांत विनाविलंब द्यावी. यास अपीलार्थीने सहमती दर्शविली.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १४.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/ २५४ /०२**

**श्रीमती प्रतिभा नाथा चव्हाण** **------- अपीलकर्ता**
**रा.पोलीस मुख्यालय, नाशिक शहर, ७/५,**
**जुन्या सी.बी.एस.मागे, गंगापूर रोड नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी**
**यांचे कार्यालय सामान्य प्रशासन विभाग,**
**जिल्हा परिषद नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यालयीन अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हापरिषद, नाशिक**

**- विवेचन -**

अपीलकार श्रीमती प्रतिभा नाथा चव्हाण,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.०७.२००९ रोजी च्या अर्जान्वये त्यांनी दि. ६.०४.२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीच्या तपशीलाची मागणी केली होती.

दिनांक २२.१२.२००९ रोजी झालेल्या अपीलावर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी याच विषयावर अपीलार्थीचे आधीचे अपील क्र.मुमाआ/नाशिक/अपील/सीआर क्र. १५९२/०२, दि. २५.०२.२०१० च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश दिले होते की, दि. ६.०४.२००९ रोजीच्या अपीलार्थीच्या तक्रार अर्जावरील कार्यवाही पुर्ण करुन चौकशी अहवालाची प्रत त्वरीत अपीलार्थीस पुरविण्यांत यावी. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०४.२०१० च्या पत्राव्दारे (श्रीयुत चव्हाण जितेंद्र नाथा) अपीलार्थींना हव्या असलेल्या चौकशी अहवालाची प्रत

पुरविण्यांत आली आहे. त्या अपीलचे अपीलार्थी व या अपीलाचे अपीलार्थी त्यांचा पत्ता एकच आहे. अपीलार्थी सुनावणीच्या वेळी उपस्थित नाही. यावरुन त्यांना माहिती मिळाली असावी अशी शक्यता आहे. तरीहि अर्जदाराचे हे अपील वेगळयाने केले असल्याने त्याची माहिती अर्जदारास दहा दिवसांत विनामुल्य पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १९.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२६७ /०२**

**श्री. बिंटु पंढरीनाथ भोयटे,** **------- अपीलकर्ता**
**रा.हिवरखेडे, तो.बोदवड,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अधिकारी (ई व द) विभाग क्र.३, जिल्हापरिषद,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपअभियंता,जिल्हापरिषद (ई व द) उप विभाग, बोदवड,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. बिंटु पंढरीनाथ भोयटे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली डोंगरगांव सुतारखेडे रोडची लांबी x रुंदी किती मंजूर ग्रेड किती १) झालेल्या कामाचाखर्च किती ३) तसेच नदी जात्रात १०० मीटर रस्ता किती रुंदीचे डांबरीकरण आहे किंवा नाही. ४) हिवरखेडे ते काजी सांगवी डांबरीकरण डागडुजीची एम.बी.इत्यादि अनेक मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे माहितीची ६०० पाने असून प्रत्येक पानास रु. २/- याप्रमाणे रु. १२००/- मात्र भरणा करुन चलनाची प्रत सादर केल्यावर मागितलेली माहिती पुरविण्यांत येईल असे अपीलार्थीस कळविले.

माहिती न मिळल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. १.०६.२००९ रोजी सुनावणी ठेवली परंतु अपीलार्थी कार्यालयात उशीरा गेल्याने सुनावनी पुढे ढकलण्यात आली परंतु त्यानंतर सुनावणी न झाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिल्याचे नमूद केले आहे व अपीलार्थीने मान्य केले असल्याचे सांगितले.

अपीलार्थी हे नेमके आयोगाकडील सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांना माहिती मिळाली की नाही हे समजू शकले नाही.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी अपीलावर सुनावणी घेणे बंधनकारक असतांना त्यांनी ती घेतलेली दिसत नाही हे त्यांचे कृत्य जबाबदारी टाळण्याचे दिसते यापुढे असे करुन नये.

एकंदरीत अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेली माहिती उपलबध असून दिल्याचे दिसून येते.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १४.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२५३ /०२**

**श्री. रामदास खुशाल बिरारी,** **------- अपीलकर्ता**
**रा.हाताणे,ता.मालेगांव,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसीलदार तहसील कार्यालय, माळेगांव**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माळेगांव,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. रामदास खुशाल बिरारी,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०७.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते.जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०६.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) सामनेवाला याचा गट क्र. २१२/२ व अर्जदाराचा गट क्र. २१२/१ या दोघांचा समाईक बांधाच्या हद्दीची वादविवादाबाबत २) समाईक बांधाच्या गटावरुन जमिनीवर झालेले अतिक्रमण ३) शेत जमिनीची सरकारी मोजणी होण्याबाबत आदेश होण्याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०४.२००९ रोजीच्या पत्राव्दारे अर्जदारा गट क्र. २१२/१ व गट क्र. २१२/२ या जमिनीची मोजणी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख माळेगांव यांचेकडे भरणा करुन मोजणी करुन घ्यावी असे लेखी कळविले. माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीस प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या सात दिवसांच्या माहिती देण्याबाबत सूचना दिल्या. परंतु माहिती प्राप्त न झ ाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस वादी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अपीलार्थीस माहिती दिली असे आयोगास सांगितले तर अपीलार्थीचे म्हणणे होते की माहिती अपुरी दिली गेली आहे. तरी एकंदरीत याप्रकरणी असे दिसते की अपीलार्थीस काही प्रमाणात माहिती दिली गेली आहे. परंतु सामनेवाला यांच्या विरुध्द काय कारवाई झाली याचा खुलासा अपलार्थीस हवा आहे. त्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अद्याप दिलेली दिसत

नाही. नस्ती जारीने शोधून काढूच सामनेवाला यांनी जबाब दिला असल्यास त्याची माहिती अर्जदारास पंधरा दिवसांत द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१६ /०२**

**कु.माया माधवराव गांगुर्डे/श्री बैसाने संजिव गंगाधर** ------- अपीलकर्ता
**रा.पाळेखुर्द, ता.कळवण, जि.नाशिक,**
**आदिवासी ग्रामीण विभाग,**
**कळवण.**

विरुध्द

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- उत्तरवादी
**अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**नाशिक बांधकाम भवन,त्र्यंबक रोड,**

**नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**बांधकाम भवन,त्र्यंबक रोड,नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार कु.माया माधवराव गांगुर्डे/श्री बैसाने संजिव गंगाधर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०६.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली पद स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची दि. २०.०४.२००८ रोजी घेण्यांत आलेली लेखी परिक्षा दि. २७.०४.२००८ झालेल्या मौखीक परिक्षांचे गुण पत्रकांच्या प्रती मिळण्याची विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०६.२००८ च्या पत्रान्वये अर्जदारांना त्यांना मिळालेल्या गुणांचा तपशील दिला परंतु परिक्षेचे गुणपत्रक प्रती हे कार्यालयीन गोपनीयतेमुळे देता येत नाही असे कळविले परंतु जास्त गुण मिळऊनही कमी गुण मिळालेल्या कर्मचाऱ्यास घेण्यात का आले त्यासाठी उमेदवारांची यादी मिळण्याबाबत. प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी अपीलार्थी गैरहजर राहिले असताही अपीलार्थीस १६७ पदांची निवड झालेल्या उमेदवाराची यादी अर्जदारास मागणीप्रमाणे पुरविण्यांत आली चुकीची निवडप्रक्रीया यादी दिली गेल्याचे नमूद करुन व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते त्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही परंतु प्रतिवादी यांनी संपुर्ण माहिती विहित वेळेत दिल्याचे निदर्शनास आणले. त्याचप्रमाणे १६७ पदाची निवड यादीही अर्जदारांना पुरविण्यांत आली हे दिसून येते त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १४.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/७३७ /०२

श्री.ज्ञानचंद्र पाटील, ------- अपीलकर्ता
शितल दमणि हायस्कूल (पुर्व),
नांदणी चौक,सांगली ४१६ ४१६

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालय,
वसा बिल्डींग, मार्केट यार्ड, सांगली

- वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ३.१०.२००८
सुनावणीचा दिनांक : ०५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि. ८.०४.२००८ च्या अर्जाव्दारे एकूण आठ मुद्यांवर माहिती मागितली. यावर त्यांना दि. ६.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. ७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. २३.०७.२००८ रोजी सुनावणी होऊन दि. २३.०७.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले यानंतर त्यांना माहिती मिळाली परंतु ती परिपुर्ण नव्हती म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी आयोगाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकूण घेतले. अपीलार्थीनी यावेळी अशी मागणी केली की त्यांनी माहिती अधिकाराच्या कलम ४ अनुषंगाने मागितलेली माहिती मिळालेली नाही ती मोफत मिळावी. याचा विचार करता आयोगाचे निदेश आहेत की अपीलार्थीना त्यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या मागणीनुसार माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. आगोगाच्या निदेशाची अंमलबजावणी सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १७.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/९६१ /०२**

**श्री.ज्ञानचंद्र पाटील, ------- अपीलकर्ता**
**शितल दमणि हायस्कूल (पुर्व),**
**नांदणी चौक,सांगली ४१६ ४१६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**शहर विभाग, सांगली**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता, म.रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**शहर विभाग, सांगली**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०३.२००९
सुनावणीचा दिनांक : ०५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि. १०.०९.२००८ च्या अर्जाव्दारे दि. १.०८.२००८ ते १०.०९.२००८ या कालावधीची चार विविध मुद्यांवर माहिती मागितली. यावर दि. ६.१०.२००८ रोजी अपीलार्थींना असे कळविण्यात आले की त्यांनी दि. १०.१०.२००८ रोजी कार्यालयात उपस्थित राहावे त्यावेळी त्यांना माहितीशी संबंधित कागदपत्रे दाखविता येतील. त्यानुसार अपीलार्थींनी पाहणी केली परंतु त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी दि. ३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन त्यांना संपूर्ण माहिती देण्याचे दि. १०.१२.२००८ रोजी आदेश देण्यात आले. तथापि त्यांना परिपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी उत्तरवादींनी आयोगास सादर केले की अपीलार्थीस सर्व माहिती दाखविली आहे तथापि या व्यतिरिक्त त्यांना काही माहिती पाहिजे असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात येईल. याचा विचार करता आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थींना पुन्हा एकदा पूर्व नियोजित वेळ ठरवून जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात बोलवावे व त्यांना आणखी नेमकी कोणती माहिती हवी आहे हे जाणून घ्यावे व त्यानुसार त्यांना हवी असलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुरवावी व त्यासाठी शुल्क आकारण्यात येऊ नये.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२५१ /०२**

**श्री.अब्दुल मजीद मुसा शाह, ------- अपीलकर्ता**
**रा. घर नं. १२२/ग.नं. ४,**
**व्हिला झोपडपट्टी, रविवार वार्ड,**
**माळेगांव, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उपायुक्त (कर), माळेगांव महानगरपालिका, माळेगांव**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख स्वच्छता निरीक्षक, माळेगांव महानगरपालिका माळेगांव,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.अब्दुल मजीद मुसा शाह,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.०७.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली श्री गुलाम इद्रीस अब्दुल खालीफ, हुसैनाबाद कॉलनी, माळेगांव जि.नाशिक या व्यक्तीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दाखल केलेल्या अर्जास अनुसरुन एकूण २ मुद्यांवर सविस्तर माहिती मागितली होती.

अपीलार्थीच्या एकूण ३ व्दितीय अपीलावर झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद खंडपीठ यांनी श्री.गुलाम इद्रीस यांनी याच विषयावर दाखल केलेली तीन अपीले अपील क्र. २००७/रामाआ/अपील/सीआर/२४१५,२४१६ व २४१७ दिनांक २५.०२.२००९ या आदेशान्वये खारीज केली आहेत असे दिसून आले. मात्र याच आदेशात पुढील प्रमाणे निर्देश दिले होते.

" या संदर्भात आयुक्त महानगरपालिका माळेगांव जि.नाशिक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की या प्रकरणाची त्यांची त्यांच्या स्तरावर चौकशी करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस खरोखरीच त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली आहे किंवा कसे याची शहानिशा करुन आपण अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा."

अर्जदाराचे म्हणण्यानुसार असा अहवाल अजून सादर झालेला नाही याची खात्री औरंगाबाद खंडपीठ कार्यालय करीलच.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १७.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०३ /०२**

**श्री.पुजाराम लक्ष्मण निकम,** **------- अपीलकर्ता**
**श्रध्दा सबुरी सप्तश्रुंगी कॉलनी,**
**माळेगांव कॅम्प ता.माळेगांव, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जनरल सेक्रेटरी महात्मा गांधी विद्यामंदीर, माळेगांव कॅम्प,**
**ता.माळेगांव, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्यालय, के.बी.एच.माध्यमिक विद्यालय, माळेगांव कॅम्प,**
**ता.माळेगांव, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.पुजाराम लक्ष्मण निकम,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.११.२०१० रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) शाळेत माहे २००७ मध्ये संस्थेचे शाळेस समन्वय यांनी शाळेतील कर्मचाऱ्यांची सहविचार सभा घेण्यांत आली आहे त्याचा दिनांक २) सभेच्या उद्देशाबद्दलची माहिती ३) शाळेच्या नूतनीकरणास जमा झालेला निधीचा तपशील. इत्यादि नऊ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.११.२००७ च्या पत्राव्दारे विद्यालयांत नियमीतपणे पालक, शिक्षक, यांचे आदान-प्रदान मौखिक विचार विनिमय, मार्गदर्शन इत्यादि तसेच विद्यार्थ्यांचे पालक व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत बैठक घेतली जाते. अर्जदारास अभिप्रेत असलेली सभा झाली नसल्याने उर्वरित बाबींचा प्रश्न येत नाही असे अपीलार्थीस कळविले. माहिती अपूरी व सत्य लपवून ठेवने असे सांगत अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलावरील सुनावणीस प्रथम अपीलीय प्राधिकारी अपीलार्थी यांनी केलेला माहिती अर्ज व माहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर त्याचप्रमाणे संलग्न कागदपत्रे याचे अवलोकन करण्यात आले सदरची माहिती मुदतीत देण्यात आली असे सांगून अपील निकाली काढले त्या विरोधात अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीस वादी प्रतिवादी उपस्थित होते जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की मागितलेल्या माहितीत लपविण्यासारखे काही नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती दिलेली आहे परंतु त्यांने अपीलार्थीचे समाधान झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी हवे तर त्यांना पुन्हा माहिती देण्यांत येईल असे म्हटले आहे त्यास अनुसरुन त्यांनी अपीलार्थीस कार्यालयात बोलावून हव्या असलेल्या माहितीचे कार्यालयीन दप्तरी असलेल्या कागदपत्राचे अवलोकन करण्यास द्यावे व त्यातील हवी असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १९.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ/४७३४०/अपील क्रमांक ५७२० /०२**

**श्री.बिपीन देढीया,** **------- अपीलकर्ता**
**बी/३, लक्ष्मीनारायण भुवन,**
**कस्तुरबा रोड नं.१, देना बँकेच्या वर,**
**बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**रुम नं. ४०८, गृहनिर्माण भवन, कला नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**रुम नं. ४०८, गृहनिर्माण भवन, कला नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**- विवेचन -**

अपील क्रमांक ५७२० च्या दिनांक २९.०५.२०१० च्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी २४ दिवसाच्या विलंबाबद्दल रुपये ६,०००/- ची शास्ती का लावू नये याचा खुलासा करण्यासाठी त्यांना आयोगाच्या कार्यालयात बोलावीले होते. त्याप्रमाणे त्यांनी उपस्थित राहून पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

1. The applicant Shri Bipin H. Dedhia has asked information vide his applicant dt. 22.09.2009 (recd. on 24.09.2009) for the details regarding Redevelopment of cessed building through private developers as per amended D.C.Regulation Rule No. 33(7) for the period from 1996 to till date, per say the information was asked in **General in nature** about the **Rules /Regulations /Criteria /Instruction Manuals** etc.
   a) To obtain approval or permission for the redevelopment of cessed buiding in Mumbai with the involvemnet of tenants /landlords/private developer.
   b) To amend the approved plan for the rdevelopment of cessed building in Mumbai with the involemnet of tenants /landlords /private developer.

**2.** Also the information was aksed related to **procedure to be followed regarding.**
   i) Allotment of tenements.
   ii) Obtaining consent of tenants/occupants alongwith format of consent and list of documents.
   iii) Complied with before submission of plan for approval or permission.
   iv) Amendements of approved plan alongwith change of allotment to the tenants/occupants.

3. Name & designation of the officer having authority to approve or amend plans etc.

The informaton booklet containing all the details regarding redevelopment of cessed properities is readily available in the form of booklet for benefit of Tenant/Occupiers as well as developers. Bieng a published documents this matter can not be considered as information to be given under RTI as it is disclosed publihshed document.

And also as the information asked above by the applicant were **not specific** about any **redevelopment project of a specific cess building** and the information is required **in person** by the applicant hence the then PIO and DE-II/MBRRB was in state of mind/opinion that the applicant will attend the office for collecting the general information regarding the redevelopment of cess building inthe form of Government Resolution/Notification/Printed Booklet/Guidelines etc.

However the applicant did not opt to attend the office and the then PIO faild to contact the applicant as the applicant didi not wish to provide the contact number in his applicantion dated 22.09.2009.

4. Looking to the circumstances the then PIO supplied all requisite information by post to Mr.Bipin H.Dedhia vide letter No.REE/RR/32590/755/09, dated 19.11.2009 (Copy enclosed)
5. Mr.Bipin H Dedhia agian represented REE vide his letter dated 30.12.2009. and the same was complied by then PIO vide letter No. REE/RR/38238/011/09,dated 04.01.2010. (Copy enclosed)
6. The appeal made by Mr.Bipin H Dedhia to the 1St Appellate Authority and REE/MBRRB vide his letter (application) dated 09.11.2009 was kept for hearing on 30.11.2009 at 5.30 P.m. by the hearing ( copy of the proceedind enclosed.)
7. The above facts stated at Sr.No. 4,5 & 6 above were placed before hon. Chief Information Commissioner during the hearing of Appeal on 29.05.2010. (Copy enclosed)

In view of the above facts it is opined that there is no interntional delay/negligence caused by then PIO while replying /responding the application after 24 days beyound one month time period, hence it is humbly submitted to **Consider the request** for not leving any fine/penalty to then PIO/MBRRB.

हा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः १९.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२९१ /०२

श्री.रमेश विठ्ठल जगताप, ------- अपीलकर्ता
रा.जगताप गल्ली, जगताप भवन,
संगमेश्वर, ता.माळेगांव,
जि. नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी
उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय,
माळेगांव उपविभाग माळेगांव, ता.माळेगांव,
जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय,
माळेगांव उपविभाग माळेगांव, ता.माळेगांव,
जि.नाशिक

- वि वे च न -

अपीलकार श्री.रमेश विठ्ठल जगताप, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०३.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०१.२०१० रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) मंजूर बांधकाम नकाशाची प्रत. २) नगरपालिकेकडील बांधकाम परवानगीचे पत्र. ३) नगरपालिकेचे एन.ओ.सी.के आऊट प्लॅन, प्लॉटचा ७/१२ उताराला कबजेदार सदरी झालेल्या नोंदी इत्यादि मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २९.०१.२०१० च्या पत्रान्वये मागणी केलेले कागदपत्र कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता आढळून येत नाही त्यामुळे माहिती देता येत नाही असे अपिलार्थीस कळविले. त्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावरील सुनावणीवर दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र अभिलेखांत सापडत नाहीत म्हणून सांगितले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना संबंधित कागदपत्र गहाळ झाल्याची तक्रार पोलीस स्टेशन माळेगांव यांना देण्याची समज दिली. माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीस वादी गैरहजर होते परंतु प्रतिवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्र गहाळ झाल्याची तक्रार छावणी पोलीस स्टेशनला दिल्याचे सांगितले त्याचप्रमाणे अर्जदाराने मागितलेली कागदपत्रे सहा संचालक नगररचना महानगरपालिका भडगांव यांचेकडे उपलब्ध होऊ शकतात अशी माहिती दिली.

अपीलार्थी सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे त्यांचे म्हणणे काय होते ते समजू शकले नाही. अपीलार्थीस उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षित आहे मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याची तक्रार जन माहिती अधिकारी यांनी केली असल्याने माहिती उपलब्ध नाही या म्हणण्यात तथ्थ्य आहे शिवाय त्याची सदर माहिती सहा संचालक, नगररचना महानगरपालिका माळेगांव यांच्याकडे उपलब्ध होऊ शकते असा सल्ला अपीलार्थीस दिला आहे जर कार्यालयात माहिती उपलब्ध नाही पण ती दुसऱ्या कार्यालयात उपलब्ध आहे अशी जर परिस्थिती आहे तर तो अर्ज पहिल्या कार्यालयाने स्वतःच त्या दुसऱ्या कार्यालयास पाठवावयाचा असतो. याची जाणीव जन माहिती अधिकारी यांनी ठेवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १९.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३१३ /०२**

**श्री.साहेबराव गंगाधर नागरे,** **------- अपीलकर्ता**
**मुपो.मातुलठाण, ता.येवला,**
**जि. नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसीलदार, तहसील विभाग येवला, ता.येवला,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**स्वागत गॅस एजन्सी, (भारत गॅस डिलर) येतला**
**आंबेडकर शॉपिंग सेंटर, येवला (नाशिक)**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.साहेबराव गंगाधर नागरे,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि.

१९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.११.२००८ रोजी अर्ज करुन १) आपण एजन्सी घेतल्यापासूनचा कालावधी २) आपल्याकडे किती ग्राहकांनी अधिकृतपणे गॅस कनेक्शन घेतले आहे शा सर्व गॅस धारक ग्राहकांचे खाते पूर्ण पत्ता असलेली यादी अशी माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. २४.०२.२००९ अन्वये अपीलार्थीचा अर्ज मे.सेल्स ऑफीसर, बी.पी.सी.एल.पी.जी. बॉटलींग प्लॅन माळेगांव एम.आय.डी.सी सिन्नर यांच्याकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याचे कळविले, माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही म्हणून अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.त्यावरील सुनावणीस फक्त अपीलार्थी हजर होते. त्यावेळी अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की त्यांना अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारे माहिती मिळाली नाही तरी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी.

प्रत्यक्षात या अपील नस्तीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०५.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीस लेखी असे कळविले की माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा व्याख्या २ (छ) (ज) नुसार समुचित शासन किंवा सक्षम प्राधिकारी यांनी या अधिनियमान्वये तयार केलेल्या सार्वजनिक प्राधिकरण यांना लागू आहे. स्वगत गॅस एजन्सीस शासनाकडून कोणत्याही प्रकारे वित्त पुरवठा होत नाही सबब त्यांनी केलेले गॅस वितरण माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही त्यामुळे सदर प्रकरणी आपण भारत पेट्रोलियम महामंडळ मर्यादित यांच्याशी संपर्क साधून माहिती घेऊ शकता असे लेखी अपीलार्थीस कळविले जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कृती योग्य असल्याचे आयोगाचे मत झाले या कारणास्तव मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १९.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२१० /०२**

**श्री. अशोक तुकाराम भोये,** **------- अपीलकर्ता**
**मु.पो.गोडोळे, ता.दिंडोरी,**
**जि. नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समितती दिंडोरी,**
**ता.दिंडोरी, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पंचायत समितती दिंडोरी,**
**ता.दिंडोरी, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अशोक तुकाराम भोये, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०३.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) सन १९९० ते सन २००९ या कालावधीतील घरकुल लाभार्थी यांच्या फोटोची छायांकित प्रत २) लाभार्थींच्या नावांची यादी ३) घर कधी पूर्ण झाले इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी घरकुल लाभार्थीची यादी सन १९९८ ते सन २००९ पर्यंत अपीलार्थीस दिली परंतु सन १९९० पूर्वीची लाभार्थीच्या घ्ज्ञरकुलाची यादी कार्यालयीन दप्तरात आढळून आली नाही तसेच लाभार्थींचे फोटो व अंतिम मुल्यांकन हे पंचायत समिती स्तरावर दिले आहेत असे अपीलार्थीस कळविले. सन

१९९० ते १९९७ पर्यंतची लाभार्थींची यादी न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली घरकुल लाभार्थींची माहिती दिलेली आहे. इंदिरा आवास योजनेचे सनियंत्रण नोंदवहीवर तपासले असता पंचायत समितीकडेही इ.स.१९९७-९८ पूर्वीचे रजिस्टर ठेवलेले आढळले नाही. त्यामुळे पंचायत समिती व ग्रामपंचायत पातळीवरील उपलब्ध माहिती अर्जदारास देण्यात आली आहे. त्यापूर्वीची माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे आहे का यासंबंधी पंचायत समितीने त्यांचेकडे विचारणा केलेली आहे. त्याचा पाठपुरावा करुन उर्वरीत माहिती मिळाल्यास ती अर्जदारास देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/३७४२१/तक्रार क्रमांक २६४/०१**

**डॉ.श्री. मोहम्मद बदरुद्दीन** ------ **तक्रारकर्ता**
**माजी व्यवस्थापक, शिब्ली नॅशनल इंटर कॉलेज, जनपद,**
**अजमगढ, उत्तरप्रदेश राज्य,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उप पोलीस आयुक्त, परिमंड-९, हील रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,**
**क्रॉफर्ड मार्केट, मुंबई ४०० ००१**

**- वि वे च न -**

डॉ.श्री. मोहम्मद बदरुद्दीन, माजी निबंधक, शिब्ली नॅशनल इंटर कॉलेज, अजमगढ, यांनी आयोगाकडे दिनांक १२ डिसेंबर २००८ रोजी त्यांच्या ६ फेब्रुवारी २००८ रोजी एका फौजदारी प्रकरणाबाबत मुंबई पोलीसांकडून कुठचीही माहिती न मिळाल्याच्या संदर्भात तक्रार केली होती. या तक्रारीची सुनावणी दिनांक २१.०६.२०१० रोजी ठेवण्यात आली त्यावेळेला अर्जदार व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला दोन गोष्टी स्पष्ट झाल्या की अर्जदारास आवश्यक ती माहिती ही दिनांक ९.०५.२००९ रोजी पुरविण्यात आलेली आहे व अर्जदाराच्या तक्रारीतील कोणता सामनेवाला यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केलेला व कोणता सामनेवाला यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केलेला नाही याची माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भात अर्जदाराने केलेले व्दितीय अपील हे सुध्दा राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी ऐकलेले असून त्यांनी त्यांच्या दिनांक ३१.०८.२००९ रोजीच्या आदेशात अर्जदारास माहिती दिली असल्याचा निर्वाळा दिलेला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २१.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

मुमाआ २००९/८८७/तक्रार क्रमांक ८९२/०१

**श्री. नंदकुमार दशरथ बेर्डे** **------ तक्रारकर्ता**
**तांबावाला बिल्डींग, दुसरा मजला, खो.क्र.५५ व ५६,**
**दत्ताराम लाड मार्ग, लालबाग,**
**मुंबई ४०० ०१२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप संचालक, भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन),**
**पुणपे, नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,**
**विधान भवन समोर, पुणे**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कार्यालय अधिक्षक, आस्था ३, जमाबंदी आयुक्त आणि संचालक,**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य),**
**पुणे यांचे कार्यालय, पुणे**

**- वि वे च न -**

तक्रारीचा दिनांक :- १.०४.२०१०
सुनावणीचा दिनांक :- २१.०६.२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी :- उपस्थित

तक्रारीच्या संदर्भात जमाबंदी आयुक्त व संचालक यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" अर्जदार श्री. नंदकुमार दशरथ बेर्डे यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिनांक ३०.०३.२००९ रोजीचे अर्जान्वये मौजे आंबा तालुका-शाहुवाडी जि-कोल्हापूर येथील एकत्रिकरण योजनेबाबतची माहिती मुद्दा क्रमांक १ ते १२ मध्ये मागणी करणेत आलेली होती सदर अर्जाचे अवलोकन केले असता प्रस्तुत माहिती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख शाहुवाडी जिल्हा-कोल्हापूर यांचे कार्यालयाशी सबंधित असल्याने सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख शाहुवाडी यांचेकडे पाठविणेत आलेला होता. सदर कार्यालयास संपर्क साधला असता अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती तयार करुन अर्जदार यांना दिनांक २६.०३.२०१० रोजी पोस्टाचा दाखला घेऊन पुरविणेत आलेली आहे. याबाबत पोस्टाचा दाखला प्रकरणामध्ये सामील केलेला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत माहिती वरती अपीलीय प्राधिकारी तथा अधीक्ष्ज्ञक भूमि अभिलेख कोल्हापूर हे असलेने अपील दाखल केलेचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी जमाबंदी आयुक्त कार्यालय यांचे अपीलीय प्राधिकारी उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन) हे आहेत परंतु यांचेकडे देखील अपील प्राप्त झालेले नाही.तसेच अर्जदार यांचे मौजे-आंबा , तालुका-शाहुवाडी, जि-कोल्हापूर येथील गट नं.१७१ व १७३ गट दुरुस्तीबाबत प्रकरण तालुका

निरीक्षक भूमि अभिलेख शाहुवाडी यांचे कार्यालयामध्ये प्रकरणावर कार्यवाही करणेची प्रक्रीया सुरु आहे. अर्जदार यांनी या प्रकरणाबाबत मुद्दे उपस्थित केलेले आहेत."

अर्जदाराच्या अर्जास माहिती देण्यात आलेली आहे मात्र अर्जदाराचा अर्ज एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयामध्ये पाठविण्यात मात्र विलंब झालेला आहे. त्या त्या जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांची पुनरावृत्ती टाळावी.

अर्जदाराला जी माहिती पाहिजे आहे गट नंबर १७१ व १७३ यात रेकॉर्ड दुरुस्तीबाबत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शाहुवाडी यांच्या कार्यालयात कायदेशीर चौकशी चालू आहे व सुनावणीच्या वेळेला याचा निर्णय दहा ते पंधरा दिवसात होईल असेही सांगण्यात आले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/६४४/तक्रार क्रमांक ८४१/०१**

**श्री. सतीश वासुदेव राणे,** **------ तक्रारकर्ता**
**दुकाने नं. १०,पाटीलवाडी टँक रोड, शिवाजी तलाव जवळ,**
**भांडुप (प), मुंबई ४०० ०७८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** ------- **उत्तरवादी**
**म.रा.वि.वि. कं. मर्यादित, विद्युत, भांडुप नागरी परिमंडळ,**
**भांडुप (प), मुंबई ४०० ०७८**

**जन माहिती अधिकारी**
**म.रा.वि.वि. कं. मर्यादित, विद्युत, भांडुप नागरी परिमंडळ,**
**भांडुप (प), मुंबई ४०० ०७८**

## - वि वे च न -

अर्जदाराच्या दिनांक ११.१२.२००९ रोजीच्या तक्रारीच्या संदर्भात दिनांक २१.०६.२०१० रोजी चौकशी ठेवण्यात आली होती मात्र तक्रारकर्ते अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराच्या तक्रारीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी, मुख्य अभियंता यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" उपरोक्त विषयास व संदर्भीत पत्र क्र.१ ला अनुसरुन प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून पत्र क्र. मुअ/भांनाप/मा.अ./६१८४, दिनांक ३१.०८.२००९ व्दारे दिनांक ९.०९.२००९ रोजी दूपारी ठिक ३.०० वाजता भांडुप नागरी परिमंडळ, भांडुप विद्युत पहिला मजला येथे व्यक्तीगत सुनावणीसाठी हजर राहणे बाबत श्री. सतीश वासुदेव राणे यांस कळविण्यात आलेले होते. तथापी अपीलकर्ता श्री.सतीश वासुदेव राणे विहीत वेळेत हजर न राहिल्याने त्यांना आवश्यक असणारी माहिती पत्र क्र.मुअ/भानांप/माअ/६४७०, दि.११.०९.२००९ स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्यात आली त्याची प्रत मा.कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांना ही देण्यात आली होती. परंतू असे आढळले की सुनावणी पत्र क्र. ६१८४ व दिनांक ३१.०८.२००९ व माहिती सादर केलेले पत्र क्र.६४७० दि.११.०९.२००९ श्री.सतीश वासुदेव राणे यांना पोच न होता हया कार्यालयाकडे जमा झालेले आहे. त्यानंतर श्री.सतीश वासुदेव राणे यांचे पत्र दि. २५.०८.२००९ ला अनुसुन पत्र क्र. मुअ/भांनाप/माअ/७०८९ दि.८.१०.२००९ व्दारे पूर्वी पाठविलेली परंतू पोच न झालेली माहिती प्रत पूनश्च पाठविण्यात आली. मात्र सदर माहिती सुध्दा पोच न होता हया कार्यालयास जमा झाली.

म्हणून संदर्भीत पत्र क्र.२ ला अनुसरुन हया कार्यालयाकडून केलेल्या पत्र व्यवहाराच्या खालील प्रमाणे प्रती माहितीसाठी सोबत जोडण्यात येत आहेत.

१. पत्र क्र. मुअ/भांनाप/मा.अ./६१८४, दिनांक ३१.०८.२००९

२. पत्र क्र. मुअ/भांनाप/मा.अ./६१७०, दिनांक ११.०९.२००९

३. पत्र क्र. मुअ/भांनाप/मा.अ./७०८९, दिनांक ०८.१०.२००९

४. पत्र क्र. ६४७० स्पिडपोस्ट व्दारे पाठविल्याची पावती

५. पत्र क्र.६४७०---------------- " ----------------

६. पत्र क्र.७०८९---------------- " ---------------- "

अर्जदार उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. निवेदन मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २१.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०० /०२**

**श्री. दिनकर धर्माजी पाटील** ------- **अपीलकर्ता**
**रा.सर्वज्ञ बंगला, शिवाजी नगर,**
**गंगापूर, जि. नाशिक**
**नाशिक -०५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**जिल्हा कृषी विभाग, नाशिक,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, नाशिक**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. दिनकर धर्माजी पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०३.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर

अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते तरअपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.१२.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) आपले कार्यक्षेत्र कोणते २) अधिकार काय काय आहेत. ३) अधिकारात किती खर्च करण्याचा अधिकार आहे ४) मागील पाच वर्षातील खर्च किती कशासाठी, कोणत्या एजन्सीकडून त्याची माहिती ५) मागील पाच वर्षात केंद्र/राज्य योजनेसाठी आलेला निधी याची सविस्तर माहिती ६) पदाची माहिती इत्यादि मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१.२०१० च्या पत्रान्वये मागितलेली माहिती विस्तृत व मोठया स्वरुपाची असल्याचे अर्जदार यास कळविले की आपण स्वत: उपस्थित राहून प्रलंबित योजनांची माहिती पाहून घ्यावी व आवश्यक त्या प्रती घ्याव्यात असे अपीलार्थीस कळविले परंतु ते कार्यालयांत हजर न होता त्यांनी माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. अर्जदारांचे प्रतिनिधींना २४९ पृष्ठे माहिती दिलेली आहे. याव्यतिरिक्त अजून काही माहिती हवी काय अशी विचारणा प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी केली असता अपीलार्थीने माहिती आवश्यकता नसल्याचे सांगून मात्र नव्याने जिल्हयातील कृषी विभागाच्या अधिपत्त्याखाली कार्यरत असलेल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रशाबाबतीत प्रामाणिकपणे काम करावे अशी सूचना केली व त्याप्रमाणे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना लेखी परिपत्रकही काढण्यात आले तरीही त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते उत्तरवादी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेत आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यांत आले की अपीलार्थीस अभिप्रेत असलेली माहिती पुरविलेली आहे व ते त्यांनी मान्य केले आहे. पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त अन्य माहितीची आवश्यकता नसल्याने त्यांना नंतर माहिती पुरविण्याचा प्रश्न उद्भवत नाही ही जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य आहे या कारणास्तव मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२९६ /०२**

**श्री. दिनकर धर्माजी पाटील** **------- अपीलकर्ता**
**रा.सर्वज्ञ बंगला, शिवाजी नगर,**
**गंगापूर, जि. नाशिक**
**नाशिक -०५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. दिनकर धर्माजी पाटील, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०३.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी,जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.१२.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) आपले कार्यक्षेत्र किती २) कायद्याने काय अधिकार दिले आहेत. ३) आपल्या अधिकारात काय काय कारवाई केली ४) अधिकृत भंगार विक्रीवर काय कारवाई करावी इत्यादि ७ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी यावर कोणतीही कारवाई केली नाही त्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावरही सुनावणी झाली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत म्हणून अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी व उत्तरवादी असे तिघेही गैरहजर होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे काय आहे हे आयोगाला समजू शकले नाही. प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहणे चुकीचे आहे. अशा महत्वाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्याने आयोगाचा वेळ फुकट जातो तरी यापुढे जबाबदारीने वागावे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदाराने विचारलेली जी माहिती कागदपत्रांच्या स्‍ स्वरुपात उपलब्ध आहे ती हे आदेश मिळताच दहा दिवसात द्यावी.

अर्जदाराच्या अर्जास मुदतीत उत्तर दिले नाही म्हणून अधनियमाच्या कलम २० प्रमाणे शास्तीची कारवाई का करु नय यांचा खुलासा दि. २० जुलै, २०१० पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी या कार्यालयात पाठवावा. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलावर मुदतीत निर्णय दिलेला नाही. त्याबद्दल समज देण्यात येत आहे. त्याची नोंद गोपनीय अहवालात घेण्याची शिफारस प्रदुषण मंडळाच्या प्रमुखांना करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२६५ /०२**

**श्री. दिलीप जेम्स अंडागळे, ------- अपीलकर्ता**
**एस.डी.ए.हायस्कुल, लासलगांव,**
**मु.पो.लासलगांव, ता.निफाड**
**जि. नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**प्रेसिडेंट वेस्टर्न इंडिया युनियन.एस.डी.ए.पुणे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रिन्सीपल सेव्ह डे.अॅडव्हेरीस्ट हायस्कुल लासलगांव, ता.निफाड,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. दिलीप जेम्स अंडागळे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०८.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) शिला काळे यांनी शाळा सोडलेला दिनांक व शिक्षण सोडल्याचे कारण व त्यावेळची शैक्षणिक परिस्थिती २) सर्व कायम शिक्षकांची यादी व त्याचे शैक्षणिक पात्रता इत्यादि ३) सर्व कर्मचारी यांची शैक्षणिक पात्रता , जन्म दिनांक इत्यादिची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांची शैक्षणिक संस्था विनाअनुदानित असल्याने सदर संस्थेला माहितीचा अधिकार लागू नाही असे सांगितले. परंतु माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे त्यांच्यावर दंडनीय कारवाई करावी अशी सूचना अपीलार्थी यांनी केली. जन माहिती अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की सदर शैक्षणिक संस्था विनाअनुदानीत आहे या संस्थेला माहिती अधिकारी लागू आहे की नाही याबाबत खात्री नसल्याचे सांगितले ही बाब गंभीर आहे जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार माहित नसणे हे हास्यास्पद आहे अशा अधिकाऱ्यास अशा पदावर नेमणूक करणे चूकीचे आहे प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनीही या प्रकरणांत कुठेही हस्तक्षेप केलेला नाही कदाचित तेही अधिकाराबद्दल अनभिज्ञ असावेत.

प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी प्रथम माहिती अधिकारातील नियमांचे, कलमांचे अवलोकन करावे नियम समजाऊन घ्यावेत व त्यानंतर अपीलार्थीस योग्य ती माहिती पुरवावी अपीलार्थी समोर अज्ञान प्रगट करु नये. तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना असे निर्देशीत करण्यांत येते की आपली शिक्षण संस्था माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील केलेल्या तरतुदी नियमात बसते की नाही याची प्रथम खात्री करावी व त्याप्रमाणे कृती करुन अपीलार्थीस माहिती देता येईल की नाही हे पहावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२२१ /०२**

**श्री. अन्सारी मो.रमजान मो.मक्की,** ------- **अपीलकर्ता**
**११२, मो.मक्की मंजिल राजा नगर,**
**माळेगांव, ता.माळेगांव,**
**जि. नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उपसंचालक (शिक्षण) नाशिक विभाग,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप संचालक (शिक्षण) नाशिक विभाग,**
**नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी मो.रमजान मो.मक्की, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१०.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०७.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) मुख्याध्यापक सरदार हायस्कुल व कनिष्ट विद्यालय यांनी सहायक शिक्षकांसाठीच्या मान्यतेसाठीची प्रमाणित प्रत २) माझ या वेतनविषयक मान्यतेसाठी ३) माझ्या दि. २७.०६.२००९ पत्राची प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जावर कोणतीही माहिती दिली नाही म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलार्थी असे तिघेही गैरहजर होते. आयोगाकडील सुनावणीस अधिकाऱ्यांनी गैरहजर राहणे खरोखरच बेजबाबदार पणाचे वर्तन आहे. शिक्षण संचालकांनी याची दखल घ्यावी व अनुपस्थितीची कारणे लक्षात घेऊन योग्य ती कारवाई करावी.

मात्र वरील माहिती अंतर्भूत असणाऱ्या याच अर्जदाराच्या अपीलाबाबत आयोगाने या अगोदरही आदेश पारित केले आहेत. अर्जदार उपस्थित असते तर त्याची शहानिशा करता आली असती. अर्जदारास हवी असणारी माहिती सात दिवसात देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**
**या आदेशाची प्रत शिक्षण संचालक, सेंट्रल बिल्डींग, पुणे-१ यांनाहि देण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४७४१९/ अपील क्र.५७१५/०२**

**श्री.शेख तन्वीर अहमद,** **------- अपीलकर्ता**
**एफएसएम-२२, १/ए/२४-सी, गफार पान बिडी शॉप,**
**राहत नगर, शिवडी क्रॉस रोड,**
**वडाळा, मुंबई ३१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभागीय कार्यकारी अभियंता, एफ दक्षिण विभाग कार्यालय मुंमनपा,**
**रु.नं.३२, दुसरा माळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**परळ, मुंबई १२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.अभियंता (परिक्षण व दुरुस्ती), एफ दक्षिण विभाग कार्यालय मुंमनपा,**
**परळ, मुंबई १२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढीलप्रमाणे माहिती पाहिजे होती.

" १. शिवडी क्रॉस रोड, राऊत नगर, वडाळा या रस्त्याची लांबी आणि रुंदी.

२. सदर रस्त्यावरील विजय कम्युनिकशन सेंटर ते पठाण मस्जिद येथपर्यंत असलेल्या रस्त्याची लांबी व रुदी यातील महानगरपालिकेचा अभिलेख व सदयस्थिती यातील फरक. ३. तेथील रस्त्यामधील येणारी दुकाने, हॉटेल्स आणि घरे यांचा तपशील. ४. विजय कम्युननिकेशन सेंटरच्या पुढील आणि पठाण मस्जिदच्या माग्र ईष्क कम्युनिकेशन सेंटर ते रहिम दरबार हॉटेल पर्यंतचा महानगरपालिकेच्या अभिलेखावर असलेले क्षेत्र.५. गफार पान बिडी शॉपचे रस्त्यामध्ये आलेले क्षेत्र व त्याचे कागदपत्र."

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की अर्जदारास हवी असणारी माहिती या रस्त्याचा सर्व्हे झालेला नसल्यामुळे रेकॉर्डला नाही. तसेच या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम अग्रहक्काने द्यावयाचा निर्णय नसल्यामुळे त्याचा सर्व्हे करण्याच्या बाबतीत अग्रक्रम नाही. त्यामुळे अर्जदारास हवी असणारी माहिती आज या घटकेला रकॉर्डलाच नसल्यामुळे ती माहिती देता येणार नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य वाटते. मात्र ज्या वेळेला रस्त्याचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येईल तेव्हा सर्व माहिती विस्तृत सर्व्हे करुन तयार करावा लागेल व या वेळेला उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास देता येईल.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः २३.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक :- मुमाआ २००९/४५८८५/ अपील क्र.५८१७/०२

श्री.अबुल कादर अन्सारी, ------- अपीलकर्ता
४/२९,मार्गदर्शन सोसायटी, एन.एस.फडके सोसायटी,
अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०६९

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी
मास्टर ॲन्ड असि प्रोथोनोटरी (प्रशासन), हायकोर्ट तळमजला, रु.नं.८,
पी. डब्लू.डी. बिल्डींग, फोर्ट, मुंबई ३२

जन माहिती अधिकारी
मास्टर ॲन्ड असि प्रोथोनोटरी (प्रशासन), हायकोर्ट तळमजला, रु.नं.८,

**पी. डब्लू.डी. बिल्डींग, फोर्ट, मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १४.१२.२००९
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या.

" अर्जदाराला जी माहिती पाहिजे आहे ती ज्युडिशीअल प्रोसेडींग किंवा रेकॉर्डस यासंदर्भातील असल्यामुळे हायकोर्ट राईट टू इंफर्मेशन रुल्स २००६/०९ नुसार अशी माहिती माहितीच्या अधिकारात न मागता हायकोर्टाचे ज्युडिशीअल प्रोसेडींग मधील कागदपत्र मिळण्याच्या बाबतीतील जे नियम आहेत त्या नियमांतर्गत मागावी लागेल.हायकोर्टाला माहितीचा अधिकार कायद्याखाली नियम तयार करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार नियम तयार करण्यात आलेले आहे त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या संदर्भात दिलेला निर्णय हा योग्य वाटतो. त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारात कायदेशीर सल्ला व मत विचारता येत नाही त्याबाबतीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदाराने त्यांच्या वकीलाकडून असा सल्ला प्राप्त करुन घ्यावा असे म्हटले आहे ते सयुक्तिक वाटते.

अर्जदाराची त्यांच्या स्वतःच्या वकीलांविषयी जी तक्रार आहे ती तक्रार ही सुध्दा बार कॉन्सील यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशात काही बदल करावा अशी परिस्थिती नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४७६४७/ अपील क्र.५८२२/०२**

**श्री.कलीम खान ताज मो.खान, ------- अपीलकर्ता**
**चंद्रमणी बुध्द विहार मार्ग,खोदाइला लागून असलेली,**
**झो.म्युनसिपल शाळेच्या जवळ, दहावी गल्ली,**
**मुंबई ४०० ००८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (विशेष८, परि-१, १०,**
**शेख हाफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ८**

**जन माहिती अधिकारी**
**सहा. अभियंता (जलकामे), ई विभाग, १०,**
**शेख हाफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०८.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

अर्जदाराला त्यांची झोपडपट्टी रस्त्यावर आहे किंवा नाही याची माहिती पाहिजे होती व अर्जदारास त्यांची झ ोपडी रस्त्यावर आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे या झोपडपट्टीच्या बाबतीत फोटोपास आहे. अर्जदाराच्या पृच्छेला योग्य ते उत्तर देण्यात आलेले आहे असेच दिसून आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेल्या तक्रारी.**

**मुमाआ २००९/तक्रार क्रमांक ६६२,६६३ व ९०१/०२**

**श्री. अरुण गणपते भोवर, ------ तक्रारकर्ता**
**साई आशिष, जनकल्याण बँकेच्या बाजूला,**
**स्टेशन रोड, विक्रोळी (पूर्व),**
**मुंबई ४०० ०८३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, (वांद्रे) (पूर्व)**
**मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकारी अधिकारी (श्रेणी -२), उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,गृहनिर्माण भवन,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व),मुंबई ४०० ०५१**

**- वि वे च न -**

श्री.अरुण गणपत भोवर यांनी जे अर्ज दिले होते त्यांची माहिती न मिळाल्यामुळे, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे आयोगाकडे अपील केले होते. या अपीलांच्य दिनांक २२ फेब्रुवारी, २०१० रोजीच्या अंतरिम

निर्णयानुसार प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलांची सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. तरीही माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने या तीन तक्रारी केल्या आहेत. त्याची सुनावणी दिनांक २३.०६.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जदाराच्या तिन्ही अपीलांच्याबाबतीत दिनांक २४.०९.२००९ रोजीच प्रथम अपीलावर निर्णय दिलेला आहे व जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहे. आदेशाची अंमलबजावणी का करुन घेतली नाही असे विचारले असता अर्जदार यांनी दिलेल्या अर्जातून (माहिती) त्यांनी दिलेले इतर अर्ज (साधे) कार्यालयास प्राप्त झाले किंवा नाही अशाप्रकारची माहिती पाहिजे होती व इतरही माहिती पाहिजे होती व ती आढळून येत नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितले तेव्हा पुढील पंधरा दिवसात अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा कसोशीने शोध घ्यावा व अर्जदारास समर्पक माहिती द्यावी

एखाद्या अर्जाच्या बाबतीत माहिती उपलब्ध होऊ शकत नसली तरीही अर्जदाराशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांच्या माहितीची गरज अन्य कोणत्या उपायाने भागविता येईल या विषयी सुध्दा कार्यवाही करावी.

**आदेश**

**तिन्ही तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४७६४४/ अपील क्र.५८२३/०२**

**श्री. डी.पी.भावे,** **------- अपीलकर्ता**
**१५,श्रीकृपा, रामकृष्ण सोसायटी,**
**राम मंदिर पथ खेरवाडी, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**उपसचिव, महसुल व वन विभाग-म-१०, मंत्रालय,**
**मुंबई-३२**

**जन माहिती अधिकारी**
**कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग-म-१०, मंत्रालय,**
**मुंबई-३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपीलाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे खुलासा अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी आयोगास सादर केला.

“ (1.) Nature and the Subject matter of Information required :

QUOTE :

Under section 2 (42) of the Maharashtra Land Revenue Code, 166] before its Amendment effective 01.08.2003 vide Maharashtra Act 21 of 2003 dated 31st July 2003 (effective 01.08.2003) the State Government alone had the exclusive power to declare any village or a group of villages as an itnsm strs" BY PUBLICATION IN THE OFFICIAL GAZETTE.

**a. How many villages or group of villages were declared as "urban area" PLEASE GIVE THE NAME OF THE VILLAGE/GROUP OF VILLAGES INDIVIDUALLY FROM HAVELI TALUDA IN PUNE DISTRICT**

**b. Please give certified true copy of the Official Maharashtra Govt. Gazette in Nofification/Order issued under section २(४२) of MLR CODE, १९६६ Declaring each such village / group of villages as "urban area" was published."**

नगरपालिका अधिनियम तसेच महापालिका अधिनियम यानुसार जे क्षेत्र त्यांच्या हद्दीत येते ते नागरी क्षेत्र असेत व जमिन महसुल संहिते च्या कलम २४२ नुसार केवळ तयार करण्याच्या अनुषंगाने महसुल विभागाकडून नागरी क्षेत्र घोषित करण्याची कार्यवाही करण्यात येते हे क्षेत्र वरीलप्रमाणे स्पष्ट होते. जिल्हाधिकारी पुणे यांनी अर्जदारास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ही माहिती चुकीची किंवा अपुरी वाटत असल्यामुळे अर्जदारास पुणे निवासी जिल्हाधिकारी व अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील करता येईल असेहि नमूद करण्यात आलेले आहे तेव्हा अर्जदारास माहिती देण्याच्या दृष्टिने काही आवश्यक ती कार्यवाही झालेली आहे असे आयोगास वाटते.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४७६५३/ अपील क्र.५८२४/०२**

**श्री. खान अदिल बालान** **------- अपीलकर्ता**
**सी/के १/१५, पिता कॅम्प, ट्रॉम्बे,**
**मुंबई ४०० ०८८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**पोलीस उपायुक्त परि-६, पोलीस उपायुक्त यांचे कार्यालय चेंबुर,**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक नियंत्रण कक्ष चेंम्बुर,**
**मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" अपीलकार यांनी शासकीय माहिती अधिकारी व सहायक पोलीस आयुक्त, चेंम्बुर मुंबई याचे नावे दिनांक ४.०१.२०१० रोजी अर्ज करुन माहितीची मागणी केली त्यामध्ये पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -६, मुंबई यांनी नोंद केलेल्या जबाबाच्या प्रती बाबत मागणी केलेली आहे. अपीलकार यांनी अर्जात मा.पोलीस उप आयुक्त, परि-६, मुंबई यानी नोंद आयुक्त, परि-६, मुंबई यांना सादर करुन अपीलकार याचा अर्ज मा.पोलीस उप आयुक्त, परि-६६ मुंबई यांना सादर करुन माहिती मिळणेबाबत विनंती केल्यावरुन त्याचेकडून जा.क्र. ३१२/पोउआ/परि-६/वा/१० दिनांक १८.०१.२०१० अन्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्राम्बे पोलीस ठाणे, मुंबई यांना पत्र पाठवून त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात आलेली आहे. त्यामध्ये अपीलकार यांना कार्यालयात बोलावून विचारणा करण्यात आली असता अपीलकार यांनी मागणी केलेली माहिती ही ट्रॉम्बे पोलीस ठाणे गु.रक्र. ३०४/२००४ मध्ये समाविष्ठ आहे तसेच तत्कालीन मा.पोलीस उप आयुक्त श्री.देशभ्रतार साहेब यांनी त्याचा जबाब नोंद केला असून सदर जबाबही त्याच

केसपेपर मध्ये समाविष्ठ केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक बाकरे यांनी केल्याचे नमूद करुन अपीलकार याचे अर्जात अनुषंगाने माहिती या कार्यालयास सादर करणेबाबत वपोनि ट्रॉम्बे पोलीस ठाणे यांना आदेशित केलेले आहे. (पताका बी)

मा.पोलीस उप आयुक्त, परि-६, मुंबई यांचेकडून प्राप्त पत्राचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून माहितीची मागणी करण्यात आली.वपोनि ट्रॉम्बे पोलीस ठाणे यांचेकडून जा.क्र. ८७९/१० दिनांक २.०२.१० अन्वये पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यामध्ये ट्रॉम्बे पोलीस ठाणे गुरक्र ३०४/०४ कलम ११७, १५३ (अ), ३४ भादवि चे दोषारोपपत्र मा.महानगर दंडाधिकारी, ४५ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांचे न्यायालयात कोर्ट केस क्र. २५४/पीडब्ल्यू/०६ दि. १५.०४.२००६ अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. सदयस्थिती न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. नमूद गुन्हयात फिर्यादी श्री. राजेंद्र डाकोरजीभाई तांबट वय ५२ तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ट्रॉम्बे पोलीस ठाणे हे असून तपासी अधिकारी पोनि बाखरे आहेत. सदर गुन्हयाच्या कागदपत्राची पडताळणी केली असता कोणताही जबाब तत्कालीन मा.पोलीस उपआयुक्त श्री.देशभ्रतार साहेब यांनी घेतलेला नाही असे नमूद केल्याने त्याप्रमाणे अपीलकार यांना या कार्यालयाचे जा.क्र. ६०६/माहिती/अर्ज क्र.५६/१०, दिनांक ४.०२.१० अन्वये माहिती देण्यात आलेली आहे. (पताका सी)"

सुनावणीच्या वेळेला असे सांगितले की पडताळणी घेतल्याने सुध्दा अशा प्रकारच्या अपीलाच्या बाबतीत उपायुक्त श्रीयुत देशभ्रतार यांचा घेतलेला जबाब आढळला नाही व तसे अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे जे कागदपत्र रेकॉर्डलाच नाही ते साहजिकच पुरविता येऊ शकणार नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४७६५४/ अपील क्र.५८२५/०२**

**श्री. सुधीर शहा,** **------- अपीलकर्ता**
**१२, विश्व लक्ष्मी बिल्डींग,**
**तोडणकर वाडी, नवकार रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**अवर सचिव (ई शाखा), विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अधिक्षक (विधी), विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २३.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : २३.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारास नोटरी पब्लीक ॲडव्होकेट श्री.एन.एन.कोनकर यांच्या बाबतीत खालील माहिती पाहिजे होती.

" a.Certified copy of Annual Return as submitted in Form ZIV, under Sec.14of The Notaries Act, 1952, by the subject matter Notary publec for all the “Notarial Acts” done by him in the Years 2001-2002 & 2003.

b. Provide inspection of the register maintained by the notary for the years 2001,2002 & 2003, and thereafter provide the certified photo copy of the selected extracts.

c. Certifed copy of the appiontment of thesubject matter Notary as entered in the Register of Notaries mintained by the Government under Sec.8 (4) of The Notaries Act, 1952.

d. Certified copy of the certificate issued to him on his appointment as Notary.

e. Certified copy of the renewals of the subject matter Notary as entered in the Register of Notaries maintained by the Government for the renewal of appointment for the years 2001-2002 and 2008-2009.

f. Copy of the Annual publication of the list of Notaries for the year 2001-2002 and 2003 as published by the Government ubder Sec. 17 of The Notaries Act, 1952.

g. As The Livelihood, Life and Liberty of the applicant art injured and harmed by the acts of omission and commissin by the said Notary, provide information on the prescribed norms/rules/directives followed by the department in regards to time and mode of actions to deal in such matters. (Also see,Sec.7 (1) of The Right to Information Act, 2005)

h. Name, Designation and the address of the appropriate Government Authority to whom the complaint if any, against the Notary public is to be referred.

i. Any other information relevant in regards to redressal of grievances against the public Notaries.

j. Furnish Name, Designation and Address of the Appellate Authority for this office.

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे आहे.

" 1. I respectfully say and submit that the information at point (a) is not available with this office therefore the same could not be made availanle to the applicant however, the same was called from the Notar public vide letters dated 1.1.2010 and 3.02.2010.

2. I respectfully say and submit that the information at point (b) is not record of the Government hence the same was also called from the Notary public vide letters dated 1.01.2010 and 3.02.2010.

3. I respectfully say and submit that the information at point (c) was not denied but the applicant was requested to personally inspect the register as provided under Right to Information Act, as it was not practically possible to take the xerox copies of the register.

4. I respectfully say and submit that the information at point (d and e) was kept ready but the applicant failed to colllect the same. As the information was not denied the same may not be given free of charge.

5. I respectfully say and submit that the information at point (f) was not available with this office hence could not be made available to the applicant. However, the applicant was requested to get the same from Government printing press, Charni Road, Mumbai, as the same is Government publication.

6. I respectfully say and submit that the information at point ( g,h,i and j) was given to the applicant vide letter dated 15.10.2009

Thus every possible steps were taken to give information to the applicant however, the applicant has failed to collect the information though reminded vide letters dated 1.01.2010 and 9.03.2010.

जन माहिती अधिकारी यांनी नोटरी पब्लीकच्या संदर्भात असलेली माहिती श्री.कोनकर यांचेकडून प्रत्यक्ष मिळविण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मृत्यु दिनांक ३०.०९.२००९ रोजी झाला आहे व त्यांच्या पत्नी श्रीमती कोनकर यांनी त्यांच्याकडे माहिती नसल्यामुळे माहिती देण्याची असमर्थता व्यक्त केलेली आहे. जी माहिती विभागात असायला पाहिजे तीही त्या ठिकाणी नाही मात्र ही माहिती दुसरीकडून प्राप्त करुन घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसतो. अर्जदाराने जी माहिती उपलब्ध आहे त्याची पाहणी करुन त्यांना हव्या असलेल्या प्रती त्यांनी प्राप्त करुन घ्याव्यात. अपीलीय अधिकारी यांच्यामते आता श्रीयुत कोनकर कुटूंबीयांकडून अशी माहिती प्राप्त करुन घेणे हे दुरापास्त दिसते त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २३.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४६७९३/ अपील क्र.५८२८/०२**

**सौ.विनया विजय अपराध** ------- **अपीलकर्ता**
**जलसंपदा विभाग, नविन प्रशासन भवन,**
**१५ वा माळा, मुंबई ४०० ०३२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**सहसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०१.२०१०
सुनावणीचा दिनांक : २४.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की अर्जदाराला आदिवासी विकास विभागातील जेष्ठता सुची विभागाची माहिती पाहिजे होती ती देण्यात आलेली आहे. सुरुवातीला काही नस्त्या सापडत नसल्यामुळे काही माहिती द्यावयाची राहिली होती. मात्र आता ती देण्यात आलेली आहे असे दिसून आले. अर्जदार हवेतर नस्त्या बघून त्यांची खात्री करुन घेऊ शकता.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २४.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२८२ /०२**

**श्री. रमेश कचरु शेलार,** **------- अपीलकर्ता**
**महात्मा फुले चौक, ओझर (मिग),**
**ता.निफाड, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी**
**निफाड यांचे कार्यालय, निफाड, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार कार्यालय, निफाड, मु.पो. निफाड,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. रमेश कचरु शेलार, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर

विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.०४.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) मौजे ओझर ता.निफाड येथील नोंद नं. १५६४६ बाबत निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस अनुकरण्यात आलेली कार्यपध्दती पर्यवेक्षण व उत्तर दायित्व प्रणाली आदेश व संपूर्ण दस्तऐवजाच्या प्रती २) नोंद व १५६४६ बाबत सर्कल,ऑफिसर तलाठी यांनी आपली कार्य पार पाडण्यासाठी ठरऊन दिलेली मानके ३) मौजे ओझर ता.निफाड येथील गट नं. १२५ व गट नं. १२१ भोगवटादार श्री. आबाजी बाळा शेलार यांचे नावाने निर्मिती प्रक्रियेत अनुसरण्यात आलेली कार्यपध्दती इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.०४.२००९ च्या पत्रान्वये मागितलेल्या माहिती पैकी काही माहिती तलाठी ओझर तर काही माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध आहे. तलाठी ओझर यांचेकडून आपले कागदपत्र मागविण्यांत आली आहेत. तथून माहिती प्राप्त होताच ती आपणास पुरविण्यांत येईल असे कळविले. माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावरील सुनावणीस वादी व प्रतिवादी हजर होते. प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली त्यावेळी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी निवडक पुरप्रतिबंधक कामे कायदा व्यवस्था यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपील अर्जदार यांचे माहिती अर्जातील फेरफार नोंद नं. २११९ वगळता इतर सर्व माहिती तलाठी ओझर व मंडळ अधिकारी पिंपळगांव (ब) यांचे स्तरावरील होती तरीही तलाठी ओझर यांच्याकडून माहिती प्राप्त करुन अपीलार्थीस देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे तहसील कार्यालयांत उपलब्ध असणारी माहिती दिलेली आहे उर्वरित माहिती मंडळ अधिकारी पिंपळगांव (ब) यांच्याकडून मागविण्यांत आली असून ती प्राप्त झाल्यावर देण्यांत येईल परंतु सदरहू माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या चर्चेदरम्यान अर्जदाराने नोंद नं. १५६४६ बाबत सर्कल ऑफीसर पिंपळगांव (ब) व तलाठी ओझर यांनी कोणती मानके नियम सूचना व अभिलेख यांचा वापर करण्यात आलेला आहे याबाबत माहिती मागितली होती तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी सदरहू माहिती सर्कल आफीस पिंपळगांव (ब) यांचेकडून मागविलेली आहे तसेच तहसील कार्यालयांतील उपलब्ध माहिती अर्जदारास पुरविलेली आहे जी माहिती मंडळ अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली नाही ती त्यांच्याकडून मागवून संकलीत करुन अर्जदारास पुरविणे क्रमप्राप्त आहे. तरी जन माहिती अधिकारी यांनी मंडळ अधिकारी पिंपळगांव (ब) यांच्याकडून लवकरात लवकर माहिती प्राप्त करुन घ्यावी. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी याबाबत मंडळ अधिकारी यांना प्रत्यक्ष संपर्क साधून ती माहिती त्यांना त्वरीत देण्यास भाग पाडावे व उर्वरित माहिती अपीलार्थीस देऊन प्रकरण निकाली काढावे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ/तक्रार/ नाशिक/२००९/सीआर त.क्र. ०१ /०१**

**श्री. भवरलाल स्वरुपचंद छाजेड,** **------ तक्रारकर्ता**
**ग.नं. २, घ.नं. १७८८ चेतना कॉलेज जवळ,**
**धुळे, ता.जि.धुळे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**गट विकास अधिकारी, पंचायत समिती साक्री,**
**ता.साक्री,जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वळसाणे, ता.साक्री,**
**जि.धुळे.**

**- वि वे च न -**

श्री.भवरलाल स्वरुपचंद छाजेड, धुळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तक्रारीनुसार दि.९.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय वळसाणे ता.साक्री,जि.धुळे यांचेकडे सन १९८२ ते २००६ या कालावधीत सदर ग्रामपंचायतीच्या सर्व मासिक व ग्रामसभेच्या बैठकीचे इतिवृत्त व त्याचा बजावणी रीपोर्ट अजेंडा सह देण्याची विनंती केली होती. तसेच वळसाणे येथील जैन मंदीरासंदर्भात ग्रामपंचायत व इतरांमध्ये झ ालेला संपूर्ण पत्रव्यवहार व खर्चाचा तपशील इत्यादि माहिती देखील माहिती मागितली होती.

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत मागितलेली माहिती दिली नाही म्हणून त्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) धुळे यांच्याकडे तक्रार दाखल केली सदर तक्रारीवर सुनावणी घेऊन संबंधीतांनी अपीलार्थीस माहिती देण्याबाबत आदेश पारित केले.

जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच त्यांची त्या ठिकाणावरुन बदली होऊनही त्यांनी कार्यभार हस्तांतरीत केला नाही म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे यांनी त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई केलेली दिसून येते.

अपीलार्थीने सन १९८२ ते २००६ या मागणी केलेल्या माहितीचा कालावधी हा जवळजवळ पंचवीस वर्ष इतका जुना आहे. माहिती किती मोठया प्रमाणात व किती कालावधीची मागावी याबाबत त्यांनी विवेक बाळगणे अपेक्षीत आहे. खरोखरीच कोणत्या वर्षाची, कोणत्या सभेची माहिती पाहिजे हे त्यांनी निश्चित केल्यास सर्वांनाच सोईचे जाईल.

सदर तक्रारीची सुनावणी दि. १८.०५.२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती त्या सुनावणीस अपीलार्थीसह उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थी यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधुन कार्यालयत व अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीचे त्यांना निरीक्षण करावे ते निरीक्षण इ ााल्यावर ज्या माहितीची निवड अपीलार्थी करतील ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विनामुल्य द्यावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**
**या आदेशाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४४५७४/अपील क्रमांक ५३८६/०२**

**श्री. अजितकुमार पंजाबी** **------- अपीलकर्ता**
**व्दारा:- रमजाने भटारचाळ नं. २६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड, कुर्ला (प),**
**मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, सहायक मनपा आयुक्त,**
**एफ/उत्तर विभाग, ९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा, मुंबई १९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, सहायक मनपा आयुक्त,**
**एफ/उत्तर विभाग, ९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा, मुंबई १९.**

**- वि वे च न -**

श्री.अजितकुमार पंजाबी, यांनी दि. १८.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सिव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागविली होती. सदर माहिती प्रश्नावली स्वरुपात तसेच व्यापक स्वरुपाची असल्यामुळे पत्राव्दारे देता येणे शक्य नाही. आपण विशीष्ट स्वरुपाची माहिती विचारली तर देणे सुलभ होईल. त्यासाठी आवश्यक असलेले शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी असे दि. १७.०६.२००९ रोजी कळविले तदनंतर दि. ६.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीबाबत स्पष्टीकरण दिले असून माहितीसाठी रु. १०,०००/- इतकी रक्कम कार्यालयात जमा करावी असे कळविले. शुल्क जास्त वाटत असल्यास कागदपत्रांची तपासणी करुन निवड करावी व शुल्क भरुन माहिती घ्यावी असे ही कळविले.

वरील माहिती समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. त्यावर अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराशी सहमती दर्शविली व अपील निकाली काढले.

विहीत वेळेत माहिती न दिल्याने त्यांना मोफत माहिती मिळावी म्हणून व्दितीय अपील दाखल केले. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दि. १६.०२.२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती त्यास अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. परंतु प्रथम अपीलीय प्राधिकारी अनुपस्थित होते.

अर्जदाराने स्वतः माहिती पहावी व तसे करीत असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मदत करावी व अर्जदाराने निवड केलेली माहिती त्यांना शुल्क भरुन देण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४६८०२/ अपील क्र.५८४४/०२**

**श्री.सुनिल कदम,** **------- अपीलकर्ता**
**वरळी पी.डब्ल्यु.डी.चाळ. क्र.१० जवळ,**
**पत्रा रोड, डॉ.जी.एम.गोखले मार्ग,**
**वरळी, मुंबई १८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (मध्य मुंबई),**
**मुंबई विकास विभाग वरळी (सा.बां.), वरळी,**
**मुंबई १८**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता,**
**मुंबई विकास विभाग वरळी (सा.बां.),**
**वरळी, मुंबई १८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०८.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३०.०६.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने वरळी, बी.डी.डी. चाळ क्र.१० च्या बाजूला पी.डब्ल्यू.डी. कामगार वसाहत झोपडपट्टी परिसरात ब्रिटीशकालीन बांधकाम असलेले पंपहाऊस निवासस्थाना बाबत काही माहिती मागितली होती. मात्र दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जदार व त्यांच्या वडीलांनी याच विषयावर अकरा अर्ज आतापर्यंत केलेले आहे व त्यांना कधी मुदतीत तर कधी उशीरा माहिती देण्यात आलेली आहे. तरीही ते पुन्हा-पुन्हा अर्ज करतात अर्जदार ज्या विषयासंबंधी माहिती मागतात त्या विषयाची माहिती रेकॉर्डला असलेली कागदपत्र एकत्र करुन दि.१५.०७.२०१० रोजी अर्जदारास दाखविण्यात यावी असे निर्देश देण्यात आले व अर्जदार त्यातून कागदपत्रांची निवड करुन आपले समाधान करुन घेऊ शकतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

जन माहिती अधिकारी व अपीलार्थी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३०.०६.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक :- मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२६९ /०२

श्री. दिपक विठ्ठल खलाणे ------- अपीलकर्ता
मातृकृपा भवन, के-४, ४६११,

**रुम नं. ५, तपोवन कॉर्नर, पंचवटी,**
**सुदीन हॉटेल समोर, नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे,**
**जि.धुळे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसीलदार, तहसील कार्यालय, धुळे**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. दिपक विठ्ठल खलाणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०२.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०८.२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) खंडलाय बुद्रुक धुळे येथील जमीन सर्व्हे क्र.१२५ सध्याचा क्र. २२८ (१) सदर जमीनीचे १९४७ पासून आजपर्यंत टायटल मधील वेळोवेळी झालेल्या बदकाचा विश्लेषणात्मक तपशील तसेच छ ड व ९/१२ मधील बदलासाठी कायदेशीर दाखल केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळल्याबाबत विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती दिली माहिती उशीरा देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यापूर्वीच अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते प्रथम अपीलावरील सुनावणीस त्यांनी पूर्णपणे माहिती न मिळाल्याचे सांगितले जन माहिती अधिकारी यांनी याबाबत स्पष्ट खुलासा करुन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना इंतभूत माहिती दिली निवडणूकीचे कामकाज व माहिती रेकॉर्ड प्राप्त करुन घेण्यास विलंब झाला माहिती देण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणताही कुर्हेतु नव्हता प्रथम अपीलीय प्राधिकारी ही बाब मान्य केली परंतु अपीलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना पंधरा दिवसांत पुरवावी असे निर्देश दिले. परंतु त्या कालावधीत अपीलार्थीस माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीस वादी व उत्तरवादी उपस्थित होते त्यावेळी झालेल्या चर्चेत अपीलार्थीने अद्याप पूर्ण माहिती मिळाली नाही असे सांगितले त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास

आणले की अर्जदारास सन १९७७ ते २०१० पर्यंतची माहिती देण्यात आली आहे उर्वरित माहिती सन १९६५ ते १९७० पर्यंतच्या माहितीचा शोध घेणे क्रमप्राप्त आहे माहिती फारच जुनी असल्याने त्यास थोडा कालावधी लागेल परंतु माहिती सापडली की ती त्यांना ताबडतोब देण्यांत येईल.

एकंदरीत मागितलेली माहिती बरीच जुनी असल्याने तिचा शोध घेण्यांत येत आहे त्यामुळे ती उपलब्ध झाली की टप्प्याटप्प्याने अपीलार्थीस पुरविण्यांत येईल हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे परंतु त्यांनी त्याचाकसून तपास करणे गरजेचे आहे यापूर्वी दिलेली माहिती विलंबाने दिली गेली आहे त्यामुळे उर्वरित माहिती शक्यतो २० दिवसांत अपीलार्थीस पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१५०२ /०२**

**श्री. सुधाकर आर. जाधव,** **------- अपीलकर्ता**
**एन-४१, जेअे-३-१२-१, सावतानगर,**
**४ थी स्किम, नविन सिडको - ४,**
**नाशिक ०८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**

**कार्यकारी अभियंता (रो.ह.यो.),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग,**
**पाथडी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर.**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. सुधाकर आर. जाधव,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. २१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते तर अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.०८.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) उप अभियंता सार्वजनिक बांधकम विभाग पाथर्डी यांचे पगार विषयक २) इन्कम टॅक्स ३) सन २००७-०८ मधील मनुष्यबळाचा मासिक खर्च ४) देण्यात आलेली देयके ५) निविदा व त्याचे नियम ६) गुणवत्ता व नियंत्रण विभागाचा पूर्ण पत्ता व २००८-०९ मधील मंजूर कामे इत्यादिची तपशीलवार माहिती मागितली.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.१०.२००८ रोजीच्या मागितलेल्या कामाच्या संदर्भात माहिती विभागीय कार्यालयाकडून घ्यावी असे अपीलार्थीस कळविले त्यामुळे अपीलार्थीने व्यथीत होऊन दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश दिले की अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अशी माहिती पाहण्यासाठी अर्जदारास स्वतंत्र तारीख देऊन उप विभागांत दाखविण्यांत यावी व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती विनामुल्य पुरवाव्यात परंतु माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीस वादी उपस्थित होते व उत्तरवादी अनुपस्थित होते. त्यावेळी अपीलार्थीने आयोगास प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आयोगास पारित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती दिली नाही ही बाब गंभीर आहे तसेच जन माहिती अधिकारी यांना कामाकाजाची योग्य जाणीव दिसत नाही. जबाबदारी टाळणे कामात टंगळ-मंगळ करणे या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कारवाईस पात्र ठरतात तेव्हा आयोचे असे निर्देश आहेत की जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून

२० दिवसाच्या आत त्यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० नुसार शास्ती का लादण्यात येऊ नये याचा खुलासा करावा. अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनाशुल्क पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/४६७९४/ अपील क्र.५८५०/०२**

**श्री.ॲड. राजेश बिंद्रा,** **------- अपीलकर्ता**
**२० डी/१०५, भारत हाऊस समोर,**
**मुंबई २३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**वरळी**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय,**
**वरळी.**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २७.०१.२०१०
सुनावणीचा दिनांक : ३०.०६.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपीलीय अधिकाऱ्याच्या दि.४ डिसेंबर, २००९ रोजीच्या आदेशानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे व सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आवश्यक असणारी माहिती दि. २७ जानेवारी, २०१० रोजी पाठविण्यात आलेली आहे. अर्जदाराचे हे अपील त्याच तारखेचे आहे. माहिती दिली असली तरी माहिती विलंब लागलेला आहे मात्र त्याच दरम्यान नवीन जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती झाली त्यामुळे माहिती देण्यास विलंब लागला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलार्थी उपस्थित असते तर त्यांचे माहितीच्या समाधाना विषयी प्रत्यक्ष माहिती घेता येऊ शकली असती.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३०.०६.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :- मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/३०५ /०२**

**श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम** ------- **अपीलकर्ता**
**श्रध्दा सबुरी सप्तश्रृंगी कॉलनी,**
**माळेगांव कॅम्प, ता.माळेगांव,**
**नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**जनरल सेक्रेटरी महात्मा गांधी विद्यामंदिर, माळेगांव कॅम्प,**
**ता.माळेगांव, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापक, के.बी.एच. माध्यमिक व**
**उच्च माध्यमिक विद्यालय माळेगांव कॅम्प, ता.माळेगांव,**
**नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. पुंजाराम लक्ष्मण निकम,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.११.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली १) शाळेत पाचवी ते दहावीचे ५२ वर्ग व ११ वीचे, १२वीचे १० वर्ग असे एकूण ६२ वर्ग संख्या आहे मात्र शाळेच्या इमारतीत एका शिफ्टला १९ व दुसऱ्या शिफ्टला १९ असे एकूण ३८ वर्ग उपलब्ध आहेत त्यांची माहिती व शाळेतील बैठक व्यवस्थेबाबत व अध्यापनाबद्दलची इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.११.२००७ च्या पत्रान्वये अर्जदारास अर्जात नमूद केलेल्या वर्णनाप्रमाणे शाळेची परिस्थिती नाही त्यामुळे माहिती देण्याचे प्रयोजन नाही या विरुध्द अपीलार्थीनेप्‍ प्रथम अपील दाखल केले त्यावरील सुनावणीस प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्याचे आदेश पारित केले. त्याविरोधात अपीलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीस वादी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की कोणतीही माहिती मागितली तरी जन माहिती अधिकारी हे माहिती याचे उत्तर नेहमी नकारार्थी असते मागितलेली माहिती मुद्देनिहाय मागितली आहे तर त्याचे उत्तर होय/नाही असे दिले तरी समजू शकते. परंतु अर्जात नमूद केलेली माहिती वर्णनाप्रमाणे परिस्थिती नाही याचा अर्थ काय समजावा. आयोगाने याबाबत जन माहिती अधिकारी यांना अशाप्रकारे उत्तर दणे अधिनियमाला अपेक्षित नाही. अपीलार्थीने विचारणा केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुद्दे निहाय दिल्यास अपीलार्थीच्या मनात शंका राहणार नाही जन माहिती अधिकारी यांनी एकाच साच्यातील उत्तरे देण्याऐवजी जी काही परिस्थीती आहे ती विचारात घेऊन ती त्यांनी कबुल केल्याप्रमाणे अपीलार्थीस पंधरा दिवसांत विनामुल्य पुरविण्याची दक्षता घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**

दिनांकः ३०.०६.२०१०